



पुणे, शनिवार, २५ जानेवारी २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 60 • वर्ष ४ थे, अंक ६० • किंमत ₹ ६ • पाने : १२

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News





## At a Glance

### अमूलचा ग्राहकांना मोठा दिलासा

**मुंबई-** देशातील सर्वात मोठी दूध उत्पादक कंपनी अमूलने त्यांच्या अमूल गोल्ड, अमूल ताजा आणि अमूल टी स्पेशल या १ लिटरच्या पाकिटांच्या दरामध्ये १ रुपयाने कपात केली आहे. याबाबत गुजरात सहकारी दूध विपणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक जयेन मेहता यांनी माहिती दिली आहे. दरम्यान या दर कपातीमुळे अमूलच्या ग्राहकांना मोठा दिला मिळाला आहे.

» पान ७ वर

### टोरेस गैरव्यवहार प्रकरणी ईडीची कारवाई

**मुंबई-** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतेच डावोस दौरा करत जागतिक आर्थिक परिषदेत सहभाग नोंदवला होता. मुख्यमंत्र्यांनी या परिषदेत जगभरातील अनेक कंपन्यांशी करार करत मोठी राज्यात मोठी गुंतवणूक आणली आले. याची सध्या सर्वत्र चर्चा आहे. दुसरीकडे गेल्या महिन्याभरापासून राज्यात बीड जिल्ह्यातील मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख त्यांचे हत्येचे प्रकरण » पान ७ वर

# फॅक्टरीत मोठा स्फोट

## भंडाऱ्यातील फॅक्टरीत मोठा स्फोट आठ जण ठार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भंडारा-** भंडारा येथील एका ऑर्डनन्स फॅक्टरीत मोठा स्फोट झाला. या अपघातात ८ जणांचा मृत्यू झाला असून इतर अनेक कर्मचारी जखमी झाल्याची माहिती आहे. कारखान्याच्या आरके शाखा विभागात हा स्फोट झाला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी 8 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. कारखान्यात झालेल्या स्फोटाची छायाचित्रेही समोर येत असून, त्यात शस्त्रे बनवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जड साहित्याचे तुकडे आजूबाजूला विखुरलेले दिसत आहेत. स्फोटानंतर काळ्या धुराचे लोट आकाशात दूरवर उठताना दिसत आहेत. त्याचवेळी, स्फोटानंतर कारखान्यात आग लागली, त्यामुळे अनेकांना फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. पोलिसांचे पथक घटनास्थळी हजर असून ते मदतकार्यात गुंतले आहेत. जखमींना रुग्णवाहिकेच्या मदतीने रुग्णालयात





नेण्यात येत आहे. लोक सांगतात की स्फोटाचा आवाज इतका मोठा होता की परिसरात घबराट पसरली आणि लोक इकडे तिकडे धावू लागले. घटनास्थळी स्थानिक लोकांची मोठी गर्दी जमली असून ते लोकांना वाचवण्यात मदत करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र यांनी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

यात पाच जणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक घटनास्थळी असून सर्व प्रकारची मदत केली जात आहे. एसडीआरएफ आणि नागपूर महानगरपालिकेच्या पथकांनाही बचाव कार्यासाठी पाचारण करण्यात आले असून ते लवकरच पोहोचतील. जिल्हा प्रशासन संरक्षण दलांच्या समन्वयाने बचाव कार्यात सहभागी आहे. वैद्यकीय मदतीसाठी पथकेही सज्ज ठेवण्यात आली आहेत. कारखान्यात 14 कर्मचारी उपस्थित होते. यावेळी कारखान्यात 14 कर्मचारी काम करत होते. गंभीर जखमी अवस्थेत चार ते पाच जणांना बाहेर काढण्यात आले आहे. ऑर्डनन्स फॅक्टरीच्या अधिकाऱ्यांशिवाय अग्निशमन दल आणि पोलिस अधिकारीही घटनास्थळी भेट देवून बचावकार्य सुरू होते .

# मासिक ९० कोटींचे नुकसान; लालपरीचा प्रवास महागला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या वेळी लाडक्या भगिनींवर मोफत योजनांचा वर्षाव करणारे सरकार आता पैसे उभारण्यासाठी नवनवीन पद्धती अवलंबत आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकारी बस प्रवासाचा लाभ घेण्यासाठी तुम्हाला आजच्या तुलनेत जास्त पैसे खर्च करावे लागणार आहेत. महाराष्ट्रातील सरकारी बस तिकिटांच्या दरात आजपासून १५ टक्के वाढ करण्यात आली आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ही घोषणा केली आहे.

वास्तविक, गुरुवारी महाराष्ट्र राज्य परिवहन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक झाली, त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. मोफत सेवांमुळे महाराष्ट्र सरकारच्या परिवहन सेवेला दरमहा ९० कोटी रुपयांचा तोटा होत होता. आता हा तोटा कमी करण्यासाठी सरकारने भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.

एसटी महामंडळाने गेल्या तीन वर्षात एसटीच्या तिकीट दरात कोणतीही वाढ केली नव्हती. मात्र, आता एसटीचा प्रवास महागला आहे. एसटीच्या तिकीट दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एसटी महामंडळाने भाडेवाढीचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठवला आल्याचे काही दिवसांपूर्वी सांगितले जात होते.



### रिक्षा आणि टॅक्सीची किती भाडेवाढ होणार?

● "रिक्षा आणि टॅक्सीची भाडेवाढ ही ३ रुपये प्रति किलोमीटर होणार आहे. तसेच रिक्षा आणि टॅक्सीची ही भाडेवाढ १ फेब्रुवारीपासून लागू असणार आहे, असंही मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं आहे.

"मी राज्याच्या प्रधान सचिवांबरोबर चर्चा केली. तेव्हा त्यांनी सांगितले की गुरुवारी एक महत्वाची बैठक झाली. त्या बैठकीत एसटीच्या भाडेवाढीबाबत निर्णय घेण्यात आला आहे. कारण गेल्या अनेक वर्षांपासून एसटीची भाडेवाढ करण्यात आली नव्हती. आता एसटीची १४.९७ टक्के भाडेवाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तसेच एसटीची ही भाडेवाढ आजपासून लागू करण्यात येणार आहे".

**— प्रताप सरनाईक**
**(परिवहन मंत्री)**

# खुलेआम होते पैसे वाटप सुरू... !

## दिल्ली विधानसभा निवडणूक : माजी मुख्यमंत्री केजरीवालांचा गंभीर आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली-** दिल्ली विधानसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय आरोप प्रत्यारोपांना ऊत आल्याचे पाहायला मिळत आहे. आपचे नेते अरविंद केजरीवाल यांच्याकडून भाजपावर सातत्याने आरोप केले आज आहेत. यादरम्यान दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी एक व्हिडीओ निवेदन जारी केले आहे. ज्यामध्ये त्यांनी दिल्ली विधानभा निवडणुकीच्या तोंडावर खुलेआम पैसे आणि इतर साहित्य वाटले जात असल्याचा आरोप केला आहे. इतकेच नाही तर हा गैरप्रकार पोलिसांच्या उपस्थित होत असल्याचे केजरीवाल म्हणाले आहेत.

केजरीवाल त्यांच्या निवेदनात म्हणाले की, "नेहमी निवडणुकीत बोललं जातं की मतदानापूर्वीची रात्र ही वैऱ्याची (कत्ल) असते. त्या रात्री मोठ्या प्रमाणात पैसे, कोंबडी, दारू वाटली जाते. पण दिल्लीची ही निवडणूक वेगळीच आहे. या निवडणुकीत दीड महिना आधीपासून खुले आम पैसा, साहित्य, बूट, अकराशे रुपये वाटले जात आहेत. कोणाला भीती देखील वाटत नाही की निवडणूक आयोग कारवाई करेल. पोलिसांच्या संरक्षणात हे वाटप केले जात आहे".



> माझं तुम्हाला निवेदन आहे की, हा पैसा यांनी देशाच्या जनतेची लूट करूनच कमावला आहे. हे जितका पैसा, सामान वाटत आहेत ते सगळं घ्या. पण एक गोष्ट लक्षात ठेवा तुमचं मत मात्र विकू नका.

चादरी, साड्या, बूट, ब्लँकेट, जॅकेट, राशन आणि सोन्याच्या साखळ्या वाटल्या जात आहे. हे आपल्या देशासाठी वाईट गोष्ट आहे", असेही केजरीवाल यांनी नमूद केले आहे.

"हे साहित्य, पैसे वाटले जात आहे ते सरकारी पैशांनी वाटले जात नाही. हे यांच्या पक्षाचे काही नेते वाटत आहेत. हा पैसा कुठून आला? कोट्यवधी रुपये मते विकत घेण्यासाठी वाटले जात आहेत, हे यांच्याकडे कुठून आले? हा यांचा भ्रष्टाचाराचा पैसा आहे. जो यांनी देशाची लूट करून कमवला आहे", असेही केजरीवाल म्हणालेत.

पुढे बोलताना केजरीवाल म्हणाले की, "माझं तुम्हाला निवेदन आहे की, हा पैसा यांनी देशाच्या जनतेची लूट करूनच कमावला आहे. हे जितका पैसा, सामान वाटत आहेत ते सगळं घ्या. पण एक गोष्ट लक्षात ठेवा तुमचं मत मात्र विकू नका. अकराशे रुपये, एक साडी, चादर, एका बुटांच्या जोडीच्या बदल्यात तुमचं मत विकू नका, कारण ते बहुमूल्य असल्याचे त्यांनी सांगितले.

### आता सेट परीक्षा १५ जून रोजी होणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे,-** सेट परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आलाय. ही परीक्षा आता जून महिन्यात होणार आहे. ४ मे रोजी आधी ही परीक्षा होणार होती. सेट परीक्षा आता जून महिन्यात 15 तारखेला आयोजित केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. परीक्षा लांबणीवर पडल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाला अतिरिक्त वेळ मिळणार आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे सहाय्यक प्राध्यापक पदाच्या पात्रतेसाठी घेतल्या जाणाऱ्या सेट परीक्षेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. मे महिन्यात 4 तारखेला होणारी परीक्षा आता जून महिन्यात 15 तारखेला आयोजित केली जाणार आहे, विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव डॉ.ज्योती भाकरे यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. » पान ७ वर

# तब्बल १३ रुग्ण व्हेंटिलेटरवर; २४ जणांवर आयसीयूत उपचार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे:** पुण्यात 'गुलेन बॅरी सिंड्रोम' आजाराने बाधित असलेल्या रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. न्यूरोलॉजिकल आजाराचा प्रकार असलेल्या या आजाराचे तब्बल ६७ रुग्ण पुण्यात आढळले आहे. यातील १३ रुग्ण व्हेंटिलेटरवर आहेत. तर २४ जणांवर अतिदक्षता विभागात (आयसीयू) उपचार सुरू आहेत. पुणे महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने याची गंभीर दखल घेतली असून पुण्यात सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. तसेच बाधित रुग्णांचा देखील शोध घेतला जात आहे. दरम्यान, हा आजार होण्यास कारणीभूत ठरणारा जीवाणू तपासणीत आढळला आहे.

पुण्यात ग्रामीण भागात गुलेन बॅरी सिंड्रोमचे ३९ रुग्ण आढळले आहे. तर पुणे महापालिकेच्या हद्दीत १३, तर पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या हद्दीत १२ रुग्ण आढळले आहे. त्यामुळे पुण्यातील जीबीएसची रुग्णसंख्या ६४ वर पोहोचली आहे. पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून बाधित भागांमध्ये तातडीने रुग्ण सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे.

### आरोग्य विभागाने स्थापन केले शीघ्र प्रतिसाद दल

● पुणे महानगर पालिकेच्या आरोग्य विभागाने शीघ्र प्रतिसाद पथकाची स्थापना केली आहे. या पथकाने रुग्णसंख्या जास्त असलेल्या भागांचे सर्वेक्षण सुरू केले आहे. तर रुग्णांचे शौचनमुने व रक्तनमुने हे राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेत पाठविण्यात आले आहेत. तर पुण्यातील विविध भागांतील पाण्याचा नमुने रासायनिक आणि जैविक तपासणीसाठी राज्य सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडे पाठविण्यात आले आहेत.





### महिलेला डांबून केला बलात्कार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** धर्मांतर करण्यासाठी एका ३२ वर्षीय महिलेला धमकावून तिला एका घरात डांबून ठेवण्यात आले. महिलेला धमकावून तिच्यावर बलात्कार करण्यात आला. याप्रकरणी एका महिलेसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, त्यांना अटक करण्यात आली आहे. याबाबत एका ३२ वर्षीय पीडित महिलेने विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, संतोष रामदास गायकवाड (वय ५५, रा. विठ्ठल मंदिरासमोर, धानोरी), सागर मधुकर लांडगे (वय ३०,रा. गल्ली क्रमांक ३, माधवनगर, धानोरी), तसेच एका महिलेला अटक करण्यात आली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी आणि पीडित महिला ओळखीचे आहेत. आरोपींनी पीडित महिलेला » पान ७ वर

**विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवण्याची याचिका फेटाळली**

# उच्च न्यायालयाचा भाजपला धक्का !

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली:** दिल्ली हायकोर्टाने शुक्रवारी राज्य विधानसभेची विशेष बैठक घेण्याचे निर्देश देण्यास नकार दिला, ज्याचे प्रशासनावर अनेक कॅग अहवाल सादर केले. मात्र, न्यायमूर्ती सचिन दत्ता म्हणाले की, दिल्ली सरकारकडून या प्रकरणात कमालीचा विलंब झाला आहे. लेखापरीक्षण अहवाल सादर करणे संविधानानुसार अनिवार्य असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

याचिकाकर्त्याने विधानसभेची विशेष बैठक बोलावण्याची विनंती मान्य करण्यास न्यायालयाचा कल नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. खरेतर, विरोधी पक्षनेते विजेंदर गुप्ता आणि भाजपचे आमदार मोहन सिंग बिश्त, ओम प्रकाश शर्मा, अजय कुमार महावर, अभय वर्मा, अनिल कुमार बाजपेयी आणि जितेंद्र महाजन यांनी गेल्या वर्षी याचिका दाखल करून कॅगला सादर करण्यासाठी विधानसभेची बैठक बोलावण्याची मागणी केली होती. अहवालात स्पीकरकडे निर्देश देण्याची मागणी केली होती.

याचिकाकर्त्यांनी अधिवक्ता नीरज आणि सत्य रंजन स्वेन यांच्यामार्फत ही याचिका दाखल केली होती. विधानसभा अध्यक्ष आणि दिल्लीच्या आप सरकारच्या वरिष्ठ वकिलांनी न्यायालयाच्या अशा निर्देशास विरोध केला आणि म्हटले की लवकरच विधानसभा निवडणुका होणार आहेत अशा वेळी अहवाल सादर करण्याची घाई नाही.

दिल्ली हायकोर्टाने म्हटले आहे की, कॅगचा अहवाल विधानसभेसमोर ठेवणे अनिवार्य घटनात्मक आहे. कॅगचा अहवाल विधानसभेसमोर ठेवणे हा संसदीय लोकशाहीचा अविभाज्य भाग असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. कॅग अहवाल हे एक माध्यम आहे ज्याद्वारे निवडून आलेले प्रतिनिधी सरकारला जबाबदार धरू शकतात. कॅगने संबंधित सरकारकडे पाठविल्यानंतर हे अहवाल दीर्घकाळ विधानसभेत ठेवणे म्हणजे घटनात्मक आदेशाचे उल्लंघन होईल. » पान ७ वर

### कॅग अहवाल हे एक माध्यम आहे

● कॅगचा अहवाल विधानसभेसमोर ठेवणे अनिवार्य घटनात्मक आहे. कॅगचा अहवाल विधानसभेसमोर ठेवणे हा संसदीय लोकशाहीचा अविभाज्य भाग आहे.




### सामाजिक कार्यकर्त्या आगाशें यांचा मृत्यू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**ठाणे-** ठाण्यात हीट अँड रनच्या घटना दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. अशाच एका घटनेत एका समाजसेविकेचा मृत्यू झाला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या पुष्पा आगाशे असे त्यांचे नाव असून गुरुवारी त्या सकाळी फिरायला गेल्या असतांना त्यांना एका अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. यात त्या गंभीर जखणी झाला. त्यांना दवाखान्यात नेण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पुष्पा आगाशे (वय ७३) या गुरुवारी सकाळी फिरायला गेल्या होत्या. यावेळी एका भरधाव वेगातील वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. यानंतर चालक त्यांना मदत न करता घटनास्थळावरून फरार झाला. दरम्यान, आगाशे यांना रुग्णालयात नेण्यात आले होते.

# संयुक्त संसदीय समितीच्या बैठकीत राडा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली- वा**दग्रस्त वक्फ विधेयकावरील संयुक्त संसदीय समितीचा (जेपीसी) ५०० पानी अहवाल तयार झाला आहे. या अहवालावर शुक्रवार आणि शनिवारी अशी दोन दिवस बैठक होऊन चर्चा होणार होती. मात्र बैठकीच्या पहिल्या दिवशीच खासदारांमध्ये गदारोळ झाला. ज्यामुळे आता विरोधी पक्षाच्या १० खासदारांना समितीमधून निलंबित करण्यात आले आहे.

निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये शिवसेना (ठाकरे) पक्षाचे अरविंद सावंत, असुदद्दीन ओवेसी यांचा समावेश आहे. या बैठकीत अहवालावर चर्चा होऊन ते विधि मंत्रालयाकडे दिले जाणार होते. यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर विधेयक मांडले जाण्याची शक्यता आहे.

**नेमका वाद काय झाला?**

भाजपाचे खासदार जगदंबिका पाल हे या संयुक्त संसदीय समितीचे अध्यक्ष आहेत. ते म्हणाले की, आज आम्ही जम्मू-काश्मीरमधील शिष्टमंडळ मीरवाईज उमर फारूक यांच्या शिष्टमंडळाला त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी वेळ दिला होता. मात्र संसदेत विधेयकाच्या चर्चेत सहभागी न होणारे असदुद्दीन ओवेसी आज मात्र चर्चेत सहभागी झाले.

तसेच तृणमूल काँग्रेसचे खासदार कल्याण बॅनर्जी यांनी माझ्याशी असभ्य वर्तन करत असंसदीय भाषा वापरली. मी त्यांना शांत करण्याचे आवाहन करत होतो. पण ते ऐकायला तयार नव्हते. अखेर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी खासदारांचे निलंबन करण्याचा प्रस्ताव दिला.

# १७ वर्षीय तरुणीवर तिघांचा बलात्कार!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-** पुण्यात पिंपरी चिंचवड येथील रावेत परिसरात एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर तिघांनी दारू पिऊन बलात्कार केल्याचं उघड झालं आहे. धक्कादायक म्हणजे आरोपींनी ट्रूथ अँड डेअर खेळत हा अत्याचार केला आहे. पीडितेवर अत्याचार सुरू असताना अचानक पीडितेच्या नातेवाईकांना फोन लागला, त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे. आयुष आनंद भोईटे, सुशील बालद्र ठाकूर आणि रीतिक संजय सिंग असे आरोपींची नावे आहेत. पीडितेची व आरोपी हे एकमेकांच्या थेट ओळखीचे नव्हते. पीडित मुलीची इन्स्टाग्रामवर एका रीलस्टार तरुणीशी ओळख झाली होती. ही घटना घडली तेव्हा ती या तरुणीला भेटायला आली होती. यावेळी पीडित ही तिच्या रुमवर थांबली होती. रीलस्टार मैत्रीण ही तिच्या तीन मित्रांसमोर रावेत परिसरात एका पार्टीला गेले होते. तेथून ते दारू पिऊन आले होते. रीलस्टार मैत्रीनीने पीडित मुलीला फोन करत पार्टीला बोलावले. दरम्यान, आरोपी हे पीडित मुलीच्या पेईंग गेस्ट रूमवर गेले. व तिला ते पार्टीला घेऊन आले. यानंतर ते एकाच्या फ्लॅटवर गेले. दारूच्या नशेत त्यांनी ट्रूथ अँड डेअर गेम खेळने सुरू केले.

» अत्याचार

### दोन लाख बांगलादेशींना जन्म दाखल्याचे वाटप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर हल्ला करणारा आरोप बांगलादेशी असल्याचा आरोप झाल्यानंतर आता महाराष्ट्रात किती बांगलादेशी घुसखोर आहेत, याची चर्चा सुरू झाली. भाजपा नेते किरीट सोमय्या हे या प्रकरणी पाठपुरावा करत असून ते विविध जिल्ह्यांचा दौरा करत आहेत. राज्यात दोन लाख बांगलादेशी रोहिंग्या मुस्लीमांना बनावट जन्म प्रमाणपत्र देण्यात आले आहेत. मालेगावपासून याची सुरुवात झाली असल्याचा आरोप सोमय्या यांनी केला. मालेगावमधील दोन राजकीय नेते, दहशतवादी संघटनेचे नेते आणि सीमेवरील दोन एजंट यात सामील आहेत.

» पान ७ वर

# स्कूलबसमध्ये आता महिला मदतनीस नेमल्या जाणार

**सुरक्षा बालचमूंची**

**नवीन शासन धोरणांनुसार विद्यार्थी वाहतूक बसमध्ये मुली असतील तर महिला सुरक्षा मदतनीस नेमणे अनिवार्य आहे. यानुसार परिवहन महामंडळाने बसमध्ये सुरक्षा मदतनीस पुरविण्याबाबत शिक्षण विभागाकडे मागणी केलेली होती. एकूण ४८ बसद्वारे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यात येते.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महापालिका प्राथमिक विभागाकडील विद्यानिकेतन व क्रीडानिकेतन शाळेतील विद्यार्थी वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने महापालिकेच्या शाळांसाठीच्या स्कूल बसमध्ये आता महिला मदतनीस नेमल्या जाणार आहेत. त्यासाठी महापालिकेच्या पुढील वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद केली जाणार आहे.

शिक्षण विभाग (प्राथमिक) यांच्या विद्यानिकेतन व क्रीडानिकेतन शाळेतील विद्यार्थी वाहतुकीसाठी पुणे परिवहन महामंडळ पीएमपी यांच्याकडून बस पुरविण्यात येतात.



नवीन शासन धोरणांनुसार विद्यार्थी वाहतूक बसमध्ये मुली असतील तर महिला सुरक्षा मदतनीस नेमणे अनिवार्य आहे.

यानुसार परिवहन महामंडळाने बसमध्ये सुरक्षा मदतनीस पुरविण्याबाबत शिक्षण विभागाकडे मागणी केलेली होती.

एकूण ४८ बसद्वारे मनपा शाळेतील विद्यार्थ्यांची वाहतूक करण्यात येते. ही बाब विचारात घेऊन विद्यार्थी वाहतूक बसमध्ये महिला सुरक्षा मदतनीस यांची नेमणूक करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

पुढील काही दिवसांत हे मदतनीस नेमले जाणार आहेत. राज्यातील वेगवेगळ्या शहरांमध्ये स्कूलबस चालकांकडून मुली तसेच लहान मुलांवर होत असलेल्या अत्याचारांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाकडून विद्यार्थी बस वाहतुकीचे नवीन शासन धोरण जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार, या मदतनीस नेमल्या जाणार असल्याची माहिती शिक्षण मंडळाचे उपायुक्त आशा राऊत यांनी दिली.

#रा

# नागरिकांना जलशुध्दीकरणाची 'साथ'...!

## सिंहगड रस्त्यावरील नागरिकांसाठी प्रशासन 'अलर्ट मोड'वर पाण्यासाठी आता क्लोरिनची 'मात्रा'

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** "गुइलेन बॅरे सिंड्रोम'चे संशयित रुग्ण आढळलेल्या सिंहगड रस्त्यावरील किरकिटवाडी, नांदोशी, बारंगणे मळा, धायरी, खडकवासला या गावांना शक्य तितक्या लवकर महापालिकेच्या जलशुद्धीकरणातून शुद्ध केलेले पाणी द्यायला हवे,' असे महापालिकेने केलेल्या पाण्याच्या तपासणी अहवालामध्ये म्हटले आहे. दरम्यान, 'या भागातील विहिरी आणि जलस्रोतांमध्ये कोणतेही दूषित घटक आढळलेले नाहीत. मात्र, खबरदारी म्हणून क्लोरिनची दुप्पट मात्रा वापरण्याचा आदेश दिला आहे,' असे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी सांगितले.

महापालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या खडकवासला, किरकिटवाडी तसेच धायरी, नांदोशी या गावांतील नागरिकांमध्ये 'गुइलेन बॅरे सिंड्रोम' आजाराची लक्षणे आढळल्याचे समोर आल्यानंतर गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीतून खराब पाण्याचा पुरवठा झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला होता. ज्या विहिरीतून गावांना पाणीपुरवठा केला जातो, त्या विहिरीची पाहणी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी केली. यावेळी महापालिकेचे पाणीपुरवठा विभागातील वरिष्ठ अधिकारी, आरोग्य विभागातील अधिकारी यांच्यासह पालिकेच्या विविध विभागातील अधिकारी उपस्थित होते.

महापालिकेने या गावांतील पाण्याचे नमुने घेऊन तपासणीसाठी पाठविले होते. त्याचा अहवाल आला आहे. यामध्ये काही भागातील मोजक्या तक्रारी वगळता बहुतांश ठिकाणी पाण्यामध्ये क्लोरिनची मात्रा पुरेशी (रेसिड्युअल क्लोरिन टेस्ट) आढळली, असे पर्वती जलकेंद्राच्या रसायनशास्त्रज्ञांच्या अहवालात म्हटले आहे. या परिसरात दिल्या जाणाऱ्या पाण्यामध्ये 'कॉलिफॉर्म' व 'ई कोलाय बॅक्टेरिया' नसल्याचे पालिकेच्या अहवालामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे. या गावांतील नागरिकांना सध्या केवळ पाण्याचे निर्जंतुकीकरण करून पुरवठा केला जातो. त्यामुळे पाण्याचा गढूळपणा व 'झू प्लान्कटन'सारखे (सायक्लोप्स) घटक नियंत्रित करणे शक्य होत नाही, असे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यामुळे या गावांमधील नागरिकांनाही महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रातून पाणी देण्याची व्यवस्था लवकरात लवकर करावी, अशी शिफारस अहवालात केली आहे.

विहिरीला प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांशी चर्चा केल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी दिली. 'या गावातील विहिरी व जलस्रोतांमध्ये कोणतेही दूषित घटक आढळलेले नाहीत. मात्र, खबरदारी म्हणून क्लोरिनची दुप्पट मात्रा वापरण्याचा आदेश पाणीपुरवठा विभागाला दिला आहे. काही ठिकाणी जलवाहिन्यांशेजारी सांडपाणी साठत असल्याची स्थानिकांची तक्रार आहे.

### विहिरीला संरक्षक जाळी बसविणार

● नांदेड गावातील विहिरीला संरक्षक जाळी नाही. याकडे नागरिकांनी आयुक्तांचे लक्ष वेधले. त्यावर विहिरीला तातडीने संरक्षक जाळी बसवून घेण्याच्या व पाण्याची नियमित तपासणी करण्याच्या सूचना आयुक्त भोसले यांनी दिल्या.

● किरकटवाडी, खडकवासला भागातील नागरिकांना महापालिकेच्या वतीने ज्या विहिरीतून पाणीपुरवठा केला जातो त्या विहिरीला जाळीदेखील नाही. त्यामुळे विहिरीत कचरा पडू शकतो. याच विहिरीजवळ सांडपाणी वाहिन्यांचे चेंबर आहेत. तसेच, विहिरीच्या आसपास कचरा पडलेला असल्याने आरोग्याच्या समस्या निर्माण होऊ शकतात, अशी तक्रार स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.



येथे साचलेले पाणी काढून टाकून आवश्यक तेथे नव्या सांडपाणी वाहिन्या टाकण्याच्या सूचना दिल्या आहेत. आरोग्य विभागाची ८५ पथके या परिसरात सर्वेक्षण करत आहेत. फक्त 'फिल्टर' केलेले पाणी पिण्यासाठी योग्य नसल्याने बाधित रुग्ण आढळलेल्या परिसरातील नागरिकांनी सध्या पाणी उकळून थंड करून प्यावे, अशी सूचना करण्यात आली आहे. सविस्तर अहवाल लवकरच प्राप्त होईल.
**— डॉ. राजेंद्र भोसले,** महापालिका आयुक्त

## पुण्यात काय घडतंय...

### संविधान सन्मान दौड २०२५



- **आयोजक :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती पुणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण व संशोधन संस्था ( BARTI), संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि पुणे जिल्हा हौशी ॲथलेटीक्स असोसिएशन
- **स्पर्धेचे उद्‌घाटक -** उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील ( पहाटे ५. ३० वाजता)
- **पारितोषिक वितरण :** हस्ते : रामदास आठवले, मुरलीधर मोहोळ, माधुरी मिसाळ, जितेंद्र डुडी
- **संयोजक: परशुराम वाडेकर, विजय खरे**

- **कुठे :** खाशाबा जाधव क्रीडा संकुल, सावित्रीाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
- **कधी : शनिवार दि. २५ जानेवारी, सकाळी ८ वाजता**
- **शुल्क :** कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला

### पुस्तक प्रकाशन सोहळा



- **पुस्तकाचे नाव : 'लग्न'**
- **लेखक :** प्रसिध्द लेखक आणि व्यावसायिक विनायक वझे
- **प्रकाशक :** अमित सातपुते, अमित प्रकाशन
- **प्रकाशन हस्ते :** खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी
- **प्रमुख उपस्थिती :** प्रसिध्द व्याख्याते रमण चितळे

- **कुठे :** शैलेश सभागृह, अलकांर पोलीस स्टेशन जवळ, कर्वेनगर
- **कधी : शनिवार दि. २५ जानेवारी, सकाळी ११ वाजता**
- **शुल्क :** कार्यक्रम सर्वांसाठी विनामूल्य खुला

### मोफत आरोग्य शिबीर



- **आयोजक:** बहुजन हिताय संघ, प्रबुध्द प्रेरणा विहार, बहुजन हिताय महिला संघ, बहुजन हिताय सार्वजनिक ग्रंथालय व वाचनालय, सम्यक संकल्प ज्येष्ठ नागरिक संघ विद्यानगर, संजीवनी ऑरगॅनिक्स लाकडी घाणा विद्यानगर
- **सहभागी डॉक्टर:** डॉ. ज्योती दवे (होमिओपॅथी), डॉ. सुरेश कठाणे (आयुर्वेद), डॉ. अविनाश दलाल (त्वचा रोग तज्ञ), डॉ. संघमित्रा खोब्रागडे ( स्त्री रोग तज्ञ), विजय दवे ( संचालक, एम पॉवर चॅरीटेबल ट्रस्ट), नरेश कांबळे ( मधुमेह समुपदेशन), अश्विनी भोसले (शरीरातील चरबी मोजणे)

- **कुठे :** प्रबुध्द प्रेरणा विहार, रस्ता नं. १४आय, विजयराव टिंगरे गार्डन शेजारी, विद्यानगर
- **कधी :** रविवार दि. २६ जानेवारी सकाळी ११ ते १
- **शुल्क :** तपासण्या सर्वांसाठी मोफत

# युवा सेना शाखेच्या नामफलकाचे अनावरण



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** शिवसेना पक्ष प्रमुख, हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या ९९ व्या जयंती निमित्त सुनिता नगर, द्वारका गार्डन शेजारी, वडगावशेरी या ठिकाणी युवासेना शाखेच्या नवीन नाम फलकाचे सनी गवते युवासेना शहर अधिकारी, सतीश मुळीक शिवसेना समन्वयक, दिलीप देवकर पाटील उद्योजक, विनोद पऱ्हाड शिवसेना समन्वयक, सुरेश अल्हाट शिवसेना उपविभाग प्रमुख, राहुल शेडगे शिवसेना शाखा प्रमुख यांचे हस्ते उद्‌घाटन करण्यात आले. त्याच वेळी सहकारी मित्र प्रसाद लोखंडे, प्रशांत देशमुख, हे देखील उपस्थित होते, यासह वडगावशेरीतील शिवसेना, युवासेना पदाधिकारी यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला.

यावेळी अँड सतीश मुळीक यांनी कार्यकर्त्यांना भविष्यातील वाटचालीसह पक्षवाढीसाठी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी देखील पूर्वी प्रमाणेच पक्षाला गतवैभव मिळवून देण्यासाठी निष्ठेने सर्वस्वी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली.कार्यक्रम पार पाडण्यासाठी वडगावशेरीतील युवासेना पदाधिकारी सोनू पाटील, सचिन पगारीया, आदिनाथ फडतरे, शुभम वंजारे, राकेश कांबळे, रोहन भांडे, अंकित अहिरे, सलमान शेख, महेश जगताप, अमीर शेख, अभिनंदन वाघमारे, योगेश साकोरे, नितीन काशीद, रवी रेमजी, सौरभ बापट, विवेक वाडेकर, अनिल जाधव, किशोर अहिरराव, समर्थ जठार, यांनी विषेश परिश्रम घेतले.तरी सर्व उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्ते, मित्र परिवार यांचे शिवप्रसाद जठार यांनी मनापासून आभार व्यक्त करत धन्यवाद व्यक्त केले.



**गेल्या काही वर्षांच्या कालावधीत शिवसेनेच्या ठाकरे गटाच्या माध्यमातून वडगावशेरी आणि या परिसरात मोठ्या प्रमाणावर लोकोपयोगी कामे मार्गी लावण्यात आली आहेत, त्यामुळेच या भागात शिवसेनेची लोकप्रियता अधिक प्रमाणात वाढत आहे. विशेष म्हणजे नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी तळागाळातील शिवसैनिक नेहमीच प्रयत्न करत आला आहे, त्यातूनच समाजाच्या प्रती असलेली सामजिक बांधीलकी जोपासण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.**
**— शिवप्रसाद जठार,** उप शहर प्रमुख, युवा सेना

# लाडक्या बहिणींसाठी हळदी-कुंकू संपन्न

### पतित पावन संघटनेतर्फे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पतित पावन संघटनेतर्फे गुरुवार पेठेतील जिव्हेश्वर सभागृह येथे लाडक्या बहिणींसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कुमावत समाज विकास सेवा संस्थेचे महाराष्ट्र राज्य युवा अध्यक्ष, पतित पावन संघटनेचे पुणे शहर अध्यक्ष आणि बारा बलुतेदार संघाचे पुणे शहर कार्याध्यक्ष स्वप्निल (बघराणा) नाईक यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमात कन्यादान स्वरूपाचे वाण म्हणून पाच भांड्यांचा सेट देऊन बहिणींना सन्मानित करण्यात आले. यावेळी कसबा मतदार संघाचे आमदार हेमंत रासने यांच्या पत्नी मृणालिनी हेमंत रासने उपस्थित होत्या. कार्यक्रमात हजारोंच्या संख्येने बहिणी उपस्थित होत्या. यावेळी लव्ह जिहाद या विषयावर मार्गदर्शन करुन माता-भगिनींना स्वसंरक्षणाचे महत्त्व समजावण्यात आले आणि लव्ह जिहाद विरोधात सजग राहण्याचे आवाहन केले.

स्वप्निल नाईक म्हणाले, समाजातील अन्यायाविरोधात माताभगिनींना जागरूक करण्याचा प्रयत्न करुन लव्ह जिहाद सारख्या समस्येवर एकत्र यायला हवे. हिंदू समाजाने परंपरा, संस्कृती, आणि सामुदायिक पालकत्व टिकवले पाहिजे.



● **पतित पावन संघटनेतर्फे गुरुवार पेठेतील जिव्हेश्वर सभागृह येथे लाडक्या बहिणींसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित महिला.**

# 'सरहद्द' मध्ये संगीतमय कार्यक्रम उत्साहात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलना अंतर्गत सरहद ग्लोबल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज गुजर निंबाळकरवाडी शाळेचा, कात्रज येथील सरहद संस्थेच्या मुख्य शाखेमध्ये भावगीत, गवळण, नाट्य गीत, अभंग, लावणी या गीत प्रकारांनी नटलेला हे *सुरांनो चंद्र व्हा* हा संगीतमय कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या मुख्य गायिका .मनिषा वाडेकर यांनी आपल्या सुरेल आवाजाने रसिकांना मंत्रमुग्ध केले. हे सुरांनो चंद्र व्हा या शिर्षक गीताने वातावरण संगीतमय झाले.सहगायक अशोक लांडगे ,मोना भोरे, सुदाम कुंभार, अर्पिता कठाळे, इरा देशपांडे, राजू चांदगुडे यांनी विविध प्रकारची भक्तिगीते , भावगीते, गवळण व युगल गीते सादर केली. रोहित ठाकूर व आदेश जाधव यांची तबल्याची जुगलबंदी रसिकांना आवडली..या अप्रतिम संगीताच्या मेजवानीने व गायकांच्या बहारदार सादरीकरणाने स्वरसाज चढविला. हा स्वर मनात रुंजी घालून गेला. वाद्यवृंदांमध्ये संगीतकार अजय कांबळे व अनिकेत नलावडे यांनी की बोर्ड, राजू चांदगुडे यांनी हार्मोनियम, रोहित ठाकूर व आदेश जाधव यांनी तबला साथसंगत केली. प्रमुख अतिथी वरिष्ठ पोलीस निरीक्षक सावळाराम साळगावकर यांनी सरहद संस्थेने साहित्य संमेलनाचा आयोजक पद स्वीकारल्याबद्दल संस्थेचे अभिनंदन केले, तसेच भावी उपक्रमास शुभेच्छा दिल्या . तसेच कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून कवी गोपाळ कांबळे, धनंजय पुरकर संचालक डीएसपी प्रोडक्शन व संस्थेचे विश्वस्त शैलेश वाडेकर , अनुज नहार, अभय नहार, शाळेच्या मुख्याध्यापिका निर्मला नलावडे, प्राथमिक विभाग प्रमुख कोमल दिवटे, सर्व विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थेच्या सचिव सुषमा नहार यांनी मार्गदर्शन केले. निवेदन शितल सदामते व श्रीराज भोर यांनी केले .माऊली माऊली या सामूहिक गजराने कार्यक्रमाची सांगता झाली.

## Selected

# डॉ. शोभा नेताजी जाधव यांना "गुणवंत शिक्षक" पुरस्कार



**पुणे :** महात्मा ज्योतिराव फुले इतिहास अकादमी यांच्यातर्फे 'महात्मा फुले - सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार-२०२५' देऊन श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या अध्यापक महाविद्यालय (अरण्येश्वर, पुणे) येथील प्रा. डॉ. सौ. शोभा नेताजी जाधव यांना माजी खासदार संभाजी महाराज छत्रपती यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हा कार्यक्रम एस एम जोशी सभागृह पुणे येथे महात्मा ज्योतिराव फुले इतिहास अकादमी या संस्थेचे अध्यक्ष व इतिहास संशोधक डॉ. श्रीमंत कोकाटे यांच्या उपस्थितीत पार पडला.प्रा. डॉ शोभा नेताजी जाधव या गेली २१ वर्षे शिक्षण क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत.त्यांनी 'सामाजिक बुद्धिमत्ता कार्यक्रम विकसन व त्याच्या परिणामकारकतेचा अभ्यास' या विषयामध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये प्रबंध सादर करून पीएचडी संपादन केली आहे. तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध शैक्षणिक आणि सामाजिक विषयावर ३० हून अधिक शोधनिबंध सादर केले आहेत. श्री शिवाजी मराठा सोसायटीचे सचिव अण्णासाहेब थोरात ,सदस्य आणि अध्यापक महाविद्यालय अरणेश्वरचे प्राचार्य डॉ.बापूसाहेब चौगुले, प्राध्यापक ,प्राध्यापकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

# पुणेकरांच्या पाणी वापराची 'मेख' वेगळीच; वर्षात पाणीबचत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणेकरांच्या पाणीवापरावर आतापर्यंत विविध राजकारण्यांनी टीकास्र सोडले आहे, त्यासाठी पाणी जपुन वापरण्याचा सल्लाही अनेकांनी पुणेकरांना दिला होता. मात्र; त्यातील खरी ' मेख' वेगळीच असल्याची बाब आता पुढे येऊ लागली आहे. हे पाणी कालव्याच्या माध्यमातून घेत असल्याने या पाण्याची ' गळती' होत असल्याचे खरे दाहक वास्तव उजेडात आले असून महापालिका आता बंद जलवाहिनीतून पाणी घेत असल्याने वर्षभरात तब्बल दोन टीएमसी पाण्याची बचत झाली आहे, विशेष म्हणजे त्यामुळे प्रशासनाची आर्थिक बचतही झाली आहे.

मागील वर्षापासून पालिकेचा पाणी वापर दोन टीएमसीने घटला आहे. पाटबंधारे विभागाच्या आकडेवारीनुसार २०२०-२१ मध्ये पालिकेने २२.१९ टीएमसी, २०२१-२२ मध्ये २२.७१ टीएमसी, २०२२-२३ मध्ये २२.७७ टीएमसी तर २०२३-२४ मध्ये २०.९९ टीएमसी पाणी वापरले आहे. मागील वर्षापर्यंत महापालिका खडकवासला कालव्यातून ७० एलएलडी पाणी प्रतीदिन उचलत होती. मात्र, पाण्याची पातळी ठेवण्यासाठी २०० एमएलडी पाणी खडकवासला धरणातून सोडावे लागत होते. त्यामुळे या वाढीव पाण्याचे बिल महापालिकेला येत होते. त्यामुळे आता पालिकेने हे पाणी बंद जलवाहिनीतून घेण्यास सुरूवात केल्याने वर्षाला दोन टीएमसी पाणी वाचत आहे.

महापालिका जादा पाणी वापरत आहे. तो कमी करण्यासाठी तगादा लावत असलेल्या पाटबंधारे विभागाने आता पाण्याच्या थकीत बिलासाठी तगादा लावला आहे. महापालिकेकडे जादा पाणी वापराचा दंड, चालू वर्षाचे पाण्याचे बिल तसेच शहरात निर्माण होणारे सांडपाणी शुद्ध न करण्याचा दंड अशी ही थकबाकी असल्याचा दावा केला जात आहे. ही थकबाकी तत्काळ जमा करण्याची सूचना करण्यात आली आहे.

याबाबतचे पत्र नुकतेच महापालिका प्रशासनास पाठविण्यात आले आहे. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जानेवारीत मुंबईत झालेल्या बैठकीत ही थकबाकी वसूल करण्याचे आदेश देण्यात आले असून त्यानुसार ही निधीची मागणी करण्यात आली आहे.

### असा घातला प्रशासनाला आर्थिक गंडा

● त्यात मंजूर आरक्षणाच्या पाण्याच्या बिलाचे ६१ कोटी ८७ लाख, अतिरिक्त पाणी वापराचा दंड १११. ९८ कोटी, प्रदूषण महामंडळाची दंडनीय रक्कम ५४० कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीचा समावेश आहे. महापालिकेस १४.६१ टीएमसी पाणी २०२३-२४ साठी मंजूर असून महापालिकेने प्रत्यक्षात २० टीएमसी पाणी वापरल्याने त्यावर १११ कोटी ९८ लाखांचा दंड आकारण्यात आला आहे.

# जिल्हा परिषद कनिष्ठ अभियंता निलंबीत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**प्रशासन**

**पुणे :** जिल्हा परिषदेने जनसुविधाअंतर्गत बारामती तालुक्यातील वाघळवाडी येथे मंजूर केलेले काम प्रत्यक्ष मंजुरीच्या ठिकाणी न करता इतर ठिकाणी केल्याप्रकरणी कनिष्ठ अभियंता अक्षय नंदकुमार झारगड यांना निलंबित करण्यात आले आहे.

जिल्हा परिषदेमध्ये कनिष्ठ अभियंता निलंबनाची गेल्या पंधरा दिवसातील दुसरी कारवाई आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी मंगळवारी ही कारवाई करून आणखी एक दणका दिला आहे. बांधकाम विभागामध्ये अनेक कनिष्ठ अभियंत्यांच्या चौकशी सुरू आहेत मात्र कोणत्या ना कोणत्या कारणास्तव त्या प्रलंबित ठेवून एक प्रकारे त्यांना पाठीशी घातले जात असल्याचे चित्र निर्माण झाले होते.

प्राधिकृत अधिकाऱ्याची परवानगी न घेता परस्पर हा बदल करून काम केले गेले. झारगड यांच्याबद्दल अनेक गंभीर तक्रारी आहेत. याप्रकरणी गावकऱ्यांची तक्रार, त्याचबरोबर बारामती पंचायत समितीचे उपअभियंता यांचा अहवाल आणि कार्यकारी अभियंता यांच्याकडून झालेली चौकशी या सर्व बाबी विचारात घेऊन झारगड यांचे निलंबन करण्यात आले.

## हिंद गंधर्व संगीत महोत्सवाने होणार तुळशीबाग मंडळाचा शतकोत्तर रौप्यमहोत्सव

# धार्मिक कार्यक्रमांसह विविध कार्यक्रमांचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** मानाचा चौथा गणपती श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट यंदाच्या वर्षी सन २०२५ साली शतकोत्तर रौप्य महोत्सवी (१२५) वर्ष साजरे करीत आहे. त्यानिमित्ताने हिंद गंधर्व संगीत महोत्सव आणि सामाजिक व धार्मिक उपक्रमांचे आयोजन दि. २८ जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाचे कोषाध्यक्ष नितीन पंडित यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला मंडळाचे अध्यक्ष विकास पवार, स्वागताध्यक्ष कृष्णकुमार गोयल, उपाध्यक्ष विनायक कदम, कोषाध्यक्ष नितीन पंडित, बांधकाम व्यावसायिक सुशीलकुमार देशमुख, राजेश गिरे, सुभाष सरपाले मंडळाचे विश्वस्त दत्ताभाऊ कावरे, मोहन साखरीया, राजेश दातार, अभिनेत्री वाळके, मयूर दिवेकर, साई डोंगरे, प्रतिक इप्ते, चकोर सुबंध यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त स्वागत समिती करण्यात आली असून प्रख्यात उद्योजक कृष्णकुमार गोयल यांची स्वागताध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. तसेच इतर मान्यवरांचाही यामध्ये समावेश आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली वर्षभर विविध कार्यक्रमांचे व सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

नितीन पंडित म्हणाले, शुभारंभ सोहळा मंगळवार, दि. २८ जानेवारी रोजी सायंकाळी ५.३० वाजता टिळक स्मारक मंदिर येथे होणार आहे. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या शुभहस्ते बोधचिन्हाचे अनावरण होईल. बुधवार, दि.२९ जानेवारी रोजी शास्त्रीय गायक राजेश दातार यांचा भक्ती संगीताचा कार्यक्रम आणि गुरुवार, दि.३० जानेवारी रोजी गायक जितेंद्र भुरूक आणि सहकारी यांचा सिनेसंगीताचा गितोंका सफर हा कार्यक्रम होईल. हे दोन्ही कार्यक्रम टिळक स्मारक मंदिरात रात्री ९ वाजता होणार आहे.

शुक्रवार दि. ३१ जानेवारी रोजी तुळशीबागेत भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.



तब्बल १३० वर्षांहून अधिक काळाची गणेशोत्सवाची वैभवशाली परंपरा आपल्या पुण्यनगरीस लाभलेली आहे. दरवर्षी हा उत्सव मोठ्या उत्साहात धार्मिक पद्धतीने संपन्न होत असतो. अशा या सांस्कृतिक पुण्यनगरीतील श्री तुळशीबाग गणेशोत्सव मंडळाच्या १२५ व्या वर्षा निमित्त विविध उपक्रम होणार आहेत. त्याची सुरुवात हिंद गंधर्व संगीत महोत्सवाने होत असून त्यानंतर भव्य आरोग्य शिबिर आणि श्री गणेश जन्म सोहळा थाटात साजरा करण्यात येणार आहे.
**—कृष्णकुमार गोयल,** स्वागताध्यक्ष, उत्सव समिती

#रा

## At a Glance

### सराईत मोबाईल चोरटा जेरबंद

**पुणे :** स्वारगेट एसटी स्थानकात प्रवाशांचे मोबाइल चोरणाऱ्या चोरट्याला स्वारगेट पोलिसांनी अटक केली आहे. चोरलेल्या मोबाइलची खरेदी करणाऱ्या दुकानदारालाही पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून ७ लाख ४३ हजारांचे ४३ मोबाइल, लॅपटॉप असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सतीश ज्ञानेश्वर शिरोळे (वय ३२, रा. दहिटणे, ता. दौंड) असे अटक केलेल्या चोरट्याचे नाव आहे. शिरोळेकडून चोरलेले मोबाइल संच खरेदी करणारा दुकानदार मोहमद शाहिद इलियास अन्सारी (वय ३४, रा. अश्रफनगर, कोंढवा) याला अटक करण्यात आली आहे.

स्वारगेट एसटी स्थानकात प्रवाशांचे मोबाइल संच चोरून नेण्याच्या घटना घडल्या होत्या. स्वागरेट पीएमपी स्थानक परिसरात शिरोळे थांबला होता. त्याच्या संशयास्पद हालचाली तपास पथकातील कर्मचाऱ्यांनी टिपल्या. पोलिसांनी हटकल्यानंतर तो पळाला. पोलिसांनी पाठलाग करुन त्याला पकडले. चौकशीत आरोपी सतीश शिरोळे याने स्वारगेट, पुणे स्टेशन परिसरातून तीन मोबाइल संच चोरल्याची कबुली दिली.

परिमंडळ दोनच्या पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील, सहायक आयुक्त राहुल आवारे, स्वारगेट पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक युवराज नांद्रे, सहायक निरीक्षक राहुल कोलंबीकर, उपनिरीक्षक रवींद्र कस्पटे, अश्रुबा मोराळे, सचिन तनपुरे, सुजय पवार, दीपक खेंदाड, हर्षल शिंदे, फिरोज शेख, हनुमंत दुधे, रमेश चव्हाण, प्रशांत टोणपे, संदीप घुले यांनी ही कामगिरी केली.

# कोट्यवधींचा 'स्मार्ट' महाघोटाळा!

## प्रिपेड वीजमीटरमुळे ग्राहकांना ' झटका': कामगार संघटनांचा थेट शासनावर आरोप

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बहुचर्चित आणि वादग्रस्त बनलेल्या 'स्मार्ट प्रिपेड' वीजमीटरच्या महाघोटाळयाची व्याप्ती दिवसेंदिवस अधिकच वाढत चालली आहे; या मीटरमुळे ग्राहकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार असून त्यामध्ये तब्बल सहा हजार कोटी रुपयांचा घोटाळा झाला आहे असा थेट आरोप कामगार संघटनांनी केला आहे. या मीटरच्या विरोधात थेट कामगार संघटनांनीच तीव्र भूमिका घेतल्याने या मीटरचे ' भवितव्य' च अंधकारमय झाले आहे.

गेल्या काही वर्षांच्या कालावधीत तत्कालीन विद्युत मंडळाच्या कारभाराचा व्याप मोठ्या प्रमाणावर वाढल्याने या मंडळाचे चार कंपन्यात विभाजन करण्याचा निर्णय राज्य शासनाने २००५ मध्ये घेतला होता. त्यानंतर या मंडळाचे महावितरणम्, महापारेषण, महानिर्मिती आणि सूत्रधारी या चार कंपन्यांमध्ये विभाजन करण्यात आले होते. त्यामध्ये महावितरण या कंपनीचा ग्राहकांशी थेट संबध येत आहे, या मंडळाच्या कारभाराचे चार कंपन्यांमध्ये विभाजन झाल्यानंतर त्यांच्यावरील कारभाराचा ताण काही प्रमाणात कमी होइल असा राज्य शासन आणि प्रशासनाचाही कयास होता. मात्र; गेल्या वीस वर्षांच्या कंपन्यांच्या कारकिर्दीत राज्य शासन आणि प्रशासनाचा अंदाज साफ चुकला आहे.

वीजेची मागणी आणि पुरवठा यांच्यात ताळमेळ बसविण्यात प्रशासनाला बहुतांशी प्रमाणात यश आले आहे, त्यासाठी प्रशासन आणि राज्य शासनाने घेतलेले निर्णय निश्चितपणे फलदायीच ठरले आहेत. मात्र; थकबाकीचा टक्का मोठ्या प्रमाणावर वाढला आहे, विशेष म्हणजे राज्यभरातील लाखो ग्राहकांकडे कोट्यावधी रुपयांची थकबाकी अडकली आहे. ही थकबाकी वसूल करण्यासाठी प्रशासन आणि राज्य शासनाने प्रभावशाली योजना राबविल्या, त्यामध्ये काही प्रमाणात यश आले असले तरीही थकबाकीचा आकडा दिवसेंदिवस अधिकच वाढत आहे.

त्यावर पर्याय म्हणून आता प्रशासन आणि राज्य शासनाने ग्राहकांना स्मार्ट प्रिपेड वीजमीटर बसविण्याचा निर्णय घेतला आहे, त्यासाठी सव्वा दोन कोटींहूनही अधिक प्रिपेड वीजमीटरची खरेदी करण्यात आली आहे. मात्र; या मीटरच्या खरेदीतच कोट्यावधी रुपयांचा घोटाळा झाल्याचा थेट आरोप आता कामगार संघटनांनी केला आहे. वीजकंपन्यांमध्ये सर्वात महत्वाची समजली जात असलेल्या महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनने हे वीजमीटर ग्राहकांना बसविल्यास जुने मीटर फेकून देण्याची वेळ प्रशासनावर येइल आणि त्याचा अनपेक्षितपणे आर्थिक फटका हा ग्राहकांनाच सहन करावा लागेल असा आरोप केला आहे, त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत हे मीटर बसवू देणार नाही असा इशाराही या संघटनेने दिला आहे.




### असे आहेत फेडरेशनचे ' स्मार्ट' आरोप

- हा निर्णय वीजकंपन्यांना खासगीकरणाकडे नेणारा
- मीटर भंगारात फेकून द्यावे लागणार
- बसणार थेट भुर्दंड
- वाढण्याची शक्यता
- खासगी उद्योजकांसाठी राज्य शासनाचा अवसानघातकी निर्णय
- कवडीमोल किंमतीने विकण्याचा डाव
- हजार कामगारांवर बेरोजगारीचे गंडातंर



राज्य शासनाचा हा निर्णय निश्चितच ग्राहक हिताचा नाही, याउलट ग्राहकांना त्यामुळे आर्थिक तोटाच सहन करावा लागणार आहे. ही बाब लक्षात घेऊनच या स्मार्ट मीटरला लाखो कामगारांचा विरोध आहे. विशेष म्हणजे या माध्यमातून वीजकंपन्या अधिक सक्षम करुन त्या सुस्थितीत आल्यानंतर त्या खासगी ठेकेदारांच्या घशात घालण्याचा शासन आणि प्रशासनाचा डाव आहे, त्यांचा हा प्रयत्न कदापीही यशस्वी होउ देणार नाही."

**— कॉ. मोहन शर्मा,** अध्यक्ष महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन



आतापर्यंत बसविण्यात आलेले ' स्मार्ट' मीटर सपशेल अपयशी ठरले आहेत, त्याशिवाय कंपनीचे अडीच कोटी जुने मीटर हे भंगारात फेकून द्यावे लागणार आहेत. त्याचा सर्वाधिक आर्थिक फटका हा कंपनी अथवा राज्य शासनाला नव्हे तर ग्राहकांना दरवाढीच्या माध्यमातून सहन करावा लागणार आहे, त्यासाठीच या मीटरला ग्राहकांचा आणि कामगार संघटनेचाही विरोध असणार असून हा विरोध कायम राहील."

**— भिमाशंकर पोहेकर,** उपाध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशन

# लाडक्या बहिणींना ओवाळणीचा 'मोह' सुटेना

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अपात्र लाभार्थ्यांना प्रशासनाने स्वतःहून लाभ सोडण्याचे आवाहन केले आहे. त्याला प्रतिसाद देत पुण्यातील एका महिलेने स्वतःहून पुढे येत 'मला लाडक्या बहिणीचा लाभ नको', असे प्रशासनाला लेखी कळवले आहे. इतर अपात्र महिलांनी मात्र प्रशासनाच्या आवाहनाकडे दुर्लक्ष केले आहे. योजनेच्या निकषांमध्ये बसत नसल्याचे माहीत असूनही बहिणींना लाभ सोडवेना, अशी स्थिती आहे.

राज्याच्या तिजोरीवर 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा मोठा ताण पडला. असे सत्तेतील काही मंत्र्यांनी कबूलही केले. यावरून विरोधकांनी टीकाही केली. मात्र, अल्पावधीत लोकप्रिय झालेली योजना शासनाला पुढे सुरू ठेवण्यासाठी अपात्र बहिणींना वगळण्याबाबत चर्चा सुरू झाली. त्यासंदर्भात काही मंत्र्यांनी जाहीर वक्तव्ये सुद्धा केली. त्यातून मध्यम पर्याय म्हणून ज्याप्रमाणे गॅस सिलिंडरची सवलत सोडण्याचे आवाहन केंद्र सरकारने केले होते, त्याला चांगला प्रतिसाद मिळाला होता.

अनेकांनी स्वतःहून सवलत नाकारली होती. त्याच धर्तीवर प्रशासनाकडून लाडक्या बहिणींच्या निकषांत न बसणाऱ्या अपात्र महिलांनी स्वतःहुन योजनेचा लाभ सोडावा, असे आवाहन महिलांना केले आहे. जिल्ह्यात केवळ पुणे शहरातून एक महिला स्वतः पुढे आली आणि योजनेचा लाभ सोडला.

**योजना**

जिल्ह्यात वीस लाख महिलांचे अर्ज मंजूर करताना निवडणुकीच्या तोंडावर पडताळणी झाली नाही. योजनेच्या निकषांत न बसणाऱ्या महिलांना अपात्र करण्यासाठी छाननीची प्रक्रिया राबविण्याचे विचाराधीन असताना, स्वतःहून लाभ सोडण्याचे आवाहन प्रशासनाने केले. त्याला पुण्यातून तरी अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही.

### योजनेचे निकष

- महिलेचे वय १८ ते ६५ वर्षांदरम्यान असावे
- वार्षिक उत्पन्न अडीच लाखांच्या आत असावे
- सदस्य सरकारी नोकरीत नसावा, तसेच प्राप्तिकर भरणारा नसावा
- 'संजय गांधी निराधार' सारख्या अन्य कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा
- चारचाकी वाहन असणाऱ्या ५ महिला योजनेच्या लाभार्थी नसतील

### लाभ नको असल्यास

- ज्या बहिणींना लाभ नको असेल, त्यांनी लेखी अर्ज करावा
- तालुक्यातील बालविकास प्रकल्प अधिकारी (सीडीपीओ) किंवा जिल्हा परिषदेकडे लेखी अर्ज करा
- अर्जामध्ये योजनेचा लाभ स्वतःहून सोडत असल्याचे लिहून द्यावे लागणार
- जिल्हास्तरावर असलेल्या लॉगिनवरून नावे वगळण्याची प्रक्रिया

# पुणे सहकारी बँकेवर प्रशासक मंडळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे सहकारी बँकेवर राज्याचे सहकार आयुक्त व निबंधकांनी अशासकीय पाच सदस्यांचे प्रशासक मंडळ नियुक्त केले असून यामध्ये पांडुरंग राऊत, ॲड. विकास रासकर, भालचंद्र कुलकर्णी, राहुल पारखे व नेहा केदारी यांचा समावेश आहे. सहकार खात्याच्या सहा. निबंधक प्रगती वाबळे यांची प्रशासक मंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रशासक मंडळातील सर्व सदस्य हे साखर उद्योग, बँकिंग, सहकार, शेती यामधील अनुभवी असून ते या बँकेचे जुने सभासद आणि ठेवीदार आहेत. या सभासदांच्या प्रयत्नातूनच गेल्या 4 महिन्यात नवीन सभासदांकडून सुमारे 2 कोटींचे भाग भांडवल जमा केल्याने बँकेचे भाग भांडवल आता 4 कोटी 63 लाख इतके झाले असल्याने बँकेचे नक्त मूल्य (नेट वर्थ) अधिक झाले आहे. या भरीव कामगिरीमुळे ही बँक लवकरच निर्बंधमुक्त होईल व सभासदांना दैनंदिन व्यवहार लवकरच सुरळीतपणे करता येतील असा विश्वास नवनिर्वाचित प्रशासक मंडळाने व्यक्त केला आहे. यापुढे थकीत कर्ज वसूलीवर अधिक भर देणार आहे.

बँकेची स्थापना माजी खासदार स्व. ल. सो. तथा अण्णा जोशी यांच्या नेतृत्वाखाली 2003 मध्ये झाली होती. सध्या बँकेच्या पुण्यात शुक्रवार पेठ व बाणेर अशा 2 शाखा असून बँकेकडे ठेवी 9 कोटी 50 लाखांच्या आहेत तर कर्जे 5 कोटी 50 लाखांची आहेत. कोरोना काळापासून म्हणजे मार्च 2020 पासून बँकेच्या व्यावसायिक खातेदारांना आलेल्या अडचणींमुळे या बँकेची वाढत गेलेली थकीत कर्जे आणि संचित तोटा यामुळे रिझर्व्ह बँकेने मार्च 2023 पासून पुणे सहकारी बँकेवर आर्थिक निर्बंध लावले आहेत.

# विमानतळ सल्लागार समितीत ५ जणांच्या नियुक्त्या!

## केंद्रीय मंत्र्याकडून विमानतळ प्राधिकरणाकडे पाच नावे सुपूर्द

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या सल्लागार समिती केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडून पाच जणांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. यात सुधीर मेहता, अभिजीत पवार, अखिलेश जोशी, अमित परांजपे आणि अनिल टिंगरे यांचा समावेश आहे. मोहोळ यांनी खासदार या नात्याने या सर्वांची नावे भारतीय विमानतळ प्राधिकरणाला कळवली होती.

विमानतळावरील सेवा आणि सुविधा या प्रवासी केंद्रीत असाव्यात या उद्देशाने विमानतळ सल्लागार समिती कार्यरत असते. केंद्रीय मंत्री मोहोळ यांना या समितीसाठी पाच नावे सुचवण्याचा अधिकार असून या अधिकाराद्वारे मोहोळ यांनी ही नावे पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या संचालकांकडे सुपूर्द केली आहेत.

या निवडीवर सामाजिक क्षेत्रात काम करणारे अमित परांजपे म्हणाले, पुणे विमानतळावर सोईसुविधांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून येत्या वर्षभरात धावपट्टीचा विस्तारही होत आहे. या पार्श्वभूमीवर या समितीत काम करण्याची संधी मिळणे निश्चितच महत्त्वाचे आहे. प्रवाशांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि आधुनिक सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या समितीत कार्यरत राहणार आहे.

## पेशव्यांचा राजवाडा... 'शनिवार वाडा'




पुणे : शनिवारवाडा म्हणजे पुण्याच्या संस्कृतीचे प्रतिक. अशा शनिवारवाडयाची सुरक्षिततेला जास्त प्राधान्य देऊन रचना करण्यात आली आहे. मराठा साम्राज्याच्या वैभवाचे प्रतिक असलेला शनिवारवाडा....पराक्रम, शौर्य आणि स्वाभिमानाची साक्ष देणारा वाड्याचा प्रत्येक दगड आणि दरवाजा....दिल्ली दरवाजाची उंची आणि भव्यता...वाड्याच्या प्रत्येक पावलावर असणारा इतिहास आणि अशा इतिहासाचा साक्षीदार बनून शनिवारवाड्याने अनुभवलेल्या पराक्रमाच्या गाथा सांगणारा शनिवारवाड्याचा २९३ वा वर्धापनदिन थाटात साजरा करण्यात आला.राष्ट्र संचार चे वाचक हार्दिक सुतार, रा. चिखली, ह्यांनी टिपलेले दिल्ली दरवाज्याचे भव्य छायाचित्र.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मंदिर व्यवस्थापन कौशल्य अभ्यासक्रम सुरू

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आता मंदिर व्यवस्थापन या विषयात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. सहा महिने मुदतीच्या या अभ्यासक्रमातून व्यावसायिक पद्धतीने मंदिर व्यवस्थापनासाठीची कौशल्ये, मंदिर व्यवस्थापनाचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पैलू या विषयीचे मार्गदर्शन करण्यात येणार असून, फेब्रुवारीपासून विद्यापीठाच्या नाशिक संकुलात, तर पुणे येथे जूनपासून अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू करण्यात येणार आहेत.

मंदिर व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने टेम्पल कनेक्ट या संस्थेशी सामंजस्य करार केला आहे. करारावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, टेम्पल कनेक्टरचे संस्थापक गिरेश कुलकर्णी, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. सुरेश हावरे या वेळी उपस्थित होते. या पूर्वी अशा प्रकारचे करार मुंबई विद्यापीठ आणि वेलिंगकर संस्था यांच्याशी करण्यात आले आहेत. या दोन्ही संस्थांतील अभ्यासक्रम सप्टेंबरपासून सुरू झाले आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाअंतर्गत नाशिक संकुलात अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. अभ्यासक्रमाच्या माध्यमातून सक्षम मंदिर व्यवस्थापकांची नवी पिढी घडणार आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमाद्वारे महत्त्वपूर्ण परिणाम घडण्याची अपेक्षा आहे. अभ्यासक्रमासाठी राज्यातूनच नाही, तर देशभरातून विद्यार्थी शिक्षणासाठी येऊ शकतात, असे डॉ. गोसावी यांनी सांगितले.

मंदिर व्यवस्थापन पदविका हे मंदिर व्यवस्थापनाच्या क्षेत्रातील पुढील पाऊल आहे. मंदिर परिसंस्थेमध्ये नावीन्यपूर्ण आणि शाश्वत बदलांसाठी विद्यार्थी घडवण्याचे उद्दिष्ट आहे. येत्या काळात सहा महिन्यांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम, एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम आणि दोन वर्षांचा मंदिर व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम (एमबीए) सुरू करण्याचे नियोजन आहे, असे कुलकर्णी यांनी नमूद केले.

# बेदम मारहाण करून भिक्षेकऱ्याचा खून

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** लष्कर भागात भिक्षेकऱ्याला मारहाण करुन करुन त्याचा खून करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. खून झालेल्या भिक्षेकऱ्याची ओळख पटलेली नाही. याप्रकरणी एकाविरुद्ध बंडगार्डन पोलिसांनी गुन्हा दाखल केला. खून झालेल्या भिक्षेकऱ्याचे वय अंदाजे ६० वर्ष आहे. याप्रकरणी एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन मोहिते यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लष्कर भागातील नेहरु मेमोरिअल हॉलसमोरील पदपथावर रात्री भिक्षेकरी झोपतात. खून झालेला ६० वर्षीय भिक्षेकरी तेथे झोपायचा. तेथे आणखी एक भिक्षेकरी झोपायचा. गुरुवारी पहाटे दोघांमध्ये वाद झाले. त्यानंतर भिक्षेकऱ्याला लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. मारहाणीत भिक्षेकरी गंभीर जखमी झाला. सकाळी पदपथावर भिक्षेकरी मृतावस्थेत सापडला. या घटनेची माहिती पोलिसांना कळविण्यात आली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. भिक्षेकऱ्याचा खून करुन पसार झालेल्या आरोपीचा शोध घेण्यात येत असून, पोलीस उपनिरीक्षक धीरज गुप्ता तपास करत आहेत.

# वाहतूक कोंडी फोडण्यासाठी 'पीईएस'चा मनाचा मोठेपणा

**वाहतूक कोंडी**

**शहरात प्रवेश करणारी महत्वाची प्रवेशद्वारे ही वाहतूक कोंडीने अक्षरशः गुदमरली आहेत, विशेष म्हणजे शहरासाठी सर्वात महत्वाच्या असलेल्या विद्यापीठ चौकाला आणि रस्त्यालाही वाहतूक कोंडीने अक्षरशः विळखा घातला आहे. त्यामुळे ही वाहतूक कोंडी सोडविणे हे महापालिका प्रशासन, राज्य शासन, वाहतूक पोलीस आणि सर्वच संस्थांची डोकेदुखी बनली आहे. मात्र; हीच वाहतूक कोंडी सुटावी यासाठी प्रोग्रिसिव्ह एजुकेशन सोसायटीने मोठेपणा दाखवत भूसंपादनाला मान्यता दिली आहे.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :**'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील आचार्य आनंदऋषीजी चौकातील दुमजली उड्डाणपुलापैकी वाहतुकीसाठी असणाऱ्या पाषाणकडील रॅम्पसाठी लागणाऱ्या अतिरिक्त जागेचा प्रश्न अखेर सुटला आहे. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न महाविद्यालयाच्या जागेचे समन्वयाने भूसंपादन करण्यात येणार आहे. जागा ताब्यात येताच तीन महिन्यांत रॅम्पचे काम पूर्ण करण्यात येईल,' असा दावा पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) करण्यात आला आहे.



पुणे महानगरपालिकेचे पथ विभाग प्रमुख अनिरुद्ध पावसकर, महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पीइएस संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, मुख्य अभियंता रिनाज पठाण आणि पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. बैठकीत भूसंपादन आणि मोबदल्याबाबत समन्वयाने कार्यवाही करण्यास सहमती दिल्याचे डॉ. एकबोटे यांच्याकडून स्पष्ट करण्यात आले.

'दुमजली उड्डाणपुलापैकी वाहतुकीसाठी असलेल्या पाषाणकडील रॅम्पसाठी परिसरातील 'पीइएस' संस्थेच्या मॉडर्न महाविद्यालयाची आणखी सुमारे चार हजार चौरस फूट जागा अपेक्षित आहे. या जागेत संस्थेचे बोटॅनिकल गार्डन, कॅन्टीन आणि विविध अभ्यासक्रमांचे वर्ग बाधित होत आहे. या गार्डनमध्ये विविध प्रकारच्या देशी विदेशी प्रकारचे वृक्ष, वनस्पतींच्या प्रजाती आहेत. महाविद्यालयातीलच एका जागेवर सुरक्षिपणे संबंधित वृक्षांचे प्रत्यारोपण करून देण्यात येणार असून, इतर जागेसंदर्भात मोबदल्याची अपेक्षित माहिती सोमवारपर्यंत (२७ जानेवारी) 'पीएमआरडीए' कडे पाठविण्यात येणार आहे. याबाबत करार करून भूसंपदानास मान्यता देण्यात आली आहे,' असेही डॉ. एकबोटे यांनी सांगितले.



दुमजली उड्डाणपुलापैकी वाहतुकीसाठी असलेल्या पाषाणकडील रॅम्पसाठी परिसरातील 'पीइएस' संस्थेच्या मॉडर्न महाविद्यालयाची आणखी सुमारे चार हजार चौरस फूट जागा अपेक्षित आहे. या जागेत संस्थेचे बोटॅनिकल गार्डन, कॅन्टीन आणि विविध अभ्यासक्रमांचे वर्ग बाधित होत आहे. या गार्डनमध्ये विविध प्रकारच्या देशी विदेशी प्रकारचे वृक्ष, वनस्पतींच्या प्रजाती आहेत. महाविद्यालयातीलच एका जागेवर सुरक्षिपणे संबंधित वृक्षांचे प्रत्यारोपण करून देण्यात येणार असून, इतर जागेसंदर्भात मोबदल्याची अपेक्षित माहिती सोमवारपर्यंत (२७ जानेवारी) 'पीएमआरडीए'कडे पाठविण्यात येणार आहे."

**— डॉ. गजानन एकबोटे,** कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

» Selected

## स्व. बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन



**निगडी :** शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त दुर्गादेवी टेकडी, निगडी प्राधिकरण या ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी स्व. बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी शिवसेना मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे, माजी आमदार जिल्हाप्रमुख गौतम चाबुकस्वार , उपजिल्हाप्रमुख दस्तगीर मणियार, युवा सेना प्रमुख चेतन पवार, शहर उपाध्यक्ष हरीश आबा नखाते, महिला उपशहर संघटिका वैभवी घोडके , चिंचवड विधानसभा संघटक संदीप भालके, आकुर्डी विभाग प्रमुख गोविंदराव शिंदे, निगडी विभाग प्रमुख सतीश मरळ ,युवा सेना उपशहर प्रमुख प्रवीण पाटील ,युवा नेते संतोष सौंदणकर, प्रकाश देशमुख निवास शिंदे जगदीश पाटील कृष्णा माने आदी मान्य उपस्थित होते, वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन उपशहर प्रमुख युवासेना पिंपरी चिंचवड शहर निखिल उमाकांत दळवी यांनी केले होते.

## एलआयसी म्युच्युअल फंडने मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड केला लाँच

**पिंपरी :** भारतातील प्रतिष्ठित फंड घराण्यांपैकी एक असलेल्या, एलआयसी म्युच्युअल फंडाने, एलआयसी एमएफ मल्टी ॲसेट ॲलोकेशन फंड प्रस्तुत केला आहे. ही एक गुंतवणुकीस कायम खुली (ओपन-एंडेड) असणारी योजना असून, जी समभाग (इक्विटी), रोखे (डेट) आणि सोन्यांत गुंतवणूक करेल.नवीन फंड प्रस्तुती (एनएफओ) २४ जानेवारी २०२५ रोजी सुरू होईल आणि ७ फेब्रुवारी २०२५ रोजी ती बंद होईल. या योजनेचे गुंतवणूक उद्दिष्ट समभाग आणि समभागांशी संलग्न साधनांच्या विविध पोर्टफोलिओमध्ये, रोखे आणि मनी मार्केट साधनांमध्ये तसेच गोल्ड एक्सचेंज ट्रेडेड फंडाच्या (गोल्ड ईटीएफ) युनिट्समध्ये गुंतवणूक करून दीर्घकालीन भांडवलवृद्धी करण्याचे आहे.या योजनेचा मानदंड हा ६५ टक्के निफ्टी ५०० टीआरआय + २५ टक्के निफ्टी कंपोझिट डेट इंडेक्स + देशांतर्गत सोन्याची १० टक्के किंमत यांचे संयोजन असा आहे. श्री. निखिल रुंगटा, श्री. सुमित भटनागर आणि श्री. प्रतीक श्रॉफ हे योजनेचे निधी व्यवस्थापक असतील. ही योजना १८ फेब्रुवारी २०२५ रोजी निरंतर विक्री आणि पुनर्खरेदीसाठी पुन्हा खुली होईल.नवीन योजनेवर भाष्य करताना, एलआयसी म्युच्युअल फंड ॲसेट मॅनेजमेंट लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. आर.के. झा म्हणाले: "मल्टी-ॲसेट ॲलोकेशन फंड हे आजकाल अधिकाधिक लोकप्रिय होत आहेत. कारण ते एकाच मालमत्तेतील केंद्रीकरणाची जोखीम कमी करतात आणि गुंतवणुकीत चांगले वैविध्य राहिल हे पाहतात.

## मेगा आरोग्य मेळाव्याचे आयोजन





**पिंपरी :** प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने, आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलने ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य आणि कल्याणासाठी एक आगळावेगळा उपक्रम यशस्वीपणे आयोजित केला – ज्येष्ठ नागरिक क्रीडा दिवस आणि मेगा आरोग्य मेळावा. या कार्यक्रमात २५० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांनी उत्साहाने सहभाग घेतला, ज्यातून सक्रिय जीवनशैली आणि प्रतिबंधात्मक आरोग्य व्यवस्थापनाचा महत्त्वपूर्ण संदेश पोहोचला. कार्यक्रमाची सुरुवात ऊर्जादायक झुंबा आणि योग सत्राने झाली, ज्यामुळे आरोग्यदायी आणि सकारात्मक वातावरणाची निर्मिती झाली. यानंतर रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी आरोग्यविषयक मार्गदर्शन केले. सीईओ पामेश गुप्ता यांच्यासह रुग्णालयातील वरिष्ठ डॉक्टर आणि आरोग्यसेवा तज्ञ उपस्थित होते. हे सर्वजण वृद्धांमध्ये निरोगीपणा आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्रोत्साहन देण्याच्या सामायिक ध्येयाने एकत्रित झाले होते. कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांनी क्रीडा खेळ, संगीत आणि नृत्य यामध्ये उत्साहाने भाग घेतला, ज्यातून वयाच्या कोणत्याही टप्प्यावर जीवनाचा उत्सव साजरा करता येतो, याचा संदेश मिळाला. मेगा हेल्थ मेळाव्यात मोफत आरोग्य तपासणी आणि तज्ञांचा सल्ला देण्यात आला.रक्तदाब, ईसीजी (इलेक्ट्रोकार्डियोग्राम), रँडम ब्लड शुगर, बीएमआय (बॉडी मास इंडेक्स), फुफ्फुस कार्यक्षमता आणि हाडांची घनता यांसारख्या तपासण्या करण्यात आल्या. या तपासण्यांमुळे ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या आरोग्याविषयी मौल्यवान माहिती मिळाली आणि डॉक्टरांकडून योग्य मार्गदर्शनही मिळाले.

# उद्योजकतेचा सामंजस्य करार

## एस. के. एफ. इंडिया आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरातील युवा वर्गास रोजगारासाठी सक्षम करणे तसेच त्यांना रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी निर्माण करण्याच्या दिशेने एस. के. एफ. इंडियाच्या सहकार्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महत्वाचे पाऊल उचलले आहे. या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या भविष्य केंद्रित उपक्रमांमुळे तसेच व्यापक प्रशिक्षण रचनेमुळे युवांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम होईल, असा विश्वास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केला. पिंपरी चिंचवड शहरातील तरुणांना कौशल्य विकासाचे तसेच ऑटोमोटिव्ह आणि औद्योगिक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारासाठी सक्षम करण्यासाठी एस. के. एफ. इंडिया आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. येस हा कार्यक्रम टाटा स्ट्राइव्ह आणि आयटीआय विभाग मोरवाडी यांच्या सहकार्याने राबविण्यात येणार असून या माध्यमातून दिले जाणारे प्रशिक्षण उच्च दर्जाचे असणार आहे.



"आम्ही समाजातील तरुण तरुणींना ऑटोमोटिव्ह आणि औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक असलेले कौशल्ये प्रदान करून त्यांना सक्षम करण्यासाठी वचनबद्ध आहोत. महापालिकेसोबत केलेली ही भागीदारी आम्हाला जास्तीत जास्त युवा वर्गापर्यंत पोहोचण्यास आणि रोजगाराच्या व्यापक स्वरुपात संधी निर्माण करण्यासाठी मदत होणार आहे. ईव्ही प्रशिक्षण अभ्यासक्रमांचा समावेश आणि सेंटर ऑफ एक्सलन्सची स्थापना यामुळे तरुण-तरुणींची प्रगती होईल" असा विश्वास व्यक्त केला.

**- शैलेश शर्मा**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय भवनात झालेल्या या सामंजस्य करारावर महापालिका आयुक्त शेखर सिंह आणि एसकेएफ इंडियाचे संचालक शैलेश शर्मा यांनी स्वाक्षरी केली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त चंद्रकांत इंदलकर, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, प्राचार्य शशिकांत पाटील, सहाय्यक आयुक्त मुकेश कोळप, एसकेएफ इंडियाचे सीएसआर प्रमुख तनुल सिंघल, उपव्यवस्थापक मयुर देशमुख , सुश्री सोफिया क्लिंगेन स्टीर्ना यांच्यासह सल्लागार उपस्थित होते. एसकेएफ इंडिया आणि महापालिका यांनी सीएसआर उपक्रमात भागीदारी करण्याची ही पहिलीच वेळ आहे. येस कार्यक्रमात विकसित होत असलेल्या ऑटोमोटिव्ह उद्योगाशी संबंधित अत्याधुनिक कौशल्यांसह तरुणांना सक्षम करण्यासाठी विशेष इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) प्रशिक्षणासह ऑटोमोटिव्ह कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम दिले जाणार आहेत , तसेच आयटीआय मधील विद्यार्थ्यांचे कुशलतेमध्ये वाढ करण्यात येणार आहे.

## ज्येष्ठांनी लुटला पर्यटन सहलीचा आनंद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** स्विमिंग पुलमध्ये ठसकेबाज गीतांवरील नृत्य, झुलत्या पुलावरील थरार, रेन डान्स , बैलगाडी, ट्रॅक्टरची फेरी, घोडेसफारी, सायकल रायडींग, तीरंदाजी आणि जोडीला अस्सल मराठमोळे जेवण तसेच हुरड्याचा मनमुराद आनंद ज्येष्ठांनी घेतला. पिंपळे सौदागर येथील ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनच्या वतीने शुक्रवारी पुणे शहरानजीकच्या कृषी पर्यटन केंद्रावर एक दिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

रांजणगावच्या महागणपतीचे दर्शन घेऊन या सहलीला प्रारंभ करण्यात आला. कृषी पर्यटनाशी निगडित या सहलीचे स्वरूप असल्याने परिसरातील औषधी वनस्पती, किल्ले प्रदर्शनासही ज्येष्ठांनी भेट देऊन माहिती घेतली. उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे यांचा विशेष सहभाग असलेल्या या सहलीच्या यशस्वीतेसाठी ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष डॉ.सुभाष पवार, सखाराम ढाकणे, रमेश वाणी, जयपाल सिदणाळे, अशोक येळंबकर, विवेकानंद लिगाडे, शकुंतला शिंदे, सतिश पिंगळे, निर्मला कासार, शोभा राजगुरे, बाळकृष्ण चौधरी , योगेश चोधरी आदिंनी विशेष परिश्रम घेतले.



# डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेसच्या (एचसीसीबी) वतीने निरगुडसरच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला देण्यात आलेल्या अत्याधुनिक डिजिटल क्लासरूमचे उदघाटन खासदार डॉ अमोल कोल्हे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी हिंदुस्थान कोकाकोला बेव्हरेजेस कंपनीचे पब्लिक अफेअर्स कम्युनिकेशन्स अँड सस्टनेबिलिटी अधिकारी हिमांशू प्रियदर्शी, भीमाशंकर साखर कारखान्याचे संचालक देवदत्त निकम, वाय डी फोर फौंडेशनचे अध्यक्ष प्रफुल्ल निकम,निरगूडसरचे सरपंच रविंद्र वळसे, पूजा वळसे,शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता शेटे सर्व शिक्षकवृंद ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित होते. उदघाटन प्रसंगी खासदार डॉ अमोल कोल्हे, म्हणाले कि "आम्ही आज महाराष्ट्रातील शिक्षण सुधारण्याचा प्रयत्न करत असताना हिंदुस्तान कोका-कोला बेव्हरेजेस् (एचसीसीबी) सारख्या कंपन्या आपल्या राज्याच्या शैक्षणिक ध्येयांना पाठिंबा देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे पाहताना प्रेरणादायी वाटते . झेडपीपीएस निरगुडसर येथे डिजिटल स्मार्टबोर्ड्सचे लॉंच तंत्रज्ञान पारंपारिक अध्ययन व आधुनिक शैक्षणिक गरजांमधील तफावत दूर करून शैक्षणिक परिपूर्ण उदाहरण आहे. हा उपक्रम सर्वसमावेशक वातावरण निर्माण करण्याच्या आमच्या दृष्टिकोनाशी संलग्न आहे, जेथे विद्यार्थी प्रयत्न करण्यासोबत डिजिटल युगामध्ये यशस्वी होऊ शकणार आहे .



यावेळी कोका कोला कंपनीचे चीफ पब्लिक अफेअर्स, कम्युनिकेशन्स अँड सस्टनेबिलिटी अधिकारी हिमांशू प्रियदर्शी म्हणाले कि,हा उपक्रम एचसीसीबीच्या औद्योगिक सामाजिक जबाबदारी (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी ) कार्यक्रमाचा एक भाग आहे, यातून महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अनुभव अधिक दर्जेदार करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत . क्लासरूममध्ये तंत्रज्ञानाचा समावेश करत नवीन स्थपित करण्यात आलेल्या स्मार्ट बोर्ड्सचा परस्परसंवादी, सर्वसमावेशक व डायनॅमिक अध्ययन वातावरणाला चालना देण्याचा मानस आहे. डिजिटल स्मार्टबोर्ड्स क्लासरूम अनुभवाचे आधुनिकीकरण करण्यामध्ये आवश्यक साधन म्हणून सेवा देतील, ज्यामुळे शिक्षक अधिक परस्परसंवादी अध्यापन करू शकतील आणि व्हिज्युअल व डिजिटल साधनांच्या माध्यमातून गुंतागुंतीच्या संकल्पना आत्मसात करण्याच्या विद्यार्थ्यांच्या क्षमता वाढतील.

## सुभाषचन्द्र बोस देशासाठी लढणारे सच्चे सेनानी – प्रा.डॉ.नाथा मोकाटे



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी-:** गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शरद चंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालयातील सांस्कृतीक विभाग व विद्यार्थी कल्याण विभागाच्या वतीने नेताजी सुभाष चन्द्र बोस यांची 128 जयंती साजरी करण्यात आली.या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ नाथा मोकाटे यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या क्रांतिकारक, देशभक्ती व स्वातंत्र्य चळवळीतील दिलेल्या मौल्यवान कार्याचा उलगडा केला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार, मा.श्री. मयूर मुरलीधर ढमाले यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले.या वेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ.पांडुरंग मिसाळ प्रवीण भावे, कार्यालयीन अध्यक्ष, प्रा. रोहित कांबळे, परीक्षा विभाग प्रमुख,प्रा. प्रफुल्ल जाधव, बी.बी.ए. सी. ए. विभाग प्रमुख, प्रा. माणिक कसाब, राज्यशास्त्र विभाग प्रमुख व विद्यार्थी विकास मंडळ प्रमुख,प्रा.डॉ. देवानंद गोरडवार. सांस्कृतिक विभाग प्रमुख, प्रा. दिपाली ताम्हाणे, वाणिज्य विभाग प्रमुख,प्रा. दिपाली सोनवणे, प्रा. प्रतिभा गुंड,प्रा.कविता पिलावरे, प्रा. यशोदा आनेराव,प्रा. पूजा खेडकर,ग्रंथालय विभाग प्रमुख .प्रा. संदीप वाळुंज, राजा शिवछत्रपती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रा. अतुल पानसरे, सौ.वर्षा ताजने, सौ.नेहा लांडगे, श्री. सचिन गावडे, सौ. तेजल चव्हाण, श्रीकांत कांबळे इत्यादी विभाग प्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. देवानंद गोरडवार यांनी केले तर उपस्थितांनाचे प्रा. माणिक कसाब, विद्यार्थी विकास अधिकारी यांनी मानले.

# अभियांत्रिकीमध्ये रोजगाराच्या मोठ्या संधी

## इंद्रायणी महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**तळेगाव दाभाडे :** अभियांत्रिकी क्षेत्र हे झपाट्याने बदलत असून, एआय, डेटा मायनिंग अँड मशीन लर्निंग, सॉफ्ट कंप्यूटिंग, सिग्नल अँड इमेज प्रोसेसिंग या क्षेत्रात विद्यार्थ्यांना रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होत आहेत. रोबोटीक क्षेत्राच्या माध्यमातून जग प्रचंड बदलत आहे. यासाठी विद्यार्थ्यांनी आवश्यक कौशल्ये आत्मसात केल्यास मोठा रोजगार उपलब्ध होणार आहे, असे प्रतिपादन कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. सुनील भिरूड यांनी केले.




इंद्रायणी विद्या मंदिर संस्थेच्या इंद्रायणी कनिष्ठ महाविद्यालयाच्या बारावी विज्ञान शाखेच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. भिरूड बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्यवाह चंद्रकांत शेटे होते. यावेळी संस्थेचे सदस्य संदीप काकडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी मलघे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. संदीप भोसले, विज्ञान शाखेचे प्रमुख प्रा. उत्तम खाडे, प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, क्रीडा, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात देदीप्यमान कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

भिरूड म्हणाले, की तंत्रज्ञान माणसाला नवीन दिशा देणारे असते. त्यात नवीन शैक्षणिक धोरणाने भर घातल्यामुळे आणि तंत्रज्ञानाला ए आय ची जोड मिळाल्याने भविष्यातील तंत्रज्ञान हे विचाराच्या पलीकडे असेल. जीवनाच्या परिवर्तनाचा मार्ग हा अभियांत्रिकी शिक्षणातून जात आहे. इंद्रायणी महाविद्यालयाने इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरू करून आपल्या नावलौकिकात भर घातल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. समृद्ध महाविद्यालयाच्या परंपरेत इंद्रायणी महाविद्यालयाचे नाव उल्लेखनीय असल्याचेही त्यांनी सांगितले.

चंद्रकांत शेटे यांनी मावळ तालुक्यातील गोरगरीब विद्यार्थ्यांना इंजिनिअरिंगचे दर्जेदार शिक्षण मिळावे, या हेतूने आम्ही प्रयत्नशील होतो. पुढच्या वर्षी इंद्रायणी महाविद्यालयामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू होत असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. संभाजी मलघे यांनी प्रास्ताविक करताना संस्थेच्या नावलौकिकात भर पडेल असेच विद्यार्थी महाविद्यालयामध्ये घडवले जात असल्याची भावना व्यक्त करून नुकत्याच पार पडलेल्या खो-खो स्पर्धेत इंद्रायणी महाविद्यालयाच्या प्रियंका इंगळे या माजी विद्यार्थिनीने केलेल्या दैदीप्यमान कामगिरीचे वर्णन करत बारावीच्या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान,'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या शासनाच्या अभिनव उपक्रमांतर्गत 'पुस्तक परीक्षण'च्या निमित्ताने घेण्यात आलेल्या स्पर्धेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गौरवही यावेळी करण्यात आला. महाविद्यालयाने घेतलेल्या पुस्तक वाचन स्पर्धेत सहाशेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

संस्थेचे अध्यक्ष रामदास काकडे, कार्यवाहक चंद्रकांत शेटे यांनी बारावीच्या परीक्षेला सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. शिक्षिका दीप्ती कन्हेरीकर व विद्यार्थ्यांनी सूत्रसंचालन, तर उपप्राचार्य प्रा. संदीप भोसले यांनी आभार मानले.

**ई-लिलाव अधिसूचना - स्क्रॅप**
**एमएस, ई-कचरा, रिकामे एमएस बॅरल आणि कचरा**
**लार्सन अँड टुब्रो लिमिटेड, तळेगाव, पुणे**
**- संकेतस्थळ -**
**www.auctionindia.com**
**लिलावाची तारीख २९-०१-२०२५**
**वेळ : दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसेने जाहीर करण्यात येते की,खालील परिशिष्टांत वर्णन केलेली मिळकत ही **श्री. विलास वसंत धोंडगे व श्री. विशाल वसंत धोंडगे** यांच्या **वडीलोपार्जित** मालकी हक्काची, वहीवाटीची आहे तसेच सदर मिळकत **श्री. विलास वसंत धोंडगे व श्री. विशाल वसंत धोंडगे** हे आमचे आशिल **पिरॅमल कॅपिटल ॲण्ड हौसिंग फायनान्स लि.** यांचेकडे गहाण ठेवण्याचे ठरविले आहे. तसेच **श्री. विलास वसंत धोंडगे व श्री. विशाल वसंत धोंडगे** यांचेशिवाय इतर कोणाचाही कसल्याही स्वरूपाचा हक्क हितसंबध नसल्याचा भरवसा त्यांनी आमचे आशिलांना दिला आहे.

तरी सदर मिळकत कुठल्याही बँक अथवा वित्तीय अर्थसंस्था अथवा इसमांकडे कर्ज घेण्याकरिता किंवा इतर कोणत्याही कारणास्तव गहाण ठेवलेली नाही. तरी सदर मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तिचा / संस्थेचा गहाण, वारसाहक्क, दान, लीन, लीज, करार, मदार, बक्षीस, इतर कोणत्याही प्रकारे, कसलेही हक्क हितसंबध, अधिकार असल्यास अशा व्यक्तिंनी प्रस्तूतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत अस्सल कागदपत्रांनिशी आमची तशी खात्री पटवून दयावी व त्यापश्च्यात कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

**मिळकतीचे वर्णन :**

**परिशिष्ट (मिळकतीचे वर्णन) :** तुकडी पुणे, पोटतुकडी, ता. खेड, मे. सब रजिस्ट्रार खेड, यांचे हद्दीतील तसेच गांव मौजे सावरदरी, ता. खेड, जि. पुणे, येथिल **गट / भुमापन नं. १/४** यांसी एकुण क्षेत्र ०० हे. ४८.५० आर पैकी जमीन क्षेत्र ०० हे. ३ आर यांसी चर्तुसिमा **पुर्वेस** : गांवठाण रोड, **दक्षिणेस** : विकास धोंडगे यांची मिळकत, **पश्चिमेस :** ज्योती विशाल धोंडगे यांची मिळकत, **उत्तरेस :** ३० फुटी अंतर्गत रस्ता.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस.

दिनांक : २५/०१/२०२५

**ॲड. सोपानराव माने**
**चौथा मजला, ब्रम्हा स्काय उझुरी, पिंपरी, पुणे १८**
**मो. नं. ८७९३२२२२३३**

## पिंपरी चिंचवड विद्यापीठात रक्तदान शिबिराचे आयोजन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या फार्मा व्हिजनरी क्लब आणि स्कूल ऑफ मॅनेजमेंटने रेड प्लस ब्लड बँकेच्या सहकार्याने एक महत्त्वपूर्ण रक्तदान शिबिराचे आयोजन केले. हे शिबिर सकाळी 10:00 वाजता सुरू झाले, ज्यामध्ये कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी यांनी उद्घाटन भाषण दिले. त्यांनी रक्तदानाच्या वाढत्या गरजेवर भर दिला आणि रक्तदात्यांनी दाखवलेल्या परोपकारी भावनेचे कौतुक केले. विद्यार्थ्यांपैकी आकाश कुंभार आणि श्रेया वरुटे यांनी पहिले रक्तदान केले आणि 202 स्वयंसेवकांना प्रेरित केले, ज्यामुळे 192 युनिट रक्ताचा संग्रह झाला. या कार्यक्रमाचे कुशल आयोजन स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे प्रमुख डॉ. अमित पाटील आणि सहायक प्राध्यापक प्रुथा सांबरे यांनी केले. त्यांना प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या उत्साही टीमने पूर्ण सहकार्य दिले, ज्यामुळे रक्तदानाची प्रक्रिया सर्वांसाठी सुरळीत आणि सुरक्षित राहिली. सहभागी रक्तदात्यांना रेड प्लस ब्लड बँकेच्या वतीने रक्तदान प्रमाणपत्र कार्ड देण्यात आले, जे त्यांच्या उदार योगदानाचे प्रतीक आहे.या कार्यक्रमाला पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलपती श्री. हर्षवर्धन पाटील, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे आणि पीसीईटी ट्रस्टी बोर्डाच्या सदस्यांचे शुभाशीर्वाद लाभले. यात श्री. ज्ञानेश्वर पी. लांडगे (अध्यक्ष), श्रीमती पद्मा एम. भोसले (उपाध्यक्ष), श्री. शांताराम डी. गराडे (खजिनदार), श्री. विठ्ठल एस. काळभोर (सचिव), श्री. नरेंद्र लांडगे (व्यवस्थापन प्रतिनिधी), श्री. अजिंक्य काळभोर (व्यवस्थापन प्रतिनिधी) आणि डॉ. गिरीश देसाई (कार्यकारी संचालक-पीसीईटी) यांचा समावेश होता. हे शिबिर केवळ आरोग्यविषयक उद्दिष्टांमध्ये यशस्वी ठरले नाही, तर समाजाच्या सामाजिक जबाबदारीबाबतची बांधिलकी अधिक दृढ केली.

सामाजिक

# प्रतिभा कॉलेजला सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय पुरस्कार

**चिंचवड येथील कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक सचिव डॉ. दीपक शहा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज व क्विल हील फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा जनजागृतीचा उपक्रम गेले दोन वर्षापासून राबविण्यात येत आहे. या उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा बाबत प्रशिक्षण देण्यात आले.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहर, रुपीनगर , तळवडे, लोणावळा परिसरातील शाळा, महाविद्यालये, भाजी मंडई , नागरी वस्ती , बस स्थानके येथे प्रत्यक्ष जाऊन सायबर सुरक्षा बाबत मार्गदर्शन करून नागरिक , विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती केली या कार्याची दखल घेत, क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने पुणे येथील आयोजित कार्यक्रमात त्यांना आठ श्रेणीपैकी पाच श्रेणीमध्ये सर्वाधीक पुरस्कार महाविद्यालयाने पटकाविले. त्यात प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स अँड कॉम्प्युटर स्टडीज या महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट सायबर सुरक्षे करिता सायबर शिक्षण हा राष्ट्रीय पुरस्कार राज्यपाल सी . पी राधाकृष्णन यांच्या हस्ते कमला एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, सचिव डॉ दीपक शहा यांनी स्वीकारला. तसेच शिक्षक श्रेणीत महाविद्यालयातील डॉ. हर्षिता वाच्छांनी, प्रा सुप्रिया गायकवाड, प्रा उज्वला फलक सर्वोत्कृष्ट राष्ट्रपती विजेता पुरस्कार विद्यार्थी दिपू सिंग , सर्वोत्कृष्ट पी आर मीडिया डायरेक्टर फर्स्ट विद्यार्थिनी बतुल परवाला . सर्वोत्कृष्ट सायबर वॉरियर्स पहिली धावपटू विद्यार्थिनी श्रावणी सावंत, ओम जगताप यांनाही राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले



सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा अवार्ड्स या कार्यक्रमात राज्यपाल सी .पी . राधाकृष्णन यांच्या समवेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रकाश महानवर, सायबर चे उपमहा निरीक्षक संजय शिंत्रे. क्विक हिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, क्विक हिल व्यवस्थापकीय संचालक डॉ कैलास काटकर सहव्यवस्थापकीय संचालक डॉ संजय काटकर, मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल साळवी समवेत विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते

प्रतिभा महाविद्यालयाला मिळालेल्या दैदीप्यमान यशाबद्दल महाविद्यालयात आनंदोत्सव साजरा करून प्राचार्य डॉ. ए .के. वाळुंज, उपप्राचार्या डॉ. क्षितिजा गांधी, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ राजेंद्र कांकरिया समवेत प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

संपादकीय विशेष

# भारताशी पंगा घेतला...

भारताशी पंगा घेणाऱ्या कॅनडाच्या माजी पंतप्रधानाचे, जस्टिन ट्रुडो यांचे उदाहरण सध्या आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये गाजत असल्यास नवल नाही. 2008 मध्ये त्यांनी कॅनडाच्या संसदेत लिबरल पक्षाचे सदस्य म्हणून राजकारणात प्रवेश केला. 2011 मध्ये निवडणुका झाल्या. त्यात लिबरल पक्षाने 34 जागा जिंकल्या. 2013 मध्ये लिबरल पक्षाची कमान ट्रुडो यांच्याकडे सोपवण्यात आली होती. 2015 मध्ये कॅनडात ट्रुडो यांच्या नेतृत्वाखाली निवडणुका झाल्या. लिबरल पक्षाने 184 जागा जिंकून बहुमताने सरकार स्थापन केले. मतदान पद्धतीत बदल आणि खर्चात कपात करण्याचे आश्वासन ते पूर्ण करू शकले नाहीत. ही दोन आश्वासने पूर्ण होतील, या आशेने मतदारांनी 2019 आणि 2021 मध्येही ट्रुडो यांच्यावर विश्वास व्यक्त केला; मात्र त्यांना बहुमताचा आकडा गाठता आला नाही. जस्टिन ट्रुडो हे कॅनडाचे नेते आणि 15 वर्षे पंतप्रधान राहिलेले पीटर ट्रुडो यांचे पुत्र. पीटर्स ट्रुडो हे करिष्माई आणि प्रभावशाली नेतृत्वशैलीसाठी ओळखले जात होते. 1968 ते 1979 आणि पुन्हा 1980 ते 1984 पर्यंत ते सत्तेत होते; मात्र आजारपणामुळे त्यांनी 1984 मध्ये पंतप्रधानपद सोडले. काही महिन्यांपूर्वी झालेल्या अमेरिकेच्या अध्यक्षपदी निवडून आल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प म्हणाले होते की पदभार स्वीकारताच ते कॅनडामधून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या सर्व उत्पादनांवर 25 टक्के शुल्क आकारण्याच्या आदेशावर स्वाक्षरी करतील. यानंतर कॅनडाच्या उपपंतप्रधान आणि अर्थमंत्री क्रिस्टिया फ्रीलँड यांनी पदाचा राजीनामा दिला. यानंतर ट्रुडो यांच्या वीस खासदारांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा देण्याची मागणी करणाऱ्या पत्रावर स्वाक्षरी केली आणि आता ट्रुडोंचा राजीनामा आला.

ट्रुडो अमेरिकेत गेले, तेव्हा ट्रम्प यांनी त्यांना गव्हर्नर ट्रुडो असे संबोधून खिल्ली उडवली. इतकेच नाही तर, ट्रम्प यांनी कॅनडाला 51 वे राज्यही म्हटले. कॅनडातील ताज्या सर्वेक्षणात हुजूर पक्ष हा सध्याच्या सत्ताधारी पक्ष लिबरल्सपेक्षा 26 टक्के जादा मते मिळवत आघाडीवर आहे, असे दिसून आले आहे. भारत आणि कॅनडा यांच्यातील संबंध गेल्या काही काळापासून बिघडले आहेत. कॅनडामध्ये झालेल्या खलिस्तानसमर्थक हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येप्रकरणी ट्रुडो यांनी भारतीय दलालांचा सहभाग असल्याचा पुरावा आहे, असे सांगत भारतावर आरोप केला होता. भारताने हा आरोप फेटाळला, मात्र तेव्हापासून दोन्ही देशांमधील संबंध बिघडत गेले. दोन्ही देशांनी एकमेकांच्या राजनैतिक अधिकाऱ्यांना देश सोडण्यास सांगितले. सध्या दोन्ही देशांमधील संबंध अत्यंत बिकट अवस्थेतून जात आहेत. ट्रुडो यांनी भारतावर आरोप केले, तेव्हा कॅनडातील शीख समुदायाची मते मिळवण्यासाठी ट्रुडो भारताप्रती बरीच आक्रमकता दाखवत असल्याची चर्चा होती.

वास्तविक पाहता, भारत सरकार कॅनडाला अनेक वर्षांपासून खलिस्तानी फुटीरतावाद्यांवर कारवाई करण्यास सांगत आहे. व्होट बँकेचे राजकारण लक्षात घेऊन ट्रुडो सरकार खलिस्तानबाबत मवाळ असल्याचे भारताचे मत आहे. कॅनडाच्या लोकसंख्येच्या 2.1 टक्के शीख आहेत. कॅनडामधील अल्पसंख्याक, विरोधी नेते जगमीत सिंग यांच्या 'न्यू डेमोक्रॅटिक पक्षा'ने ट्रुडो यांना सत्तेसाठी पाठिंबा दिला; मात्र गेल्या वर्षी जगमीत सिंग यांनी ट्रुडो यांचा पाठिंबा काढून घेतला. भारताशी संबंध बिघडले, तर त्याचा परिणाम कॅनडाच्या अर्थव्यवस्थेवरही होईल, असा इशारा तज्ज्ञांनी दिला होता; परंतु मतांच्या राजकारणासाठी ट्रुडो यांनी त्याकडे दुर्लक्ष केले आणि देशाला आर्थिक खाईत ढकलले.

कॅनडाच्या भारतासोबतच्या संबंधांमध्ये तणाव असतानाच ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाले. अनेक चुकीच्या निर्णयांमुळे ट्रुडो यांचे सरकार पडणे सहाजिक होते. त्यांनी अनेक चुका केल्या. त्यामुळे त्यांच्या प्रतिमेवर नकारात्मक परिणाम झाला. त्यांनी सत्तेच्या लालसेपोटी आणि संधीसाधूपणामुळे भारत आणि कॅनडामधील सौहार्दपूर्ण संबंध पणाला लावले. आपले अल्पसंख्याक सरकार वाचवण्यासाठी त्यांनी खलिस्तानसमर्थक दहशतवादी आणि अतिरेकी घटकांशी हातमिळवणी केली. जगमीत सिंग आणि 'न्यू डेमोक्रॅटिक पार्टी'च्या सांगण्यावरून त्यांनी भारतविरोधी भूमिका घेतली. देशांतर्गत पातळीवरही त्यांना लिबरल पक्षाच्या अनेक खासदारांकडून टीकेला सामोरे जावे लागत होते. त्यांच्या विरोधात त्यांच्याच लिबरल पक्षात बंडखोरी झाली होती. अलीकडच्या काळात वरिष्ठ मंत्र्यांनी राजीनामे देण्यास सुरुवात केली होती. आता ट्रुडो यांना 'करावे तसे भरावे' या उक्तीची आठवण झाली असल्यास नवल नाही.

ट्रम्प यांनी कॅनडाला अमेरिकेचे पन्नासावे राज्य म्हणून संबोधणे ही ट्रुडो यांच्या सरकारसाठी डोकेदुखी ठरली होती. शेजारील राष्ट्र आपल्या देशाचे कसे लचके तोडू शकते, अशी चर्चा सुरू झाली. त्याचे खापरही ट्रुडो यांच्यावर फोडले जात होते. ट्रुडो यांचे ट्रम्प यांच्याशी तणावपूर्ण संबंध होते. त्यामुळे त्यांची प्रतिमा डागाळत होती. अशा स्थितीमध्ये ट्रुडो सरकार राहिले असते, तरी भविष्यात अमेरिका-कॅनडा तसेच भारत आणि कॅनडा संबंधात मोठी प्रगती होण्याची शक्यता नव्हती. ट्रुडो स्वार्थीपणामुळे तसेच संधीसाधूपणामुळे भारत आणि अमेरिकेसारख्या जगातील सर्वात मोठ्या लोकशाही देशांसोबत संबंध बिघडवून बसले. पक्षांतर्गतदृष्ट्या कमकुवत होऊ लागले तेव्हा त्यांच्या पक्षातही बंडखोरीची परिस्थिती निर्माण झाली. पंतप्रधानपदाचा राजीनामा देताना ट्रुडो यांनी स्वतःला 'फायटर' म्हटले. खरे सांगायचे तर राजकारणी म्हणून त्यांच्यासाठी आत्मपरीक्षण करण्याची ही योग्य वेळ आहे. येणाऱ्या काळात त्यांनी आपली दृष्टी, राष्ट्राकडे-राजकारणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन न सुधारल्यास, चुकांमधून धडा न घेतल्यास त्यांचे राजकीय भवितव्य चांगले असणार नाही. त्यांच्या राजीनाम्यानंतर लिबरल पक्ष आता नव्या नेत्याची निवड करणार आहे. कॅनडामध्ये फेब्रुवारी महिन्यात सार्वत्रिक निवडणुका होतील. ट्रुडो यांचा पक्ष त्या लढवण्याच्या स्थितीत नव्हता. त्यामुळे अंतर्गत बंडाळीची परिस्थिती टोकाला गेली.

आता ट्रुडो यांच्या जागी येणारा लिबरल पक्षाचा नवा नेता किंवा निवडणुकीनंतर सत्तास्थानी येणारा पक्ष भारत आणि कॅनडादरम्यानचे संबंध सुधारेल, अशी अपेक्षा करायला हरकत नाही. एखाद्या राष्ट्राच्या नेत्याने राजकीय स्वार्थ साधण्यासाठी कट्टरपंथी आणि अतिरेकी दहशतवाद्यांशी हातमिळवणी केल्यास काय परिणाम होतो, हे त्यांच्या अनुभवावरून शिकायला हवे.

# शेतकऱ्यांपाठोपाठ कामगारही रस्त्यावर

**किमान हमी भाव कायद्यासह अन्य मागण्यांसाठी गेल्या 11 महिन्यांपासून शेतकरी आंदोलन करत आहेत. शेतकरी नेत्यांचे 48 दिवसांपासून उपोषण सुरू आहे. शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सरकारने अधिवेशन सुरू असतानाही निर्णय घेतला नाही. आता संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होत असताना कामगारांनीही आंदोलनाची हाक दिली आहे. या कष्टकऱ्यांचे नेमके प्रश्न काय आहेत?**

मागोवा

- प्रा. अशोक ढगे


केंद्र सरकारने प्रस्तावित केलेल्या चार नवीन कामगार संहितेबाबत देशभरातील कामगार संघटनांचा संताप वाढत आहे. ही संहिता अधिकारांचे उल्लंघन करणारी असून कामगारांसाठी धोकादायक ठरू शकते, असा या संघटनांचा आरोप आहे. दहा केंद्रीय कामगार संघटनांनी एकत्रित येऊन चार कामगार संहिता अधिसूचित केल्यास संपावर जाण्याचा इशारा दिला आहे. अशा परिस्थितीत या नवीन कामगार संहिता काय आहेत आणि त्याविरोधात कामगार संघटना संपाची धमकी का देत आहेत हे समजून घेतले पाहिजे. सहा वर्षांपूर्वीही सरकारने कामगार कायद्यात काही बदल केले होते. तेव्हाही कामगार संघटनांचा विरोध होता. जगातील बदलत्या परिस्थितीशी कामगार कायदे सुसंगत करताना कामगार देशोधडीला लागणार नाही, याची दखल घेतली पाहिजे. गेल्या काही दिवसांपासून वेगवेगळे उद्योजक सत्तर तास, आठवड्यातील सातही दिवस काम करण्याची भाषा करत आहेत. देशाच्या प्रगतीशी त्याची सांगड घालत आहेत; परंतु हे करताना कामगारांच्या शरीराचा आणि मनाचा विचार केला जात नाही. सध्या सर्वच क्षेत्रांमध्ये टार्गेट ओरिएंटेड काम असताना पुन्हा कामाचे तास आणि दिवसही वाढवण्याची भाषा केली जात आहे. एकीकडे जगात कामाचे तास आणि दिवसही कमी केले जात असताना भारतात मात्र कालचक्र उलटे फिरवले जात आहे. कामगारांनी कामचुकारपणा करू नये, त्यांनी दिलेले काम गुणवत्तेनुसार आणि वेळेत करावे, ही अपेक्षा योग्य आहे. कामगारांनीही त्यात काही वावगे मानता कामा नये; परंतु कामगारांकडून काम करून घेताना त्यांच्या हक्कांचीही तेवढीच जाणीव ठेवायला हवी. ती ठेवली जात नाही. आज महागाई वाढत असताना कामगारांचे पगार त्या प्रमाणात वाढत नाहीत, ही वस्तुस्थिती नजरेआड करता येणार नाही. 2020 मध्ये भारत सरकारने लागू केलेली नवी कामगार संहिता ही भारतातील कामगार कायद्यांमधील एक मोठी आणि लक्षणीय सुधारणा आहे. या संहितेचा उद्देश भारतातील कामगार कायदे सोपे आणि अधिक प्रभावी बनवणे हा आहे. याआधी भारतामध्ये कामगारांशी संबंधित विविध कृतींसाठी 29 वेगवेगळे कायदे होते. ते काळाच्या ओघात गुंतागुंतीचे होत गेले. त्यांचे पालन करणे कठीण होत गेले. व्यवसायांना या कायद्यांचे पालन करण्यात अडचणी येत होत्या आणि कामगारांनाही त्यांच्या हक्कांचा पूर्ण लाभ मिळत नव्हता. या समस्येचे निराकरण करण्यासाठी भारत सरकारने 29 वेगवेगळ्या कायद्यांच्या जागी चार नवीन कामगार संहिता तयार केल्या आहेत. यामध्ये वेतन, सामाजिक सुरक्षा, औद्योगिक संबंध आणि व्यावसायिक सुरक्षा यांचा समावेश होतो. वेतन संहिता हा कोड सर्व कामगारांसाठी किमान वेतन निश्चित करेल आणि वेतन देय प्रक्रिया प्रमाणित करेल. सर्व कर्मचाऱ्यांचे पगार वेळेवर व्हावेत, त्यांना ओव्हरटाइम मिळावा, असा निर्णय सरकारतर्फे घेण्यात आला आहे. वर वर हा कायदा चांगला दिसत असला, तरी अनेक कंपन्या पूर्वीचे किती कायदे पाळत होत्या आणि ते पाळल्याबद्दल किती उद्योजकांवर गुन्हे दाखल केले, हा प्रश्न अनुत्तरीत आहे. कामगार संघटनांच्या मते कोडमध्ये मूलभूत वेतन आणि भत्त्यांमधील फरक स्पष्ट केलेला नाही. त्यामुळे काही कामगारांना कमी वेतन मिळण्याची भीती आहे.

सामाजिक सुरक्षा संहितेत असंघटित क्षेत्रातील कामगारांना पेन्शन, विमा आणि नुकसानभरपाई यासारख्या सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभही मिळू शकेल. तथापि, काही संस्थांचे म्हणणे आहे की त्याचे फायदे मर्यादित असतील, कारण त्याची अंमलबजावणी योग्यरित्या होणार नाही आणि बरेच कामगार त्याच्या कार्यक्षेत्राबाहेर राहतील. कामगार आणि नियोक्ते यांच्यातील संबंध सुव्यवस्थित करणे हा या संहितेचा उद्देश आहे. यामध्ये संपावर बंदी आणि कामगारांना संघटना स्थापन करण्याच्या अधिकाराबाबत बदल करण्यात आले आहेत. या संहितेमुळे कामगारांचे संघर्ष आणि निदर्शने करण्याचे स्वातंत्र्य हिरावून घेतले जाईल, असे संघटनांचे म्हणणे आहे. व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य आणि कामकाजाच्या अटी हा कोड कामगारांची सुरक्षा आणि आरोग्य संबंधित सुविधा, योग्य शारीरिक सुरक्षा उपाय, कामाच्या ठिकाणी कामाचे तास याची खात्री करण्यासाठी आहे. कामगार संघटनांच्या मते हा कोड खूप सामान्य आणि काही बाबतीत कमकुवत आहे. त्यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेची खात्री होणार नाही. संघटनांचे म्हणणे आहे की, या नवीन संहितेत अनेक अटी आहेत. त्यामुळे त्यांचे अधिकार कमकुवत होऊ शकतात. उदाहरणार्थ, संपावरील निर्बंध, किमान वेतनाचा स्पष्ट निर्धार नसणे आणि कामगार संघटनांना दिलेले मर्यादित अधिकार या सर्व बाबी कामगारांसाठी घातक ठरू शकतात. शिवाय, असंघटित क्षेत्रातील कामगारांना या योजनांपासून वंचित राहावे लागू शकते. कारण त्यांची योग्य अंमलबजावणी करणे कठीण होईल.

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासोबतच्या अर्थसंकल्पपूर्व बैठकीत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. यामध्ये 10 कामगार संघटनांनी कामगार संहिता लागू न करण्याची मागणी केली होती, तर सरकार समर्थक भारतीय मजदूर संघ आणि इतर काही संघटनांनी दोन संहिता (मजुरी संहिता आणि सामाजिक सुरक्षा संहिता) लागू करण्यास पाठिंबा दिला होता. या अर्थसंकल्पपूर्व बैठकीनंतर दिलेल्या निवेदनात दहा कामगार संघटनांनी म्हटले आहे की केंद्र सरकारच्या धोरणांमुळे जनतेवर बोजा पडत आहे. या धोरणांमुळे बेरोजगारी वाढत आहे, लोक नोकऱ्या गमावत आहेत आणि त्यांचे लोकशाही अधिकार दडपले जात आहेत. कामगार संहितेबाबत कामगार संघटनांनी सांगितले की या संहिता कामगारांच्या कल्याणावर अधिक लक्ष केंद्रित करणाऱ्या असल्या पाहिजेत. सरकारने याची अंमलबजावणी केल्यास कामगार संघटना देशभरात श्रमसंहिता जाळून मोठा निषेध करतील. कालांतराने या आंदोलनाचे मोठ्या आंदोलनात रूपांतर होऊ शकते. नवीन कामगार संहितेची उद्दिष्टे कामगारांसाठी चांगली कामाची परिस्थिती आणि सामाजिक सुरक्षा प्रदान करणे आहे; परंतु त्यांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक आव्हाने आहेत. ही आव्हाने सोडवणे सरकारसाठी सोपे होणार नाही आणि या आव्हानात्मक परिस्थितीचा परिणाम कामगार आणि मालक या दोघांवरही होऊ शकतो.

भारतातील बहुतांश कामगार कायदे राज्य सरकारांच्या अंतर्गत आहेत. राज्य आणि केंद्र सरकारमधील समन्वयाचा अभाव हे नवीन कामगार संहिता लागू करण्यात मोठे आव्हान बनू शकते. अनेक राज्ये ही नवी चौकट स्वीकारायला तयार नाहीत. काही राज्ये त्याची अंमलबजावणी करण्यास उशीर लावू शकतात. भारतातील बहुतेक कामगार अनौपचारिक क्षेत्रात काम करतात. त्यात घरकामगार, छोटे कंत्राटदार आणि रस्त्यावरील कामगारांचा समावेश होतो. नवीन कामगार संहितेअंतर्गत असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा आणि आरोग्य सुविधा देण्याची तरतूद आहे; परंतु त्यांची योग्य अंमलबजावणी करणे हे मोठे आव्हान आहे. असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या लाखो कामगारांपर्यंत या योजना पोहोचणे कठीण होऊ शकते, कारण अनेकदा त्यांची नोंदणी होत नाही आणि त्यांना आपल्या हक्कांची माहिती नसते. गेल्या महिन्यातच कामगार मंत्रालयाने जारी केलेल्या प्रकाशनामध्ये सर्व 36 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना चार कामगार संहितांचे नियम पाळावे लागतील, असे म्हटले आहे. या चार संहिता या वर्षभरात लागू करण्याचा टप्पा निश्चित करण्यात आला आहे. कामगार कायदे अनेक दशकांपूर्वी तयार झाले आणि तेव्हापासून जग आणि बाजारपेठ खूप बदलली आहे. बदलती परिस्थिती पाहता कामगार कायद्यात सुधारणा करण्याची गरज आहे.

सरकारच्या मते कामगार कायदे सुलभ करण्यासाठी आणि कामाची परिस्थिती सुधारण्यासाठी अनेक कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींमध्ये पुढाकार घेतला आहे. केंद्र सरकार या चार संहितांच्या अंमलबजावणीबाबत आग्रही असताना दुसरीकडे राज्यांनी या संहितांअंतर्गत आपले नियम अद्याप निश्चित केलेले नाहीत. वास्तविक, कामगार कायदे संविधानाच्या समवर्ती यादीत येतात. त्यामुळे केंद्र आणि राज्य या दोघांनाही नियम बनवण्याचा अधिकार आहे; परंतु राज्य आणि केंद्रीय कायद्यांमधील संघर्षाच्या बाबतीत राज्य कायद्याला राष्ट्रपतींची संमती मिळेपर्यंत सामान्यतः केंद्रीय कायद्याला प्राधान्य दिले जाते. कामगार सुधारणांमधील सर्वात मोठे आव्हान म्हणजे रोजगारवाढ सुलभ करणे आणि कामगारांच्या हक्कांचे संरक्षण करणे. या सुधारणांमुळे गुंतवणुकीला चालना मिळेल आणि व्यवसाय करण्यास सुलभता निर्माण होईल, असे अनेक अर्थतज्ज्ञ आणि उद्योजकांचे मत आहे. या सुधारणांमुळे अंतर्गत संघर्ष कमी होतील, लवचिकता वाढेल आणि सुरक्षा आणि कामकाजाच्या स्थितीचे नियम आधुनिक होतील, असा त्यांचा दावा आहे.




## राशीभविष्य

- **मेष** : अपेक्षित उद्दीष्ट साध्य करू शकाल. कलाकारांच्या कला-गुणांचं कौतुक होईल. स्पर्धेत यश मिळेल.
- **वृषभ** : नव्या संधींचा लाभ घ्यावा. व्यवसायात मनाजोगी उलाढाल होईल. यंत्र, वाहनांबाबत काळजी घ्या.
- **मिथुन** : चैनीकडे अधिक ओढा राहील. आर्थिक व्यवहारात फसवणूक संभवते. बोलताना विचार करावा.
- **कर्क** : भावंडांकडून दिलासा मिळेल. विवाहाबाबत तडजोडीची भूमिका ठेवावी. अपेक्षित रक्कम हाती येईल.
- **सिंह** : महत्त्वाचे करार लांबणीवर टाकावे. मध्यस्थी वा ओळखीतून कामं होतील. व्यवसायात चिंता राहील.
- **कन्या** : स्वमताग्रह टाळायला हवा. वास्तुविषयक कामांसाठी पाठपुरावा करावा लागेल. विचारानं रहावं.
- **तूळ** : कोणावर अधिक विसंबून राहू नका. स्वकर्तृत्त्वातून अपेक्षित साध्य करू शकाल. प्रकृतीस जपावं.
- **वृश्चिक** : छोट्या-मोठ्या प्रवासाचे योग आहेत. अधिक उत्साहानं कार्यरत रहाल. अनपेक्षित घटना घडतील.
- **धनु** : भागीदारी व्यवसायात सामंजस्यानं रहावं. महत्त्वाचे करार होतील. मुलांच्या प्रश्नात दिलासा मिळेल.
- **मकर** : कौटुंबिक समस्यांचा ताण राहील. अधिक खर्च करावा लागेल. शैक्षणिक बाबतीत समाधान लाभेल.
- **कुंभ** : व्यवसायात बदलाचा विचार होईल. प्रलंबित कामं मनाजोगी होतील. ज्येष्ठांच पुरेसं सहकार्य लाभेल.
- **मीन** : परिस्थिती पाहून निर्णय घ्यावेत. आर्थिक व्यवहारात काळजी घ्यावी. विद्यार्थ्यांची प्रगती होईल.

## २५ जानेवारी

दिनविशेष

- १९५४ : साम्यवादी चळवळीचे थोर नेते मानवेंद्रनाथ रॉय यांचं निधन.
- २००१ : स्वरसम्राज्ञी लता मंगेशकर आणि उस्ताद बिस्मिल्ला खान यांना भारतरत्न प्रदान.
- २००२ : एअरमार्शल अर्जुनसिंग भारतीय हवाईदलाचे पहिले 'मार्शल ऑफ द एअर फोर्स' बनले.
- २०१४ : प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि योगविद्येचा प्रचार-प्रसार करणारे बी.के.एस.अय्यंगार यांना पद्मविभूषण पुरस्कार जाहीर.

महत्त्वपूर्ण काही...

## मिथेन आणि पर्यावरण

शास्त्रज्ञांनी सभोवतीच्या वातावरणामध्ये उष्णता वाढवणाऱ्या सहा वायू घटकांची नोंद घेतली. त्यामध्ये कर्बवायू, मिथेन, बाष्प, नायट्रस ऑक्साइड, ओझोन आणि सीएफसी यांचा समावेश होतो. उष्णता साठवून ठेवणारे वायू म्हणून यांना 'हरितगृह वायू' असेही म्हणतात. वातावरणामध्ये मिथेन वायूचे प्रमाण ०.०००२ टक्के एवढे कमी असले ती तो कर्बवायूपेक्षा २८ पटीने जास्त उष्णता शोषण करून सभोवतालचे वातावरण जास्त उबदार करतो. असे वातावरण आपल्या आरोग्याबरोबरच पर्यावरणासुद्धा घातक असते. गेली दोन दशके मिथेन हा वायू वातावरणामध्ये सध्याच्या स्थिर प्रमाणापेक्षा ८० पटीने जास्त आहे. मिथेनचे हे वाढते प्रमाण बिघडलेल्या पर्यावरणासाठी धोक्याची घंटा ठरू शकते. मिथेन वायूची निर्मिती ही आपणास सुदृढ पर्यावरण म्हणजे काय हे न समजल्यामुळे वाढते आहे. ओला कचरा बंद प्लॅस्टिकच्या पिशवीमधून बाहेर टाकणे, तेथून तो जनावरांच्या पोटात जाणे हा मिथेन निर्मितीचा फार मोठा स्रोत आहे. ओल्या कचऱ्याचा प्राणवायूशी संबंध आला नाही की त्याचे बंदिस्त अवस्थेत हळूहळू मिथेनमध्ये रूपांतर होते.

आरोग्यमंत्र

## फ्रिजचा वापर करताना...

सध्याच्या यांत्रिकीकरणाच्या आणि धावपळीच्या जमान्यात घरोघरी विविध उपकरणं आली आहेत. त्यात फ्रिजचा समावेश होतो. विविध अन्नपदार्थ, भाज्या, फळं, दूध आदी खराब होऊ नये यासाठी फ्रिजमध्ये ठेवले जातात. परंतु काही गोष्टी थेट किंवा कोणत्याही पद्धतीने फ्रिजमध्ये ठेवल्याने खराब होतात किंवा त्यातील पोषणमूल्ये कमी होतात. अशा कोणत्या गोष्टी आहेत आणि त्या का फ्रिजमध्ये ठेवू नये हे जाणून घेऊ...



✲ कांदा फ्रिजमध्ये ठेवल्यास त्यातील ओल्याव्यामुळे लवकर खराब होतात. कांदे, बटाटे नेहमी अंधाऱ्या, थंड जागी ठेवावे.

✲ बटाटा फ्रिजमध्ये ठेवल्यास त्याच्यातील स्टार्चचे साखरेमध्ये रूपांतर होते. यामुळे बटाट्याच्या चवीवर परिणाम होतो. बटाटे उन्हापासून लांब, थंड ठिकाणी उघडे ठेवावे.

✲ लिंबू आणि संत्री हे सिट्रीक ॲसिड असणारे फळं आहेत. हे जास्त काळ थंड ठिकाणी चांगलं राहू शकत नाही. फ्रिजमध्ये ठेवल्याने यांच्यातील रस आटून जातो आणि ती काळी पडतात.

✲ सफरचंद फ्रिजमध्ये ठेवायचं असल्यास कागदात गुंडाळून भाज्या ठेवण्यासाठी असलेल्या खालच्या भागात ठेवावे.

✲ केळी फ्रिजमध्ये ठेवल्यास लवकर काळी पडतात. केळीच्या देठातून इथाईलीन नावाचा गॅस बाहेर पडत असतो. जो फ्रिजमधील इतर गोष्टीही खराब करू शकतो. त्यामुळे केळी फ्रिजमध्ये ठेवू नयेत.

सल्ला मोलाचा

## परीक्षा कोणाची?

परीक्षा जवळ आल्या की मुलांइतकीच पालकांचीही परीक्षा सुरु होते. परीक्षांचे निकाल लागल्यावर नापास झाल्याने किंवा अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने विद्यार्थी आत्महत्या करत असल्याच्या बातम्या झळकतात. त्यामुळे परीक्षांच्या काळात पालकांच्याही पोटात भीतीचा गोळा येतो. आजकाल पती-पत्नी दोघंही नोकरी करत असल्याने मुलांकडे देण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. पण, असा वेळ काढला पाहिजे. मुलं चुकली किंवा अपेक्षेनुरुप वागली नाहीत तर आपण घालून पाडून बोलतो. त्यापेक्षा त्यांना धीर देऊन आत्मनिर्भर बनवणं गरजेचं आहे. अपेक्षा पूर्ण न होता पदरी अपयश आलं तरी त्याने भांबावून न जाता धैर्याने सामना कसा करायचा हे मुलांना समजावून सांगावं. आपल्या मुलाची अन्य मुलाच्या बुद्धिमत्तेशी तुलना करु नये. त्यामुळे मन विचलित होऊन अभ्यासात लक्ष लागत नाही. अभ्यासाबरोबरच आवडीचे खेळ खेळू द्यावेत. त्यासाठी त्यांना वेळ ठरवून द्यावी. थोडक्यात, परीक्षेचं दडपण न घेता मुलं परीक्षेच्या काळात कशी तणावरहित आणि आनंदी राहतील यासाठी आपणच प्रयत्न करायला हवेत.

पंचांग

**शनिवार, २५ जानेवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
पौष कृ. ११, नक्षत्र : ज्येष्ठा अहोरात्र
चंद्रराशी : वृश्चिक, ध्रुव योग,
सूर्योदय : ७.१४, सूर्यास्त : ६.२७

फॉरवर्डस

गरीबी-श्रीमंतीचा खेळ काही वेगळाच असतो...
**गरीबी रातभर लड़ती रही सर्द हवाओं से,**
**अमीरी ने सुबह उठकर कहा वाह क्या मौसम आया है**

वाचा तर खरं

✲ मसाले नेहमी कोरड्या ठिकाणी ठेवा. ✲ मसाल्याच्या पदार्थांवर थेट सूर्यप्रकाश पडता कामा नये. असं झाल्यास त्यातील तेल प्रकाशाच्या संपर्कात येतं आणि स्वाद बदलतो. ✲ मसाल्याचे पदार्थ गडद रंगाच्या जारमध्ये ठेवावे. यामुळे ते सूर्यप्रकाशापासून सुरक्षित राहतील. ✲ फ्रीजमध्ये ठेवल्यानं मसाल्याचा सुगंध कमी होतो. एअर लॉक कंटेनरमध्ये काही काळापर्यंत मसाले सुस्थितीत राहू शकतात. त्यानंतर ते सुगंधरहित होतात. ✲ नेहमी खडा मसाला साठवून ठेवावा. गरज पडेल तसा वाटून घ्यावा. ✲ एका वेळी जास्त प्रमाणात मसाले खरेदी करू नयेत. गरज पडेल तसे आणावेत.

फॅशन पॅशन

## लेदर जॅकेटने खुलवा लूक

दोस्तांनो, अजुन थंडीचा कडाका कायम आहे. त्यामुळे ऊबदार कपडे गरजेचे ठरत आहेत. थंडीसाठी आवर्जून लेदर जॅकेटची खरेदी केली जाते. परंतु हे महागाचं लेदर जॅकेट टिकेल ना, हा प्रश्नही पडतो. आता या टिप्स फॉलो करा आणि बिनधास्त लेदर जॅकेट विकत घ्या.



✲ लेदर जॅकेट घातल्यावर फुगीर होता कामा नये. त्यामुळे थोडं छोट्या साईझचं जॅकेट घ्या. लेदरच्या प्रकारानुसार साईझ ठरवा. योग्य फिटिंगवालं जॅकेट तुमचं व्यक्तिमत्त्व खुलवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतं.

✲ लेदर जॅकेटचा रंग तुमच्या व्यक्तिमत्त्वाला शोभणारा असावा. टॅन लेदर जॅकेट्स योग्य वाटत नसतील तर हे रंग घेऊ नका. त्याऐवजी काळं किंवा कॉफी ब्राउन रंगाचं जॅकेट घ्या. गडद रंग आवडत असतील लाल रंगाचं जॅकेट खरेदी करायला हरकत नाही.

✲ फॉर्मल आणि कॅज्युअल यापैकी एका जॅकेटची निवड करावी. बॉम्बर जॅकेट, बायकर जॅकेट, रेसर जॅकेट हे प्रकार बाजारात मिळतात. बायकर जॅकेटला बऱ्याच ठिकाणी चेन लावलेली असते. आकर्षक बटणंही असतात. बॉम्बर जॅकेटमुळे स्पोर्टी लूक मिळतो.

खेचाखेची

## ...एक शोध

जिलेबी हे स्त्रीलिंगी
असल्याची दोन कारणे
आहेत...
.
एक तर ती
गोड असते...
(बायको सारखी???)
.
दुसरं म्हणजे
ती कधीच
सरळ होत नाही...!!!
परत तेच
(बायको सारखी ???)

वेगळे काही

या सृष्टीमध्ये अनेक रहस्यं आहेत. त्यापैकी अनेक रहस्यं शोधण्यात आजपर्यंत अपयशच आलं आहे. असंच एक रहस्य गुजरातमधील बाबरा शहरापासून सात किलोमीटर अंतरावर असणाऱ्या एका पर्वतामध्ये आहे. या पर्वतामधून रहस्यमय आवाज येत असतात. स्थानिक लोक या रहस्याकडे श्रद्धेच्या रुपाने पाहतात. या ठिकाणी कधी काळी भगवान स्वामी नारायण आले होते असं लोक मानतात. त्यांनी तेथे पुजेसाठी घंटा नसल्याने दगडातूनच घंटेचा आवाज काढला होता. त्यावेळेपासून हा रहस्यमय आवाज येथे येत राहतो.

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

At a Glance

## संशयित रुग्णाचा मृत्यू

**पिंपरी:** चिंचवडमध्ये पहिल्या संशयित GBS रुग्णाचा संसर्गाने मृत्यू झाला. ६४ वर्षीय रुग्णावर वायसीएमएचमध्ये उपचार सुरू होते; तपासानंतर संसर्गाची पुष्टी होईल, असे नागरी प्रमुख म्हणतात. पुणे जिल्ह्यात गुइलेन-बॅरे सिंड्रोम (जीबीएस) च्या संशयित रुग्णांच्या वाढीदरम्यान, पोस्ट ग्रॅज्युएट इन्स्टिट्यूट-यशवंतराव चव्हाण मेमोरियल हॉस्पिटल (वायसीएमएच), पिंपरी येथे उपचार घेत असलेल्या 64 वर्षीय महिला रुग्णाचा तिच्या आजाराने मृत्यू झाला, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. गुरुवारी. आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या आठवड्याच्या सुरुवातीला संसर्ग पसरल्यानंतरचा हा पहिला बळी आहे. नांदेड, किरकटवाडी, नांदोशी आणि धायरी भागातील जलस्त्रोतांची गुरुवारी आयुक्त राजेंद्र भोसले व अन्य अधिकाऱ्यांनी पाहणी केली आहे. मोटर मज्जातंतू तंतूंवर परिणाम करणाऱ्या GBS च्या तीव्र मोटर ऍक्सोनल न्यूरोपॅथी (AMAN) प्रकाराची पुष्टी झालेल्या पिंपरी येथील महिलेचा मंगळवारी रात्री ९.४५ वाजता मृत्यू झाला. अधिका-यांनी सांगितले की, मृत हा उच्च रक्तदाबाचा ज्ञात रुग्ण होता. जीबीएस संसर्ग असल्याची पुष्टी करण्यापूर्वी प्रकरणाची चौकशी केली जाणार आहे.

# राष्ट्रीय मतदार; मतदानाची घेतली शपथ...

### २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून मोठ्या उत्साहात साजरा होतो



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:**"आम्ही, भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून, याद्वारे प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू आणि मुक्त नि:पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणूकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणूकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, समाज, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू" अशी शपथ अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, चंद्रकांत इंदलकर यांच्या उपस्थितीत महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांनी घेतली.

लोकशाही

२५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस संपुर्ण देशात उत्साहात साजरा केला जातो. महानगरपालिकेच्या वतीने देखील २५ जानेवारी रोजी कार्यालयीन सुट्टी असल्याने शासन निर्णयानुसार पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत आज राष्ट्रीय मतदार दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सह शहर अभियंता बाबासाहेब गलबले, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, लेखाधिकारी अनिल पासलकर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागातील कर्मचारी उपस्थित होते. शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय यांच्या निर्देशानूसार २५ जानेवारी हा दिवस राष्ट्रीय मतदार दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने १८ वर्षे पुर्ण झालेल्या नवोदित मतदारांचा मतदार यादीत समावेश करणे व त्यांचा मतदान प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा या यामागचा मुख्य उद्देश आहे. भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना २५ जानेवारी १९५० रोजी झाली. यानंतर २६ जानेवारी १९५० पासून देशात संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. २५ जानेवारी २०११ रोजी भारताच्या तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभा पाटील यांच्या विशेष उपस्थितीत पहिला राष्ट्रीय मतदार दिवस साजरा केला गेला. तेव्हापासून दरवर्षी २५ जानेवारी रोजी राष्ट्रीय मतदार दिवस म्हणून साजरा केला जातो.

# रवींद्र खैरे यांचा साहित्य संमेलनामध्ये सन्मान



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेश युवक अध्यक्ष, भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस, व जनसेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष रवींद्र खैरे यांना 22 वर्ष विविध सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सिंगापूर मध्ये ९ वे शब्द विश्व मराठी साहित्य संमेलनामध्ये संमेलनाचे अध्यक्ष प्रसिद्ध लेखिका, सामाजिक कार्यकर्त्या रझिया सुलताना व मॅक्स महाराष्ट्राचे संपादक मनोज भोयर यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरवण्यात आले होते.

यावेळी आयोजक शब्द परिवाराचे अध्यक्ष संजय सिंगलवार, शब्द परिवाराचे उपाध्यक्ष शशी डंबारे, मुंबई हायकोर्टाचे एडवोकेट सतीश बोलूरकर, प्रसिद्ध निवेदिका ज्योती भगत, आदि यावेळी उपस्थित होते.

## जनावरांची वाहतूक, दोघांना अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**दिघी:** कत्तल करण्यासाठी जनावरांची वाहतूक करणाऱ्या दोघांना दिघी पोलिसांनी अटक केली. ही कारवाई चऱ्होली येथे करण्यात आली. मोहम्मद सय्यद (वय ३०, रा. धुळे), सईद अहमद मुबिनुरेहमान अन्सारी (वय ४१, रा. धुळे) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. रोहित अशोक नाईकरे (वय २७, रा. भोसरी) यांनी याप्रकरणी दिघी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी एका पीकप टेम्पो मध्ये चार जनावरे बांधून त्यांची कत्तलीसाठी वाहतूक केली. याबाबत माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी कारवाई करत चार जनावरांची सुटका करुन टेम्पो ताब्यात घेतला आहे.

# नृत्यगीतांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी घडविले संस्कृतीचे दर्शन



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** बालवाडी ते इयत्ता सातवीतील विद्यार्थ्यांनी वैविध्यपूर्ण नृत्यगीतांच्या प्रभावी सादरीकरणातून महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरील समृद्ध संस्कृतीचे नयनरम्य दर्शन घडवून उपस्थितांची मने जिंकली. यासाठी पी. सी. एम. सी. पब्लिक स्कूल अर्थात वैष्णोमाता प्राथमिक विद्यामंदिर, इंद्रायणीनगर, भोसरी या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे निमित्त होते. अंकुशराव लांडगे सभागृह, भोसरी येथे गुरुवार, दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झालेल्या या समारंभात पिंपरी - चिंचवड महापालिका शिक्षण विभाग प्रशासन अधिकारी संगीता बांगर, स्थायी समितीचे माजी सभापती विलास मडिगेरी, माजी नगरसेविका नम्रता लोंढे, यशोदा बोईनवाड, राजेंद्र लांडगे, माजी आरोग्य अधिकारी प्रभाकर तावरे, आकांक्षा फाउंडेशनचे आकाश गोरे, सामाजिक कार्यकर्ते योगेश लोंढे, आनंद चव्हाण, मुख्याध्यापिका वंदना इन्नाणी, माजी मुख्याध्यापिका शैला मातेरे, पर्यवेक्षिका प्रमिला जाधव, अरुणा महानवर, सुरेखा मोरे, निर्मला लोखंडे आदी मान्यवरांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती; तर विद्यार्थी, पालक, शिक्षकवृंद यांची मोठ्या संख्येने सभागृहात उपस्थिती होती. दीप प्रज्वलन आणि सरस्वतीपूजनाने समारंभाचा प्रारंभ करण्यात आला. विलास मडिगेरी यांनी मनोगतातून, 'फक्त पस्तीस विद्यार्थ्यांसह सुरुवात झालेल्या वैष्णोमाता प्राथमिक विद्यामंदिर या शाळेचा आता विशाल वटवृक्ष झाला आहे. जल्लोष शिक्षणाचा अभियानांतर्गत दीड कोटी रुपयांचे प्रथम पारितोषिक प्राप्त करणारी पिंपरी - चिंचवड महापालिकेची शाळा; तसेच ड्रॅनेज अ‍ॅलर्ट सिस्टीम प्रकल्पात आंतरराष्ट्रीय स्तरावर सुमारे शेहेचाळीस देशांमधून पुरस्कार प्राप्त करणारी शाळा असा लौकिक असलेल्या या शाळेचा आम्हाला खूप अभिमान वाटतो!' असे गौरवोद्गार काढले. अरुणा महानवर यांनी, 'कनिष्ठ स्तरावरील सर्वसामान्य कुटुंबातल्या मुलांना अशा व्यासपीठावर संधी मिळाल्याने यांच्यातून उद्याचे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे कलाकार निर्माण होतील!' अशा शब्दांत शुभेच्छा व्यक्त केल्या.

"आमच्या पप्पांनी गणपती आणला..." या लोकप्रिय नृत्यगीताच्या सुंदर सादरीकरणातून बालवाडीच्या चिमुरड्यांनी समारंभाची धडाकेबाज सुरुवात केली. ईश्वरभक्ती, देशभक्ती, निसर्गवर्णन, सण - समारंभ, रूढी - परंपरा अन् समृद्ध संस्कृतीचा मागोवा घेणारी लोकनृत्ये, त्याला भक्तिगीते, लोकगीते सादर केली आहे.

## भारतीय दंड संहिता कायदा मार्गदर्शन सत्राचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपळे सौदागर :** पिंपळे सौदागर येथे सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या उन्नती सोशल फाऊंडेशन तर्फे सांगवी पोलीस स्टेशन यांच्या सहकार्याने सुधारीत भारतीय दंड संहिता कायदा मार्गदर्शन आणि सायबर सुरक्षा विषयक मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले.

सांगवी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज कलकुटगे यांनी नागरिकांना सुधारित कायदे आणि सायबर सुरक्षा आणि प्रतिबंधात्मक उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. या उपक्रमाबद्दल माहिती देताना , उन्नती सोशल फाउंडेशनचे संस्थापक संजय भिसे म्हणाले , "आयपीसी, सीआरपीसी व भारतीय पुरावा कायदा या तीन कायद्यांच्या बदली आता भारतीय न्यायसंहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष्य अधिनियम हे तीन नवीन कायदे १ जुलै २०२४ पासून लागू झाले आहेत. पूर्ण देशभरात हे कायदे लागू करण्यात आले आहेत.


# ५८ व्या निरंकारी संत समागमाचा हर्षोल्लासपूर्ण वातावरणात शुभारंभ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** मनुष्य रुपात जन्म प्राप्त केल्यानंतर मानवीय गुणांनी युक्त असणे हीच मानवाची खरी ओळख होय असे उद्गार सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी महाराष्ट्राच्या 58व्या वार्षिक निरंकारी संत समागमाध्या शुभारंभ प्रसंगी मानवतेच्या प्रति संदेश देताना व्यक्त केले. या तीन दिवसीय संत समागमामध्ये महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच देश-विदेशातून लाखोंच्या संख्येने भाविक भक्तगण व प्रभुप्रेमी सज्जनांनी भाग घेतला आहे. सतगुरु माताजी यांनी पुढे सांगितले, की विज्ञान व तंत्रज्ञानाच्या आधारे सांसारिक उपलब्धिच्या बाबतीत मानवाने खूपच प्रगती आणि विस्तार केला आहे.

जेव्हा सद्बुद्धीने युक्त होऊन या उपलब्धिचा वापर केला जातो तेव्हा तो निश्चितच मानवासाठी शांतीसुखाचे कारण बनतो. परंतु जर यांचा सदुपयोग केला नाही तर त्या उपलब्धी मानवासाठी नुकसानकारक ठरतात. ब्रह्मज्ञानाद्वारे जेव्हा परमात्म्याला जीवनात उत्तरविले जाते तेव्हा सहजपणेच मानवाला सुमती प्राप्त होते, त्याच्या मनातील आप पर भाव नाहीसा





होतो आणि प्रत्येक मानवासाठी त्याच्या मनात परोपकाराचा भाव उत्पन्न होतो. मानवाने शुद्ध भावनेने या परमात्म्याला आपल्या हृदयामध्ये स्थान द्यावे ज्यायोगे प्रत्येक मानवाच्या प्रति त्याच्या मनामध्ये प्रेम व सेवेचा भाव उत्पन्न होऊ शकेल . मिलिटरी डेअरी फार्मच्या विशाल मैदानांवर सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या दिव्य आगमनाचे औचित्य साधुन श्रद्धालु भक्तांनी एका भव्य शोभायात्रेचे आयोजन केले ज्यामध्ये एका बाजुला भक्तांनी आपल्या हृदयसम्राट सद्गुरुंचे भावपूर्ण स्वागत केले तर दुसऱ्या बाजुला मिशनच्या शिकवणूकीवर आधारित महाराष्ट्र तसेच भारताच्या वेगवेगळ्या संस्कृतींचे अद्भूत मिलन दर्शविणाऱ्या चित्ररथ स्वरूप कार्यक्रमांची सुंदर दृश्ये प्रस्तुत केली जी प्रेक्षकांच्या आकर्षणाचे कारण ठरली आहे.

## खासदार निधीतून पवनानगर, कांब्रेत विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी:** श्रीरंग बारणे यांच्या स्थानिक खासदार निधीतून मावळमधील काले कॉलनी, पवनानगर, ग्रुप ग्रामपंचायत कांब्रेत विविध विकासकामांचे उद्घाटन, भूमिपूजन करण्यात आले. खासदार बारणे यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ, भूमिपूजन गुरुवारी करण्यात आले. खासदार बारणे यांच्या तिसऱ्या टर्ममध्ये मावळात पुन्हा विकास कामांचा धडाका सुरू झाला आहे.


खासदार श्रीरंग बारणे यांचे मावळ तालुक्यावर विशेष लक्ष आहे. मावळ तालुका वाड्या-वस्त्यांमध्ये विस्तारला आहे. त्यामुळे अनेक गावांमध्ये दळणवळणासाठी रस्त्यांचा अभाव होता. अंतर्गत रस्ते नव्हते. त्याकरिता खासदार बारणे यांनी मागील दोन टर्ममध्ये खासदार निधी आणि जिल्हा वार्षिक निधीतून मावळ तालुक्यातील अंतर्गत रस्ते करण्यावर भर दिला आहे. सिमेंट काँक्रीटचे रस्ते केले. समाज मंदिरे, पाणी टाक्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला आहे. मावळातील अनेक गावात अंतर्गत रस्ते झाले आहेत. त्यामुळे मावळातील नागरिकांना खासदार बारणे यांच्यावर विश्वास टाकत तिसऱ्यावेळी मोठ्या मताधिक्याने निवडून दिले.

पान १ वरून

## आता सेट परीक्षा १५ जून रोजी होणार

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने डिसेंबर महिन्यात सेट परीक्षेच्या नियोजना संदर्भातील परिपत्रक प्रसिद्ध केले होते. त्यानुसार सेट परीक्षा 4 मे 2025 रोजी आयोजित केले जाणार होती. परंतु विद्यापीठाने संबंधित परिपत्रक रद्द केले असून आता सेट परीक्षा 15 जून रोजी घेण्याचे जाहीर केले आहे. त्यामुळे परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी एक महिना अभ्यास करण्यासाठी मिळणार आहे. विद्यापीठाच्या सेट विभागाने आतापर्यंत 39 सेट परीक्षा ऑफलाइन पद्धतीने ओएमआर शीट द्वारे घेतल्या आहेत. चाळीसावी सेट परीक्षा सुद्धा ऑफलाइन पद्धतीने जाणार आहे. त्यामुळे परीक्षेच्या तारखेत बदल केला असला तरी परीक्षेच्या पद्धतीत कोणताही बदल करण्यात आलेला नाही; याची विद्यार्थ्यांनी दखल घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## दिल्ली उच्च न्यायालयाचा भाजपला धक्का



विधानसभा स्थापन झाल्यानंतर आणि आगामी निवडणुकांनंतर अधिवेशन बोलावल्यानंतर दिल्ली सरकारने कॅगचा अहवाल लवकरात लवकर विधानसभेसमोर मांडण्यासाठी पावले उचलावीत, असा आदेश दिल्ली उच्च न्यायालयाने दिला आहे.

## महिलेला डांबून केला बलात्कार

धर्मांतर करण्यासाठी बळजबरी केली. तिला धानोरी परिसरात बोलवले. आरोपी महिलेच्या धानोरी येथील घरात संतोष गायकवाड आणि सागर लांडगे यांनी तिला डांबून ठेवले. यानंतर दोघांनीही पीडितेला पिस्तुलाचा धाक धाकवून जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपीने महिलेवर बलात्कार केला. या घटनेची मोबाइलर चित्रीकरण करुन समाज माध्यमात प्रसारित करण्याची धमकी दिली. त्यानंतर आरोपी सागर लांडगे याने पीडित महिलेला लोहगाव परिसरात नेले. तेथे तिला एका खोलीत डांबून ठेवले. त्याने महिलेला धमकावून वेळोवेळी अत्याचार केले, असे पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याप्रकरणी आरोपींविरुद्ध बलात्कार, बेकायदा शस्त्र बाळगल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला. महिलेसह तिघांना अटक करण्यात आली.

## बांगलादेशींना जन्म दाखल्याचे वाटप


या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारने एटीएसची स्थापना केली आहे. जे बांगलादेशी रोहिंग्या खरी प्रमाणपत्रे सादर करू शकणार नाहीत, त्यांना पुन्हा बांगलादेशमध्ये पाठविले जाणार आहे. बांगलादेशी रोहिंग्यांना बनावट जन्म प्रमाणपत्र दिल्याबद्दल नुकतेच मालेगावचे तहसीलदार आणि नायब तहसीलदार यांना निलंबित करण्यात आले आहे. मालेगावप्रमाणेच इतर ठिकाणीही आता कारवाई होणार असून काही अधिकाऱ्यांचे निलंबन होणार असल्याचे सुतोवाच सोमय्या यांनी केले आहे. एका बाजूला अधिकाऱ्यांवर कारवाई दुसऱ्या बाजूला या बांगलादेशींना परत पाठवण्याचे काम केले जाणार आहे. तसेच यापुढे जन्म प्रमाणपत्र देत असताना व्यवस्थित लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचेही ते म्हणाले.

## अमूलचा ग्राहकांना दिलासा

दरम्यान, जून २०२४ मध्ये, अमूलने दुधाच्या दरात प्रति लिटर २ रुपयांनी वाढ केली होती. अमूलने केलेल्या या दरवाढीनंतर, मदर डेअरीनेही दुधाच्या दरात प्रति लिटर २ रुपयांनी वाढ केली होती. या दर वाढीनंतर, अमूल गोल्डच्या ५०० मिली पाकिटाची किंमत ३२ रुपयांवरून ३३ रुपये झाली होती. तर एक लिटर अमूल गोल्डची किंमत ६४ रुपयांवरून ६६ रुपये प्रति लिटर झाली होते. तसेच अमूल ताजाच्या अर्ध्या लिटर पॅकसाठी ग्राहकांना २६ रुपयांऐवजी २७ रुपये मोजावे लागत होते. त्याच वेळी, अमूल शक्तीच्या अर्ध्या लिटर पॅकेटची किंमत २९ रुपयांवरून ३० रुपये झाली होती.

## टोरेस गैरव्यवहार प्रकरणी ईडीची कारवाई

गाजत आहे. दरम्यान वाल्मिक कराडवर तो या हत्या प्रकरणात मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप होत आहे. त्याचबरोबर कराडबाबत अनेक धक्कादायक गोष्टीही समोर येत आहेत. त्यावरून आरोप प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. राज्यात सुमारे तीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रखडलेल्या आहेत. नव्या सरकारच्या स्थापनेनंतर न्यायालयात




यावर तोडगा निघण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील सर्वच राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. मुंबईत गेल्या आठवड्यात सैफ अली खानवर चाकू हल्ला झाला होता. यातील हल्लेखोराला आता पोलिसांनी अटक केली असून, प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे.

# माऊलींचे थोरल्या पादुका मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**आळंदी:** येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरात श्रीसंत ज्ञानेश्वर महाराज व श्री विठ्ठल रुक्मिणी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना वर्धापन दिन आणि श्री संत निवृत्तीनाथ महाराज त्र्यंबकेश्वर यात्रा उत्सवा निमित्त अखंड हरीनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष अँड. विष्णू तापकीर यांनी दिली.

पुणे – आळंदी पालखी मार्गावरील वडमुखवाडी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिरात २५ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्याचा प्रारंभ २५ जानेवारीला होत आहे. या निमित्त विना पूजन, कलश पूजन, ग्रंथ पूजन शांतीब्रम्हे ह. भ. प. मारोती महाराज कुरेकर यांचे हस्ते होणार आहे. यावेळी सोहळयात श्रींची महापूजा, काकड आरती, श्री ज्ञानेश्वरी पारायण, गाथा पारायण, महिला भजनी मंडळांची भजन सेवा, हरिपाठ, हरी कीर्तन व हरी जागर असे विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत.

या शिवाय मान्यवर कीर्तनकार यांची कीर्तन सेवा दररोज संध्याकाळी सात ते नऊ या वेळेत होणार आहे. एकादशी दिनी ह. भ. प. तुकाराम महाराज ताजणे, मयूर महाराज गोरे, संतोष महाराज सुर्वे, कृष्णा महाराज चवरे, मनोहर महाराज सिनारे, बालाजी महाराज मोहिते, पंडित महाराज क्षीरसागर, शिवाजी महाराज वटंबे, परमेश्वर महाराज वरकड, लक्ष्मण महाराज पाटील यांचे काल्याचे कीर्तनाने सोहळ्याची सांगता होणार आहे. यावेळी कीर्तनकर, प्रवचनकार, भाविक, नागरिक, महिला भजनी मंडळाने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

सप्ताहात दैनंदीन पहाटे महापूजा व काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, महिला भजनी मंडळांची भजन सेवा, हरिपाठ, कीर्तन, महाप्रसाद, हरीजागर असे कार्यक्रम होणार आहे. या सप्ताहाची सांगता काल्याच्या कीर्तनाने होईल. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप होणार आहे.

## दुचाकीच्या धडकेत लहान मुलगी जखमी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रावेत:** आजोबांसोबत नातेवाईकांना सोडविण्यासाठी आलेल्या लहान मुलीला एका दुचाकीने धडक दिली. त्यामध्ये लहान मुलगी जखमी झाली. ही घटना सेंटोसा हॉटेल समोर, रावेत येथे घडली. सुरेश रामदास राणे (वय ७२, रा. पुनावळे) यांनी याप्रकरणी रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार दुचाकी चालकाच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी राणे आणि त्यांची नात हे दोघे त्यांच्याकडे आलेल्या पाहुण्यांना सोडविण्यासाठी सेंटोसा हॉटेल समोर बस स्टॉपवर आले होते. बस स्टॉपवर थांबले असताना एक दुचाकीस्वार भरधाव वेगात आला.

### साहित्यिक, व्याख्याते राजेंद्र घावटे यांची उपस्थिती

# संस्कार भारतीच्या अभिवाचनाने रसिक मंत्रमुग्ध

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चिंचवड, :** संस्कार भारती पिंपरी चिंचवड समिती नाट्यविधाच्या वतीने आयोजित नाट्याभिवाचन अभियानाला उदंड प्रतिसाद मिळाला. साहित्यिक ,व्याख्याते राजेंद्र घावटे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

उद्योजक अभय पोकर्णा, कवयित्री मीना पोकर्णा, संस्थेचे उपाध्यक्ष नरेंद्र आमले, प्रफुल्ल भिष्णूरकर, सचिव लीना आढाव, प्रचिती भिष्णूरकर आणि अनेक नाट्यरसिक या प्रसंगी उपस्थित होते. नाट्यविधा संयोजक संजय चांदगुडे यांनी "धुम्रवर्ण मम्मीपप्पा व रिंकी" या लघुकथेचे



अभिवाचन केले. मनोज कोल्हटकर लिखित व संजय चांदगुडे दिग्दर्शित अथांग या नाटकाच्या एका प्रवेशाचे अभिवाचन सौ.सुनिता बोडस, मंदार फाकटकर आणि सारंग चिंचणीकर यांनी केले.

उत्तम अभिवाचन करून सर्व कलाकारांनी प्रेक्षकांना खिळवून ठेवत मंत्रमुग्ध केले.

प्रमुख पाहुणे राजेंद्र घावटे म्हणाले की , "मराठी रंगभूमीला मोठा इतिहास आहे. आजही मराठी नाटकांचे साहित्यातील महत्व अबाधित आहे. प्रायोगिक, हौशी रंगभूमी आणि ग्रामीण लोककलावंत यांनी नाट्यचळवळ जिवंत ठेवली आहे. नाटक, लोकनाट्य, एकांकिका, महानाट्य आदींच्यामुळे मनोरंजनाबरोबरच व्यापक समाजप्रबोधन घडून येते.

#रा

## At a Glance

### प्रजासत्ताक दिनासाठी अतिरिक्त पोलीस



**नवी दिल्ली :** प्रजासत्ताक दिनानिमित्त निमलष्करी दलाच्या ७० हून अधिक कंपन्या आणि १५ हजारांहून अधिक पोलिस तैनात करण्यात येणार आहेत. शहरावर ड्रोन आणि सीसीटीव्हीद्वारे लक्ष ठेवण्यात येणार असून सायबर तज्ज्ञ अधिकारी या कारवाईवर लक्ष ठेवण्यासाठी तैनात करण्यात येणार आहेत, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली.

### मध्य प्रदेश सरकारचा निर्णय

**खरगोन :** मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी राज्यातील १७ पवित्र शहरांमधील दारूची दुकाने बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. खरगोन येथे दिवसभरात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या १७ शहरांमध्ये एक महानगरपालिका, सहा नगरपालिका, सहा नगरपरिषदा आणि सहा ग्रामपंचायतींचा समावेश आहे.

### वायनाडमध्ये वाघाच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

**वायनाड (केरळ) :** जिल्ह्यातील मन्नथवडी गावातील प्रियदर्शनी इस्टेट येथे शुक्रवारी सकाळी वाघाच्या हल्ल्यात एका ४७ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला. केरळचे वनमंत्री ए. के. शशींद्रन यांनी विधानसभेत दावा केला होता की, राज्यात असा संघर्ष होत नसून, सरकार त्यासाठी प्रभावी कारवाई करत आहे.

# एमएमआरडीएचे ४० अब्ज डॉलर्सचे करार

## दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये केली कामगिरी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनी ऐतिहासिक कामगिरी करत स्वित्झर्लंडमधील दावोस येथे आयोजित प्रतिष्ठित वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये ३.५ लाख कोटी रुपये गुंतवणुकीसह ११ महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करत आर्थिक भरारी घेतली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी यांच्या उपस्थितीत हे महत्त्वपूर्ण करार करण्यात आले. या गुंतवणुकींमुळे मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) पायाभूत सुविधांच्या विकासात आमूलाग्र बदल होणार आहे. शहरी वाहतूक, प्रादेशिक विकास आणि अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये होणारी ही गुंतवणूक पुढील ३ ते ५ वर्षांत आर्थिक वाढीचा आणि जीवनमान सुधारण्याचा भक्कम आधारस्तंभ ठरणार आहे.

एमएमआरडीएने मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करून गुंतवणूकदारांसाठी जागतिक स्तरावर महत्त्वाचे केंद्र असल्याचे सिद्ध केले आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळ, जागतिक दर्जाची परिवहन प्रणाली, तसेच उदयोन्मुख लॉजिस्टिक्स आणि डेटा सेंटर हब्स यांसारख्या मजबूत पायाभूत सुविधांच्या नेटवर्कसह, मुंबई महानगर प्रदेशात वाढ आणि इनोव्हेशनसाठी अमर्याद संधी उपलब्ध आहेत. दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमएमआरडीएच्या कामाचे कौतुक केले.





"दावोस येथील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममुळे मुंबई महानगर प्रदेशासाठी एक नवा अध्याय सुरू झाला आहे. एमएमआरला ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याचे उद्दिष्ट यामध्ये सामावले आहे. या भागीदाऱ्यांमुळे केवळ पायाभूत सुविधांचा विकास होणार आहेच, त्याचप्रमाणे या प्रदेशातील रोजगार निर्मिती आणि आर्थिक शाश्वततेलाही चालना मिळेल. एमएमआरडीएच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा उत्सव साजरा करताना, हा खऱ्या अर्थाने 'विकासाचा उत्सव' आहे."

— **देवेंद्र फडणवीस,** मुख्यमंत्री



"दावोस येथे एमएमआरडीएने केलेले करार हे मुंबईची विकासक्षमता आणि संधी यावर जागतिक गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे प्रतीक आहेत. या भागीदाऱ्यांमुळे आर्थिक गुंतवणूक होईलच, त्याचप्रमाणे जागतिक दर्जाचे कौशल्य आणि तंत्रज्ञानही येथे येईल.या उपक्रमामुळे एमएमआर ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याच्या उद्दिष्टाच्या समीप नेले आहे."

— **एकनाथ शिंदे,** उपमुख्यमंत्री तथा अध्यक्ष एमएमआरडीए



"दावोस येथे ४० अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीचे करार होणे हा हा एमएमआरडीएसाठी ऐतिहासिक टप्पा आहे. नीती आयोग आणि महाराष्ट्र सरकारने ठरवलेल्या उद्दिष्टांशी हे करार सुसंगत आहे. पायाभूत सुविधा, नवीन विकास केंद्रे आणि सर्क्युलर इकॉनॉमी पार्कसारख्या नावीन्यपूर्ण प्रकल्पांमध्ये टारगेटेड गुंतवणुकींमुळे मुंबई महानगर प्रदेश २०३० पर्यंत ३०० अब्ज डॉलर्सची अर्थव्यवस्था साध्य करेल आणि ३० लाख रोजगार निर्माण करेल."

- **डॉ. संजय मुखर्जी,** महानगर आयुक्त, एमएमआरडीए

### महत्त्वाचे सामंजस्य करार

- **१) कंपनी : क्रॉसरेल इंटरनॅशनल (यूके) + यूके वाहतूक विभाग**

सामंजस्य करार : मुंबई महानगर प्रदेशातील वाहतूक पायाभूत सुविधांचा विकास आणि कार्यक्षमतेतील सुधारणा

एकूण गुंतवणूक : धोरणात्मक अभ्यासासाठी सहाय्य

- **२) कंपनीचे नाव : यूनिव्हर्सिटी ऑफ बर्मिंगहॅम सेंटर फॉर रेल्वे रिसर्च अँड एज्युकेशन, यूके**

सामंजस्य करार : मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) शाश्वत शहरी वाहतूक साध्य करणे

एकूण गुंतवणूक: धोरणात्मक अभ्यासासाठी सहाय्य

- **३) कंपनीचे नाव : ब्रुकफिल्ड कॉर्पोरेशन (कॅनडा)**

सामंजस्य करार : शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे

एकूण गुंतवणूक : १२ अब्ज डॉलर्स

- **४) कंपनीचे नाव: ब्लॅकस्टोन इन्क. (यूएसए)**

सामंजस्य करार: शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशाततील आर्थिक वाढीस चालना देणे

एकूण गुंतवणूक : ५ अब्ज डॉलर्स

- **५) कंपनीचे नाव : टेमासेक कॅपिटल मॅनेजमेंट पीटीई लिमिटेड (सिंगापूर)**

सामंजस्य करार : शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे.

एकूण गुंतवणूक : ५ अब्ज डॉलर्स

- **६) कंपनीचे नाव : सुमिटोमो रियल्टी अँड डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड (जपान)**

सामंजस्य करार : शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे.

एकूण गुंतवणूक : ५ अब्ज डॉलर्स

- **७) कंपनीचे नाव : हिरानंदानी ग्रुप (भारत + दुबई)**

सामंजस्य करार : शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे

एकूण गुंतवणूक : ६ अब्ज डॉलर्स

- **८) कंपनीचे नाव : के. रहेजा कॉर्प प्रायव्हेट लिमिटेड (भारत + सिंगापूर)**

सामंजस्य करार: शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे

एकूण गुंतवणूक : ५ अब्ज डॉलर्स

- **९) कंपनीचे नाव: एव्हरस्टोन ग्रुप (सिंगापूर)**

सामंजस्य करार: शहरी, प्रादेशिक आणि पायाभूत सुविधांच्या विकासात थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे

एकूण गुंतवणूक : १ अब्ज डॉलर्स

- **१०) कंपनीचे नाव : सोतेफिन भारत प्रायव्हेट लिमिटेड (भारत + स्वित्झर्लंड)**

सामंजस्य करार: एमएमआरमध्ये पार्किंग सोल्यूशन्समध्ये बदल घडवून आणण्यासाठी थेट परकीय गुंतवणुकीद्वारे (एफडीआय) मुंबई महानगर प्रदेशातील आर्थिक वाढीस चालना देणे

एकूण गुंतवणूक : १ अब्ज डॉलर्स

- **११) कंपनीचे नाव : एमटीसी बिझनेस प्रायव्हेट लिमिटेड + मित्सुई (भारत + जपान)**

सामंजस्य करार : मुंबई महानगर प्रदेशात सर्क्युलर इकॉनॉमी पार्क विकसित करणे

# गुजरातमधील २७ हॉटेल्सचे परवाने रद्द

## गुजरातमध्ये रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनची बेधडक कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**गांधीनगर :** गुजरात रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनने राज्यातील एकूण २७ हॉटेल्सचे करार रद्द केले आहेत. त्यामुळे यापुढे रेस्टॉरंटजवळ एसटी बस थांबणार नाही. संबंधित हॉटेलला हिंदू नावाने परवाना देण्यात आला होता. परंतु प्रत्यक्षात रेस्टॉरंट मालक हा मुस्लिम असल्याची घटना समोर येत आहे.

या यादीमध्ये वडोदरा, राजकोट, गोध्रा, मेहसाणा, भुज, भरूच अहमदाबाद, नाडियाद, पालनूर आदी विभागातील हॉटेल्सचा समावेश आहे. २७ हॉटेलच्या यादीमध्ये काही हिंदू देवतांची नावे आहेत, अशी माहिती प्रथमदर्शनी समोर आली आहे. भुज-ध्रगंध्र-अहमदाबाद मार्गावरील हॉटेल शिवशक्तीचाही या यादीत समावेश आहे. हॉटेलला हिंदू देवतेचे नाव देण्यात आले होते आणि परवानगी हिंदू नावाने घेण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात मालक आणि व्यवस्थापन मुस्लिम होते. सुरत-अहमदाबाद मार्गावरील हॉटेल तुलसीच्या नावाचा यादीत समावेश आहे.

याशिवाय भरुच विभागामधील सुरत-अहमदाबाद मार्गावरील हॉटेल मारूती परमिटही रद्द करण्यात आले. हॉटेल वृंदवाडा, जे वडोदरा-गोधरा-मोडासा



मार्गावर आहे. त्याची परवानगीही रद्द करण्यात आली आहे. अहमदाबाद-मेहसाणा-पालनपूर मार्गावरील हॉटेल गुरूकृपाण परमिटही पालिकेने रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्याचप्रमाणे अहमदाबाद-राजकोट मार्गावरील हॉटेल सर्योदय, अहमदाबाद- बालासिनोर-गोधरा-जालोद मार्गावरील श्रीजी रेस्टॉरंट, अहमदाबाद-सुरत मार्गावरील हॉटेल श्यालय, हॉटेल गॅलेक्सी, हॉटेल रोनक, अहमदाबाद-ध्रगंधा-भुज मार्गावरील हॉटेल सर्वोदय, सुरत मार्गावरील हॉटेल अहमदाबाद रोडसह हॉटेस सतीमाता इत्यादींचा समावेश आहे. यापूर्वी हिंदूंच्या नावाने अनेक मुस्लिम हॉटेल मालकांनी चालवल्या जाणाऱ्या हॉटेलची चौकशी करण्याचे आवाहन सोशल मीडियावर वारंवार केले होते. अखेर या प्रकरणामध्ये गुजरात रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनने कारवाई केली आहे.

# मुस्लिमाशी विवाह केला म्हणून पत्नीचे धर्मांतर होत नाही - दिल्ली उच्च न्यायालय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** कौटुंबिक वाद मिटवताना दिल्ली उच्च न्यायालयाने गुरुवारी महत्त्वाचे भाष्य केले आहे. केवळ मुस्लीम पुरुषाशी लग्न केल्याने महिलेचे आपोआप हिंदूतून इस्लाम मध्ये रूपांतर होत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. न्यायमूर्ती जसमीत सिंह हे पतीच्या पहिल्या पत्नीच्या मोठ्या मुलीने दुसऱ्या पत्नीच्या दोन मुलांविरोधात दाखल केलेल्या मालमत्ता विभागणीच्या वादावर सुनावणी करताना याचिकाकर्त्या महिलेला वडिलांच्या मालमत्तेचा पाचवा वाटा देण्यात यावा, असे निरीक्षण नोंदवले.




पुष्प लता नावाच्या महिलेने २००७ मध्ये सावत्र भावांविरोधात मालमत्तेच्या वादाची तक्रार दाखल केली होती. पुष्पलता ही वडिलांच्या पहिल्या पत्नीची मोठी मुलगी आहे. त्याच्या वडिलांनी दुसरे लग्न केले होते. दुसऱ्या पत्नीतील दोन मुले वडिलांची संयुक्त मालमत्ता विकत होती. पुष्पलता यांनी यावर आक्षेप घेत हिंदू उत्तराधिकार (सुधारणा) कायदा २००५ अन्वये १/५ वाटा देण्याची मागणी केली होती. डिसेंबर २००८ मध्ये खटला सुरू असतानाच तिच्या वडिलांचे निधन झाले.

पुष्पलता यांनी आपल्या याचिकेत असा युक्तिवाद केला होता की, प्रत्येक मालमत्तेत आपला आणि तिच्या बहिणींचा एक पंचमांश वाटा आहे. प्रतिवादी मुले (दुसऱ्या पत्नीच्या पोटी जन्मलेली मुले) फिर्यादी मुलींच्या संमतीशिवाय हिंदू संयुक्त कुटुंबाच्या मालमत्ता विकण्याचा आणि विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न करीत असल्याने हा खटला दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात वडिलांनी या खटल्याला विरोध केला होता की, त्यांची मोठी मुलगी जी याचिकाकर्ते आणि फिर्यादी आहे ती आता हिंदू नाही कारण तिने युनायटेड किंग्डममध्ये पाकिस्तानी वंशाच्या मुसलमानाशी लग्न केले आहे.

### कोकणात महायुतीच

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सिंधुदुर्ग :** कोकणातून एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. कोकणात पुन्हा एकदा महाविकास आघाडीला धक्का बसला आहे. कुडाळ नगरपंचायतीच्या निवडणुकीत आमदार निलेश राणेंनी महाविकास आघाडीचा एक नगरसेवक फोडत महाविकास आघाडीच्या माजी आमदार वैभव यांना मोठा झटका दिला आहे. या विजयानंतर महायुतीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

कुडाळमध्ये आमदार निलेश राणे यांनी महाविकास आघाडीचा एक नगरसेवक फोडत नगरपंचायतीपदी भाजपच्या नगराध्यक्ष निवडून आणला आहे. भाजपच्या प्राजक्ता बांदेकर शिरवळकर यांनी मविआच्या सई काळप यांना पराभूत केलं आहे. निवडणुकांआधी महायुतीच्या पारड्यात मविआकडे ९ तर महायुतीकडे ८ नगरसेवक होते.

### विस्थापितांचा प्रवास

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



**रफाह** दक्षिण गाझा पट्टीतील रफाह येथे इस्रायल आणि हमास यांच्यातील युद्धविरामानंतर विस्थापित पॅलेस्टिनी ट्रकमधून प्रवास करताना दिसून येत आहेत.

### भारतीय दांम्पत्याला अमेरिकेत रोखले

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प बेकायदा स्थलांतरितांच्या मुद्द्यावर अत्यंत कठोर असून यामुळे भारतासह जगातील अनेक देशांमध्ये खळबळ उडाली आहे. इमिग्रेशन नियमांमधील बदलांमुळे अमेरिकेतील भारतीय समुदायही चिंतेत आहे. दरम्यान, अमेरिकेतील विमानतळावरून भारतीयांना प्रवेश दिला जात नसल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अमेरिकेत राहणाऱ्या एका व्यक्तीच्या भारतीय आई-वडिलांकडे परतीचे तिकीट नसल्यामुळे त्यांना प्रवेश नाकारण्यात आला.

माध्यमातील वृत्तानुसार, अमेरिकेत मुलांना भेटण्यासाठी गेलेल्या भारतीय पालकांना नेवार्क विमानतळावर प्रवेश देण्यात आला नाही.

#### अदानी समूहाला धक्का

## श्रीलंकेने रद्द केला करार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** गौतम अदानी समूहाला मोठा धक्का बसला आहे. श्रीलंकेने समूहाच्या अदानी ग्रीन एनर्जीसोबतचा ४४ ० दशलक्ष डॉलर्सचा वीज खरेदी करार रद्द केला आहे. त्याचबरोबर या प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. या बातमीदरम्यान शुक्रवारी अदानी समूहातील बहुतांश लिस्टेड कंपन्यांच्या शेअरमध्ये मोठी घसरण पाहायला मिळाली.

माध्यमांतील वृत्तानुसार, श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमार डिसानायके यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाने अदानी समूहाला मोठा धक्का दिला आहे. मन्नार आणि पूनरिन येथील पवन ऊर्जा प्रकल्पांच्या बांधकामाचे कंत्राट अदानी ग्रीन एनर्जी एसएल लिमिटेडला देण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने मागे घेतला आहे. त्यामुळे वीज खरेदी करार रद्द करण्यात आला आहे. आपल्या निवडणूक प्रचारादरम्यान विद्यमान राष्ट्राध्यक्षांनी हा करार रद्द करून श्रीलंकेत पवन ऊर्जा विकसित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय निविदा मागविण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता करत मंत्रिमंडळाने मे २०२४ मध्ये घेतलेला यापूर्वीचा निर्णय रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.

गौतम अदानी यांच्यासह समूहाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर अमेरिकेत भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे श्रीलंकेच्या नव्या सरकारने कारवाई केली आहे. अमेरिकेतील आरोपांनंतर श्रीलंकेचे नवे अध्यक्ष अनुरा कुमार दिसानायकेंनी अदानींच्या स्थानिक प्रकल्पांची चौकशी सुरू केली.

# ट्रुडो यांनी दिला डोनाल्ड ट्रम्प यांना इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** डोनाल्ड ट्रम्प यांच्या राष्ट्राध्यक्षपदाच्या दुसरा कार्यकाळाची सुरुवात अनेक वादग्रस्त निर्णयापासून झाली आहे. ट्रम्प यांनी कॅनडा आणि मेक्सिको या देशांवर २५ टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लागू करणार असल्याचे म्हटले आहे. ट्रम्प यांच्या घोषणेनंतर आता कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो यांनी देखील अमेरिकेला इशारा दिला आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी कॅनडाच्या उत्पादनांवर व्यापक टॅरिफ लागू करण्याचा निर्णय घेतल्यास अमेरिकेलाच याची मोठी किंमत चुकवावी लागेल, असे ट्रुडो यांनी म्हटले आहे.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅरिफच्या घोषणेवर बोलताना ट्रुडो म्हणाले की, '२० जानेवारी किंवा १फेब्रुवारी, १५ फेब्रुवारी किंवा १ एप्रिल असो... जेव्हा ते टॅरिफ लादतील त्यावेळी कॅनडाकडून देखील उत्तर दिले जाईल व अतिरिक्त शुल्क लादण्यात येईल. यामुळे अमेरिकन ग्राहकांसाठीही प्रत्येक गोष्टीची किंमत वाढेल. असे व्हावे असे ट्रम्प यांना नक्कीच वाटत नसेल.'

अमेरिकेने कॅनडासोबत आर्थिक विकासासाठी आवश्यक असलेल्या वस्तू आणि खनिजांवर काम करायला हवे. ट्रम्प यांनी तसे करण्याचे आश्वासन देखील दिले आहे.

# एअरटेलची सॅटेलाइट इंटरनेट सेवेची तयारी

### टेलिकॉम

**भारतातील टेलिकॉम सेक्टरमध्ये क्रांती होणार आहे. लवकरचं एअरटेल कंपनी देशात सॅटेलाइट इंटरनेट सेवा सुरू करणार आहे. कंपनीनी सॅटेलाईट इंटरनेट सेवा सुरू करण्याची तयारी देखील सुरू केलीय. यामुळं स्टारलिंकसारख्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांना आव्हान मिळणार नाही तर देशातील दुर्गम भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटीलाही चालना मिळेल.**

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**हैदराबाद** : एअरटेल भारतात आपली सॅटेलाइट इंटरनेट सेवा सुरू करण्याच्या तयारीत, एअरटेलनं गुजरात आणि तामिळनाडूमध्ये आपल्या दोन बेस स्टेशनचं बांधकाम पूर्ण केलं आहे. आता कंपनी स्पेक्ट्रम वाटपाची वाट पाहत आहे. एलोन मस्कची स्टारलिंक देशात आपली सेवा सुरू करण्यापूर्वी एअरटेल सॅटेलाइट इंटरनेट सेवा सुरू करणार आहे. भारती एंटरप्रायझेसचे उपाध्यक्ष राजन भारती मित्तल यांनी अलीकडेच सांगितलं, की एअरटेलनं गुजरात आणि तामिळनाडूमध्ये आपल्या बेस स्टेशनचं काम पूर्ण केलं आहे.



सॅटेलाइट इंटरनेट सेवा सुरू करण्यासाठी कंपनी सरकारकडून हिरवा झेंडा मिळण्याची वाट पाहत आहे. प्रक्षेपण तारीख किंवा वेळेबद्दल विचारलं असता, ते म्हणाले की आवश्यक परवानगी मिळताच, भारतात उपग्रह सेवा सुरू केल्या जातील आणि कंपनीकडून कोणताही विलंब होणार नाही. यासाठी एअरटेलनं आधीच उपग्रह प्रक्षेपित केले आहेत.

एअरटेल कंपनी भारतात स्टारलिंकला स्पर्धा देऊ शकतो. स्टारलिंक भारतातही आपल्या सेवा सुरू करण्याची योजना आखत आहे, परंतु त्यांना अद्याप सरकारकडून परवानगी मिळालेली नाही. याशिवाय, स्टारलिंकच्या सेवा महाग असण्याची शक्यता आहे, तर एअरटेलनं दुर्गम भागात परवडणाऱ्या दरात सेवा देण्याचं आश्वासन दिलं आहे.

याव्यतिरिक्त, सरकारनं अलीकडेच इंट्रा सर्कल रोमिंग सुविधा सुरू केली आहे. या अंतर्गत, जिओ, बीएसएनएल, एल आणि एअरटेल वापरकर्ते आता त्यांचे स्वतःचे सिम सिग्नल नसलं तरीही कोणत्याही उपलब्ध नेटवर्कचा वापर करून कॉल करू शकतात. ही सुविधा दुर्गम भागात नेटवर्क कव्हरेज सुधारण्यास मदत करेल.

» Selected

## घोडेगाव वकील संघाच्या अध्यक्षपदी अॅड निघोट



**अवसरी :** घोडेगाव वकील संघाच्या अध्यक्षपदी अॅड. समीर भगवानराव निघोट यांची बिनविरोध निवड झाली आहे. इतर कार्यकारिणीही बिनविरोध निवडली गेली आहे. घोडेगाव वकील संघाची निवडणूक प्रक्रिया बिनविरोध पार पडली. उपाध्यक्ष म्हणून अॅड प्रकाश अशोक शहाणे, अॅड अनिता पाटील, अॅड प्रतीक्षा काळे, सचिव म्हणून अॅड इरफान शेख,अॅड.आकाश काळे, खजिनदार अॅड. अश्विनी दगडे, ऑडिटर अॅड. भूषण शिंदे, अॅड. राहुल थोरात, अॅड श्रेयस बाणखेले यांची निवड झाली. नवनिर्वाचित अध्यक्ष समीर निघोट हे गेली २५ वर्ष घोडेगाव, राजगुरुनगर तसेच पुणे येथील न्यायालयात वकिली व्यवसाय करत आहेत. नवनिर्वाचित कार्यकारिणीचा सत्कार घोडेगाव न्यायालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात मुख्य न्यायाधीशांच्या हस्ते करण्यात आला यावेळी. मावळते अध्यक्ष अॅड.प्रमोद काळे व त्यांच्या कार्यकारणीच्या वतीने पदाधिकाऱ्यांचा सत्कार झाला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अॅड. एस. बी. सूर्यवंशी यांनी काम पाहिले, सूत्रसंचालन अॅड. नवनाथ निघोट यांनी केले, तर आभार अॅड.मुकुंद वळसे पाटील यांनी मानले.


## घोडेगाव तहसील कार्यालयात मतदार दिन साजरा



**अवसरी :** १५ व्या राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त तहसिल कार्यालय घोडेगाव येथे मतदार दिन साजरा करण्यात आला असल्याची माहिती नायब तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी दिली. ज्येष्ठ मतदार, नव मतदार, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. मतदार नोंदणी अधिकारी आंबेगाव तथा प्रांत अधिकारी आंबेगाव गोविंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच नायब तहसीलदार शांताराम किर्वे, नायब तहसीलदार डॉ सचिन वाघ, शांता बांगर यांच्या उपस्थितीत पार पाडला. प्रांताधिकारी गोविंद शिंदे यांनी मतदारांनी नोंदणी करून मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन यावेळी केले.

## चाकण शिक्रापूर कंटेनर अपघातातील धनश्रीची झुंज अपयशी

**शिक्रापूर :** चाकण शिक्रापूर महामार्गावर १६ जानेवारी रोजी कंटेनर चालकाने एका युवतीसह दोघा महिलांना चिरडत तब्बल पंचवीस



किलोमीटर वाहनांना ढोकर केलेल्या अपघातात जखमी झालेल्या धनश्रीची आठ दिवसाची मृत्यूशी सुरु असलेली झुंज अपयशी ठरली असून धनश्री अंबादास गाढवे या सात वर्षीय बालिकेचा दुर्दैवाने मृत्यू झाला आहे. चाकण शिक्रापूर महामार्गावर कंटेनर चालकाने चाकण येथे दोन महिलांसह एका दुचाकीला धडक देऊन शिक्रापूर जवळील जातेगाव खुर्द गाठले. या पंचवीस किलोमीटर अंतरामध्ये त्याने पोलिसांच्या वाहनासह बाराहून अधिक वाहनांना धडक देत अपघात केला. यावेळी आपल्या आईच्या मैत्रिणीसोबत दुचाकीहून चाललेल्या धनश्रीला कंटेनरने दिलेल्या धडकेमध्ये ती गंभीर जखमी झाली होती. तिच्यावर पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र सोमवारी सायंकाळी उपचारादरम्यान धनश्री अंबादास गाढवे (७, रा. रासे ता. खेड) या बालिकेचा मृत्यू झाला. याबाबत चाकण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रोहिदास भिकाजी मोरमारे (४५, रा. चाकण ता. खेड) यांनी चाकण पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने, पोलिसांनी कंटेनर चालक अकिब अब्दुल रज्जाक (२४, रा. पंचका ता. पलवल जि. पळवल हरीयाना) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. चाकण पोलिसांनी अकिब अब्दुल रज्जाक याला ताब्यात घेतले असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अभिजित चौगुले हे करत आहे.

## प्रा. सोमनाथ माने यांना गुणवंत शिक्षक पुरस्कार



**इंदापूर :** श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांच्या शुभहस्ते प्रा. सोमनाथ माने सर यांना राज्यस्तरीय महात्मा फुले व सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षक पुरस्कार पुणे येथे प्रदान करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार दत्तात्रय सावंत, विपुल वाघमारे, गणेश माने देशमुख, शिवाजी खांडेकर, रावसाहेब मिरगणे, श्रीलेखा पाटील आदी उपस्थित होते. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील जवळपास ३० गुणवंत शिक्षकांना यावेळी गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. औदुंबर लोंढे यांनी केले, तर सूत्रसंचालन प्राध्यापक सोमनाथ गोडसे, तर स्वागत महेश आप्पा शिंदे व योगेश निंबाळकर यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन महात्मा फुले इतिहास अकादमी, राष्ट्र सेवा समूह, रयत प्रकाशन, गिरी प्रेमी ग्रुप पुणे यांनी केले.

## स्वराज्य ट्रेकर्सने घेतला वासोटाचा अनुभव



**शिक्रापूर :** शिरुर तालुक्यातील वेगवेगळ्या गावातील शिक्षक युवक, युवती, महिला व नागरिक एकत्र येऊन निर्माण झालेल्या स्वराज्य ट्रेकर्स ग्रुपने वासोटा सर करण्याची मोहीम हाती घेय नुकतेच वेगळा अनुभव घेऊन आनंद लुटला. शिरुर तालुक्यातील वेगवेगळ्या गावातील बहुसंख्य शिक्षक व शिक्षक परिवारातील सदस्य असलेल्या स्वराज्य ट्रेकर्स ग्रुपच्या शंभर लोकांच्या समूहात अनेक महिला देखील असून, त्या ग्रुपने नुकतेच वासोटा मोहीम हाती घेतली. दोन दिवस चालणाऱ्या या मोहिमेचे कोयना धरणाच्या काठावर आयोजन केलेले असताना येथे कॅम्पिंगच्या टेन्टमध्ये मुक्काम, शेकोटी व समूहातील सदस्यांना आपले विविध कलाविष्कार सादर करण्याची संधी मिळाली.

# बाबू पाटे यांचा शिवसेनेत प्रवेश?

## उद्धव ठाकरे गटाला जुन्नरमध्ये खिंडार : शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश





■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यामध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाला खिंडार पडणार असून या पक्षाचे विधानसभा संघटक व नारायणगाव ग्रामपंचायतचे विद्यमान उपसरपंच बाबू पाटे आपल्या सहकाऱ्यांसह लवकरच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात प्रवेश करणार असल्याची खात्रीलायक माहिती आहे. त्यांच्यासोबत इतरही पक्षाचे कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करणार असल्याचे समजत आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे लवकरच जुन्नर तालुक्याच्या दौऱ्यावर येणार असून, त्यांच्या उपस्थितीत हा प्रवेश होणार आहे. बाबू पाटे यांनी देखील या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

जुन्नर तालुक्यामध्ये उद्धव ठाकरे गटाची ताकद चांगली आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये त्यांनी महाविकास आघाडीच्या उमेदवाराचे काम पूर्ण ताकदीने केले होते. जुन्नर विधानसभा निवडणुकीत जुन्नरचे विद्यमान आमदार शरददादा सोनवणे यांना महाविकास आघाडीच्या शरद पवार गटाने उमेदवारी द्यावी, अशी मागणी सुरज वाजगे व नारायणगावचे उपसरपंच बाबू पाटे यांनी केली होती. तसेच उद्धव ठाकरे गटाचे माजी आमदार बाळासाहेब दांगट यांनी देखील आपल्यालाच उमेदवारी मिळावी, असा आग्रह केला होता. तथापि, उमेदवारी न मिळाल्यामुळे त्यांनी अपक्ष उमेदवार शरद सोनवणे यांचे काम केले होते. शरद पवार गटाचे युवा नेते सुरज वाजगे यांनी देखील शरद सोनवणे यांना शरद पवार गटाने उमेदवारी द्यावी, अशी मागणी केली होती. त्यांच्याही मागणीची वरिष्ठांनी दखल घेतली नव्हती.

जुन्नरविधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे उमेदवारी सत्यशील शेरकर यांना मिळाल्याने सुरज वाजगे यांनी अपक्ष उमेदवार शरद सोनवणे यांचे उघड काम केले. त्यामुळे वाजगे यांची शरद पवार गटातून हकालपट्टी करण्यात आली होती. तसेच बाळासाहेब दांगट यांनी देखील महाविकास आघाडीचा धर्म न पाळता अपक्ष उमेदवाराचा प्रचार केल्याने त्यांनाही ठाकरे गटातून काढून टाकण्यात आले होते.

दरम्यान, जुन्नर तालुक्यामध्ये शिवसेनेची फारशी ताकत नाही. विद्यमान आमदार शरद सोनवणे यांनी विधानसभा निवडणुकीच्या वेळी महायुतीचा धर्म न पाळता अपक्ष उमेदवारी जाहीर केल्याने त्यांना पक्षातून काढून टाकण्यात आले होते. तथापि, विजयी झाल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी हेलिकॉप्टर पाठवून त्यांना मुंबई येथे बोलवून घेतले होते. सोनवणे यांनी महायुती सरकारला बाहेरून पाठिंबा दिला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे लवकरच जुन्नर तालुक्यामध्ये मेळावा घेणार असून या मेळाव्यामध्ये अपक्ष आमदार शरद सोनवणे यांचा पुन्हा पक्षात प्रवेश घेऊन, त्यांच्या समवेत माजी आमदार बाळासाहेब दांगट, बाबू पाटे तसेच सुरज वाजगे आदींचा पक्ष प्रवेश होणार असल्याची चर्चा आहे. दरम्यान माजी आमदार बाळासाहेब दांगट यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, त्यांनी फोन न उचलल्याने त्यांची याबाबतची प्रतिक्रिया समजू शकले नाही. या संदर्भामध्ये सुरज वाजगे यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता ते म्हणाले मी कामात आहे, असे म्हणून या विषयावर बोलण्याचे त्यांनी टाळले. मात्र बाबू पाटे यांनी आपण आपल्या अनेक सहकाऱ्यासह एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याचे दैनिक राष्ट्र संचारच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

## दसगुडे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** कारेगाव, ता.शिरुर येथील आणि सध्या गेनबा सोपानराव मोझे माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेतील पर्यवेक्षक मारुती रामभाऊ दसगुडे यांना नुकताच पुणे येथील महात्मा फुले इतिहास अकादमीच्या वतीने राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले.

माजी खासदार छत्रपती संभाजीराजे यांच्या शुभहस्ते आणि इतिहास अभ्यासक व विचारवंत डॉ.श्रीमंत कोकाटे यांच्या उपस्थितीत दसगुडे यांना हा पुरस्कार देण्यात आला. १९९४ पासून गेनबा सोपानराव मोझे संस्थेमध्ये इंग्रजी विषयाचे अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना देणारे अभ्यासपूर्वक,सामाजिक, अध्यात्मिक, शैक्षणिक सातत्यपूर्ण उपक्रम ते अध्यापन करत असताना राबवत आहेत.

# सापडलेले एक लाख रुपये केले परत

## राजगुरुनगर शहरातील घटना : संगणक ऑपरेटरचा सत्कार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**खेड :** समाजात प्रामाणिकपणा, माणुसकी टिकून असल्याची प्रचिती देणारे उदाहरण राजगुरुनगर शहरात घडले. पैशांनी भरलेली पिशवी मिळाल्यानंतर तरुणाने मिळालेल्या पैशांचा मोह न ठेवता पिशवीच्या मूळ मालकाला एक लाख रुपये परत करत प्रामाणिकपणाचे दर्शन घडविले. अक्षय अरगडे (रा. कडूस ता खेड) असे या तरुणाचे नाव असून तो खेड दुय्यम निबंधक कार्यालयात संगणक ऑपरेटर म्हणून कार्यरत आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, एलआयसी विस्तार अधिकारी जयसिंग निवृत्ती मांजरे हे बुधवारी दुपारी दुय्यम निबंधक कार्यालयात कामानिमित्त आले होते. कार्यालयात गर्दी व कामाची गडबड असल्यामुळे त्यांनी त्यांच्या जवळील १ लाख रुपये व कागदपत्रे असलेली पिशवी कार्यालयाच्या बाहेर कोपऱ्यातील बाकड्यावर ठेवली. पिशवी परत घेण्यास ते विसरून गेले. रात्री साडेसात वाजता घरी गेल्यावर पिशवी विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. तात्काळ त्यांनी पुन्हा कार्यालय गाठले. मात्र पिशवी सापडली नाही. कार्यालयाबाहेर सीसीटीव्ही कॅमेरे नसल्यामुळे आपले पैसे सापडणार नाही, असे त्यांनी पक्के केले. कार्यालयातील कर्मचाऱ्यांना पिशवी सापडली का? अशी विचारणा त्यांनी केली.

संगणक ऑपरेटर अरगडे यांना पिशवी सापडली होती. त्यांनी जयसिंग मांजरे यांना तुमच्या पिशवीत किती पैसे होते? अजून काय काय होते, असे विचारुन ओळख पटल्यानंतर सापडलेली पैशाची पिशवी परत केली. अरगडे यांच्या प्रामाणिकपणा बद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दुय्यम निबंधक अधिकारी व्ही व्ही पोळ, राजगुरूनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष दिनेश ओसवाल, संचालक राजेंद्र सांडभोर,माजी नगराध्यक्ष शिवाजी मांदळे, अॅड संजय साकोरे,जयसिंग मांजरे, प्रदीप भुमकर, निलेश घुमटकर, बापूसाहेब नगरकर यांनी दुय्यम निबंधक कार्यालयात जाऊन अक्षयच्या प्रमाणिक पणाबद्दल त्याचा सत्कार केला.

## चांडोली येथे धावपटू हरिश्चंद्र थोरात यांचा सत्कार



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**अवसरी :** चांडोली येथील स्विमिंग स्टार ग्रुपच्या वतीने ७१ वर्षीय जागतिक पातळीवरील धावपटू हरिश्चंद्र थोरात यांनी नुकत्याच मेंगलोर येथे झालेल्या मास्टर अशियन गेम मध्ये सहभाग घेऊन, त्यांनी श्रीलंका, भूतान, बांगलादेश, नेपाळ, भारत या देशातील खेळाडूंमधून चार सुवर्णपदक मिळविल्याबद्दल त्यांचा जाहीर नागरी सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शरद सहकारी बँकेचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र देशमुख, तसेच आयुष मंत्रालयाचे सदस्य साहेबराव मेंगडे, सरपंच दत्ता केदार, माजी आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते ज्ञानेश्वर थोरात गुरुजी, करियर अकॅडमीचे प्रमुख मिथुन पांचाळ तसेच हरिश्चंद्र थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तयार झालेले व नुकतीच पोलीस दलामध्ये निवड झालेले त्यांचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन स्विमिंग स्टार ग्रुपचे कैलास मावकर, सुभाष थोरात, अरुण इंदोरे, शेखर थोरात, प्रभाकर गायकवाड ,कान्होबा थोरात, सोपान टेमगिरे, बाळू चव्हाण, संजय लोंढे, उत्तम लोंढे, बापू लोंढे, संजय पवळे आदींनी केले. सूत्रसंचालन अक्षय खरमाळे, तर आभार पोपट थोरात यांनी मानले.

## दुष्काळी गाव ते जलसंपन्न मॉडेल व्हिलेज

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** दुष्काळग्रस्त गाव ते आदर्श पाणीदार गाव अशी गावाची ओळख निर्माण करणाऱ्या कान्हाटी, ग्रामपंचायतच्या सरपंच दिपाली लोणकर यांना जल योद्धा म्हणून ओळख देऊन त्यांनी केलेल्या कार्याची केंद्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे. २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी विशेष अतिथी म्हणून बारामती तालुक्यातील कान्हाटी, ग्रामपंचायतचे सरपंच दिपाली लोणकर यांना निमंत्रित करण्यात आले आहे.

जागतिक बँक अर्थ सहाय्यित व केंद्रशासन पुरस्कृत अटल भूजल योजना ही सध्या राज्यातील १३ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. यात पुणे जिल्ह्यातील १०६ ग्रामपंचायतींचा समावेश आहे व यामध्ये अटल भूजल योजनेअंतर्गत अंतर्गत काम सुरू आहे.

बारामती तालुक्यातील कान्हाटी गावाने अटल भूजल योजनेअंतर्गत रिचार्ज शाफ्ट सिमेंट बंधारे, कोल्हापुरी बंधारे, ओढा खोलीकरण, गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार यांसारखी विविध जलसंधारणाची कामे केली आहेत. यामुळे गावातील वाहून जाणारे पाणी गावच्या शिवारात थांबवण्यात गावाला यश आलंय.

केंद्र व राज्य सरकार यांच्या माध्यमातून सुरू झालेल्या अटल भूजल योजना जलसंधारण च्या कामासाठी व पाणी बचतीच्या उपाययोजनांसाठी मोलाची ठरली आहे असे मत कान्हाटी ग्रामस्थांनी व्यक्त केले. या योजनेच्या प्रोत्साहन निधीच्या माध्यमातून रिचार्ज शाफ्ट ही कामे करण्यात आली.

## जलयोद्धा...

राष्ट्र संचार छायाचित्र सेवा



कान्हाटी — कान्हाटी, ग्रामपंचायतच्या सरपंच दिपाली लोणकर यांना जल योद्धा म्हणून ओळख देऊन त्यांनी केलेल्या कार्याची केंद्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे.

### मराठी बाल साहित्य संमेलनाची

# दुसऱ्या दिवसाची ग्रंथदिंडीने दिमाखदार सुरुवात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**चाळकवाडी :** महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुबंई पुरस्कृत अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे आणि शिवांजली साहित्यपीठ, शिवांजली ग्रामविकास प्रतिष्ठान, चाळकवाडी (ता. जुन्नर) आयोजित अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनाच्या दुसऱ्या दिवसाची ग्रंथदिंडीने दिमाखदार सुरुवात झाली.

चाळकवाडी लगतच्या महामार्गापासून सुरू झालेली ग्रंथदिंडी गावातून फिरून कविवर्य ग. ह. पाटील बालसाहित्य नगरीत (संमेलनस्थळी) आली. महापुरुषांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांचा सहभाग होता. 'ज्ञानदेव-तुकाराम' नामाचा गजर करत ग्रंथदिंडीतील विद्यार्थ्यांनी 'वाचन संस्कृती घरोघरी, तिथे फुले ज्ञानपंढरी', 'ग्रंथ हेच गुरू', 'जिथे दिसते पुस्तक, तिथे व्हावे नतमस्तक', 'ग्रंथ आमचे साथी, ग्रंथ आमच्या हाती, ग्रंथ उजळती अज्ञानाच्या, अंधाराच्या राती' असे फलक घेऊन वाचन संस्कृतीचा जागर केला. विद्यार्थ्यांच्या लेझीम-ढोल पथकाचा ग्रंथदिंडीत सहभाग होता. सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते ग्रंथपूजन झाले. शिवांजली प्राथमिक विद्यालय, शिवांजली विद्यानिकेतन, शिवाजी विद्यार्थी वसतीगृह, न्यू इंग्लिश स्कूल, आंबोडी, मारोतराव लांडगे विद्या निकेतन, कळंब, जि. प. प्राथमिक शाळा, चाळकवाडी, कोळवाडी, पिंपळवंडी, सुभाष विद्या मंदिर पिंपळवंडी, विशाल जुन्नर सेवा मंडळ शैक्षणिक संकुल, कांबळी या शाळांमधील विद्यार्थ्यांचा ग्रंथदिंडीत सहभाग होता.



### संमेलनस्थळी ध्वजारोहण

● संमेलनाध्यक्ष सूर्यकांत सराफ, अनिल मेहेर, शरद लेंडे, माधव राजगुरू, अनिल कुलकर्णी, सुनील महाजन, श्रीकांत चौगुले, संजय ऐलवाड, राजेंद्र चौगुले, मुरलीधर साठे, अशोक सातपुते, सचिन बेंडभर, मुरलीधर साठे, मुकुंद आवटे, एकनाथ आव्हाड, मिलिंद कसबे, अनिल काकडे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संमेलनस्थळी ध्वजारोहण झाले.

### आत्मनिर्भरतेसाठी शिक्षण-साहित्य आवश्यक

● ध्वजारोहणानंतर आयोजित कार्यक्रमात अनिल मेहेर म्हणाले, साहित्यकलेचा आविष्कार, अभिरूची व्यक्त केली जाते त्यामागे साहित्यिकाची विशिष्ट भूमिका असते. राष्ट्र उभारणीसाठी, आत्मनिर्भरता मिळविण्यासाठी शिक्षणाची व त्याला जोड म्हणून साहित्याची आवश्यकता आहे. बालसाहित्याविषयीची रुची मुलांमध्ये वाढीस लागण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. बालसाहित्यिक, बालकवी मुलांच्या मनावर संस्कार करत असतात, त्यांची जडणघडण करण्याचे कार्य करीत असतात. संस्कृती आणि संस्कार जपण्यासाठी भाषा आणि साहित्याची जपणूक महत्त्वाची भूमिका आहे. यासाठी साहित्य चळवळ राबवावी. प्रास्ताविक माधव राजगुरू यांनी केले. आभार शरद लेंडे यांनी मानले. सुरुवातीस भोसले आणि मंडळींनी समतेचा गोंधळ सादर केला. सूत्रसंचालन बाबासाहेब जाधव यांनी केले.

#रा

» Selected

## डॉ रामदास कुटे यांना रामराजे जगताप पुरस्कार जाहीर



**जेजुरी :** महाराष्ट्र आयुर्वेदिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (मामा) तसेच जेजुरी इंड स्ट्रियल मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे यांना रामराजे विविध सहकारी सोसायटी वानेवाडीच्या वतीने रामराजे जगताप स्मुर्ती पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ. रामदास कुटे जेजुरी उद्योजक संघटनेचे अध्यक्ष असून, कडेपठार ग्रामीण वैद्यकीय आणि संशोधन प्रतिष्ठान, इंदू इंग्लिश स्कूलचे व्यवस्थापकीय संचालक, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा ड्रीम प्रोजेक्ट असणाऱ्या भारतातील औषध उत्पादनांसाठीचे पहिले संशोधन केंद्र इंदूकेअर फार्मास्युटिकल्स आणि रिसर्च फाउंडेशन महाराष्ट्र आयुर्वेदिक मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे ते प्रमुख आहेत. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत शिष्टमंडळात त्यांचा सहभाग होता. आयुर्वेदिक औषधांच्या प्रसारासाठी त्यांनी रशिया, बेलारूस, कझाकिस्तान, व्हिएतनाम, इथिओपिया, मॉरिशस, स्वीडनसह ४८ देशांचा प्रवास केला आहे. आयुर्वेद क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल डॉ कुटे यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

## रांजणगावला हवा सुसज्ज बस थांबा



**रांजणगाव गणपती :** अष्टविनायकांपैकी एक असलेल्या तीर्थक्षेत्र रांजणगाव गणपती येथे सर्व सुविधायुक्त व अद्ययावत असा बस थांबा उभा करण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी युवा सेना जिल्हाप्रमुख बापूसाहेब शिंदे यांनी केली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व युवासेना मार्गदर्शक खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे येथे युवासेना राज्य कार्यकारिणी सदस्य आणि जिल्हाप्रमुखांची विशेष बैठक पार पडली. यावेळी युवासेनेचे कार्याध्यक्ष पुर्वेशज प्रताप सरनाईक यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना संबोधित केले. या प्रसंगी शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या वतीने पूर्वेश सरनाईक यांचा युवासेना सचिव किरण साळी, युवासेना राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य सचिन बांगर, युवासेना जिल्हाप्रमुख बापुसाहेब शिंदे, वैभव खेडकर यांनी श्री महागणपतीची प्रतिमा भेट देऊन सन्मान केला व शिरूर - आंबेगाव तालुक्यातील विविध विकासकामांना व रांजणगाव गणपती येथे अद्ययावत एस.टी. बसथांबा उभारण्यासाठी निधी मिळावा अशी केली.

## सुदाम शेळके यांचे निधन



**रांजणगाव गणपती :** आदर्श शिक्षक , प्रगतशील शेतकरी, माजी सरपंच सुदाम आनंदराव शेळके यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, दोन मुले, भाऊ, भावजय, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. प्रसिद्ध बागायतदार विलास आनंदराव शेळके यांचे ते जेष्ठ बंधू होते.

## विशाल वढणे याचे निधन



**सासवड :** सासवड येथील विशाल सुनील वढणे (वय २०) याचे पुणे येथे अपघाती निधन झाले. विशाल याने पुणे येथील दामले महाविद्यालयातून वाणिज्य पदवी प्राप्त केली होती व सध्या तो सनदी लेखापाल (सीए) चा अभ्यास करत होता. त्याच्या मागे आई रेखा, बहिण जानकी व वडील सुनिल असा परिवार आहे. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान संस्थेच्या पुरंदर तालुक्यातील जेऊर विद्यालयातील प्रयोगशाळा परिचारक सुनील वढणे यांचा विशाल मुलगा होता.

## जनार्दन दांडगे यांना मातृशोक



**रुळी कांचन :** डिजिटल मीडिया पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष जनार्दन गोवर्धन दांडगे यांच्या मातोश्री केशरबाई दांडगे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

# वीर यात्रेची जय्यत तयारी सुरू

## आमदार विजय शिवतारे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**सासवड :** श्री क्षेत्र वीर (ता. पुरंदर) श्रीक्षेत्र वीर येथील यात्रेनिमित्त देवस्थान ट्रस्टच्या वतीने आमदार विजय शिवतारे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेच्या निमित्ताने होणारी गर्दी लक्षात घेता यंदा बैलजोड्याची मिरवणूक, प्लॅस्टिक वापरावर बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बैठकीसाठी पुरंदरचे तहसीलदार विक्रम रजपूत, प्रांत मॅडम वर्षा लांडगे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रिया माने, स्वाती दहिवाल, नायब तहसीलदार संदीप पाटील, गटविकास अधिकारी संतोष शेळके, तालुका आरोग्य अधिकारी विक्रम काळे, सासवड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक ऋषिकेश अधिकारी उपस्थित होते.

येणाऱ्या भाविकांचे दर्शन यथायोग्य पार पाडण्यासाठी प्रशासनातील सर्व विभागांना योग्य त्या सूचना दिल्या असून त्या सूचनांची अंमलबजावणी काटेकोरपणे करून घेऊन देवस्थान ट्रस्ट आणि यात्रा कमिटीला सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे पुरंदर हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांनी यावेळी सांगितले.

एस टी महामंडळ, महावितरण, तसेच विविध विभागातील अधिकारी वर्ग यांनी यात्रा काळातील नियोजना संदर्भात देवस्थान ट्रस्ट व यात्रा कमिटी यांच्याशी विचार विनिमय केला आहे व त्या दृष्टीने नियोजन करण्याचे ठरविण्यात आले आहे. वीर येथे मोठ्या संख्येने यात्रेकरू येत असल्याने, जास्तीचा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून, चोरीच्या घटना घडू नयेत, यासाठी साध्या वेशातील पोलिस तैनात करण्यात येणार आहेत. वाहन तळावर लाईट व्यवस्था तसेच गावठाणासह कृषी पंपाला २४ तास वीज पुरवठा सुरू ठेवण्यात येणार आहे. जादा एसटी बस, बस स्टॅण्ड, आरोग्य विभागाच्या वतीने दक्षता विभाग, रुग्णवाहिका, जादा आरोग्य कर्मचारी ठेवण्यात येणार असून, यात्रेच्या निमित्ताने घेण्यात आलेल्या आढावा बैठकीत नियोजन करण्यात आले असल्याचे देवस्थान ट्रस्टच्या वतीने राजेंद्र धुमाळ, अमोल धुमाळ यांनी सांगितले.

### प्रशासनाने भूमिका चोख पार पाडावी

● यात्रा काळात प्रशासनाच्या सर्व विभागातील अधिकारी वर्गाने देवस्थान ट्रस्ट व यात्रा कमिटी यांना लागेल ते सहकार्य करून, यात्रा काळात कुठलाही अनुसूचित प्रकार घडता कामा नये, या दृष्टीने सर्व विभागातील सर्व अधिकाऱ्यांनी आपली जबाबदारी चोखपणे पार पाडायची आहे, असे पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत यांनी यावेळी सांगितले.

## शरद पवार गटाला पुरंदरमध्ये खिंडार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यात शरद पवार गटाला मोठे खिंडार पडले असून, तालुक्यातील अनेक आजी माजी पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेचा रस्ता धरला आहे. पुरंदर हवेलीचे आमदार विजय शिवतारे यांच्या नेतृत्वाखाली खासदार श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते मुंबईत हा कार्यक्रम झाला.

यात शहरातील अनेक मातब्बर नेत्यांचा समावेश आहे. सासवडचे माजी उपनगराध्यक्ष दिपक टकले, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य शहाजी गायकवाड, युवक राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वृषाल उर्फ पप्पू भोंगळे, खरेदी विक्री संघाचे संचालक सागर जगताप, सासवड नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष संदीप जगताप, उद्योजक अतुल जगताप, राजू टकले, मयूर जगताप आणि सहकारी संस्थांचे ऑडिटर यशवंत पवार आदींचा यात समावेश आहे. सासवड शहराच्या राजकारणात टकले कुटुंबीय हे एक मातब्बर कुटुंब मानले जाते. दिपक टकले हे माजी मंत्री दादासाहेब जाधवराव यांचे कट्टर समर्थक होते. शहाजी गायकवाड हेदेखील जाधवराव यांच्या तालमीत तयार झाले आहेत.

# रांजणगावातील दोन चोरटे जेरबंद

## एमआयडीसीतील कामगारांना अडवून त्यांची होत होती लूट



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**कारेगाव :** रांजणगाव एमआयडीसीतील कामगारांना अडवून त्यांना लुटणाऱ्या दोघांना जेरबंद करण्यात रांजणगाव एमआयडीसी पोलिसांना यश आले असल्याची माहिती पोलिस निरीक्षक महादेव वाघमोडे यांनी दिली. आकाश निळकंठ हणवते, (रा. देवठाणा, ता. पूर्णा, जि.परभणी) व नवनाथ भाऊराव कोल्हे, (रा.तारला, ता. जि. जालना) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत.

याबाबत रांजणगाव पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हणवते व कोल्हे हे दोघेही रांजणगाव एमआयडीसीतील एका कंपनीत कामाला असून, ते रांजणगाव परिसरात राहायला आहेत. कामगारांच्या खिशातील रक्कम काढून घेणे, दमदाटी करुन त्यांचा मोबाईल हिसकावून घेणे किंवा धमकी देवून मोबाईलमधील रक्कम ऑनलाईन ट्रान्सफर करणे असे प्रकार ते करतात. यामध्ये अनेक कामगारांचे मोबाईल देखील चोरीला गेले होते.

शनिवारी, दि.१८ रोजी रात्री ११ च्या सुमारास मोहम्मद आदिल अन्सारी (मूळ रा. भारत गंज (प्रयागराज), उत्तरप्रदेश) हा कंत्राटी कामगार रात्रपाळीचे काम संपवून ढोकसांगवी येथील आपल्या भाड्याच्या खोलीवर परतत असताना हणवते व कोल्हे हे दुचाकीवरुन त्याच्याजवळ आले. खोलीवर सोडण्याच्या बहाण्याने त्यांनी अन्सारीला लिफ्ट देवून निर्जनस्थळी नेत मारहाण केली आणि त्याच्या मोबाईलवरुन एक हजार रुपये ऑनलाईन ट्रान्सफर करत त्याचा मोबाईल व इअर बड्स काढून घेत पलायन केले.

याप्रकरणी अन्सारीने रांजणगाव एमआयडीसी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरुन या दोघांना अटक करण्यात रांजणगाव एमआयडीसी पोलिसांना यश आले.

## मराठा वॉरियर्स सायकल ग्रुपचे स्वागत



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**जेजुरी :** जेजुरी पुण्याहून श्रीलंकेकडे सायकल प्रवास करणाऱ्या मराठा वॉरियर्स ग्रुपचे जेजुरीत जेजुरी व पुरंदर सायकल ग्रुप तसेच जेजुरी मेडिकल असोसिएशनच्या वतीने फटाके वाजवून व सत्कार करून स्वागत करण्यात आले.

या पथकाचे प्रमुख बजरंग मोळक यांच्या नेतृत्वाखाली पुणे ते श्रीलंका या सायकल मोहिमेचे आयोजन करण्यात आले असून नारायण मालपोटे, संदीप जगताप, संतोष दरेकर, नीलेश धावडे, सचिन काळडोके असे सहा जण या सायकल प्रवासात सहभागी झाले आहेत.

दररोज दीडशे किलोमिटर सायकल प्रवास करून १८ दिवसांनी ते श्रीलंका येथे पोहचणार आहेत. यापूर्वी या मराठा वॉरियर्स ग्रुपने पुणे ते वाघा बॉर्डर, पुणे ते पानिपत, पुणे ते नेपाळ असा सायकलवर प्रवास करून ते श्रीलंकाकडे निघाले असल्याचे बजरंग मोळक यांनी सांगितले.

पुण्याहून जेजुरी येथे पोहचल्यानंतर या सायकलस्वारांचे जेजुरी व पुरंदर सायकल ग्रुप व जेजुरी मेडिकल असोसिएशनच्या वतीने फटाके वाजवून औक्षण व सत्कार करून स्वागत करण्यात आले. यावेळी जेजुरी सायकल ग्रुपचे महेश म्हेत्रे, प्रदीप वाळिंबे, विद्या म्हेत्रे, मेडिकल असोसिएशनचे काका शिंदे, विक्रम खामकर आदींनी स्वागत केले.

## विमानतळाला सातगावचा विरोध कायम

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यात लवकरच विमानतळ होणार असल्याची घोषणा खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला असून, लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याचे त्यांनी सांगितले होते.

प्रस्तावित पुरंदर विमानतळाच्या विरोधात एखतपुर, खानवडी, मुंजवडी, वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, राजेवाडी या गावातील नागरीकांनी गुरुवारी तहसील कार्यालयावर मोर्चा काढला. आम्हाला विश्वासात घ्या, आमची शेती, घरे या प्रकल्पात जाणार आहे का, जर जाणार असतील तर आम्हाला पुरंदर तालुक्यातच जमिनी द्या, आम्हाला मोबदला कसा देणार आहात, आमची मुले कामाला घेणार का असे अनेक प्रश्न नागरिकांनी यावेळी उपस्थित केले.

या मोर्चात मोठ्या संख्येने महिला-भगिनी, स्थानिक शेतकरी सहभागी झाले होते. तहसीलदार विक्रम राजपूत यांनी निवेदन स्वीकारले व लवकरच या बाबत जिल्हाधिकारी यांच्यापर्यंत हे निवेदन दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.



# बाळासाहेब ठाकरे यांची जयंती धामणीत उत्साहात साजरी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती गुरुवारी राज्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. धामणी (ता. आंबेगाव ) येथेही मोठ्या उत्साहात वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी करण्यात आली.

पंचायत समितीचे माजी सदस्य रविंद्र करंजखेले यांनी सांगितले की, वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्यामुळे आम्ही घडलो. ८० टक्के समाजकारण व २० टक्के राजकारण हे ब्रीदवाक्य घेऊन शिवसेना तळागाळात काम करत आहे. याप्रसंगी माजी सरपंच सागर जाधव, उपसरपंच अक्षय विधाटे, दीपक जाधव, तंटामुक्ती समिती अध्यक्ष नितीन जाधव, ज्येष्ठ शिवसैनिक तानाजी रोडे, शांताबाई बोऱ्हाडे, वामनराव जाधव, संजीवन गाढवे, राजेंद्र शिंदे , रामदास जाधव,अजित बोऱ्हाडे यांच्यासह ग्रामस्थ ग्रामस्थ उपस्थित होते.

### पोलीस वाहन चालक लबडे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव

# महिला वाहन चालकाचे आदिती तटकरेंकडून कौतुक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क




**कारेगाव :** भारत हा पुरुष प्रधान देश आहे. त्यात वाहन चालवण्यासाठी पुरुषांना प्राधान्य दिले जात आहे. मात्र, वाहन चालवण्यासाठी महिला देखील आता मागे नसल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात पोलीस खात्यात असलेल्या सरकारी वाहनांवर महिलांची वाहन चालक म्हणून मोठ्या प्रमाणावर भरती होत आहे. अशातच राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी रांजणगाव एमआयडीसी, ता. शिरुर येथील पोलिस ठाण्यात असलेल्या एका महिला वाहन चालकाचे विशेष कौतुक केले आहे.

पुणे नगर महामार्गावर असलेल्या पोलीस ठाण्याच्या हद्दीतून व्हीआयपी, मंत्री, न्यायाधीश किंवा सरकारी महत्त्वाचे वाहने जात असताना, स्थानिक पोलीस ठाण्याचे सरकारी वाहन स्वतःच्या हद्दीतून पायलेटिंग करत दुसऱ्या हद्दिपर्यंत जात असतात. रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून राज्याच्या महिला व बालविकास मंत्री तटकरे या जात असताना, नेहमीप्रमाणे चालक चालक शुभांगी लबडे या सरकारी वाहन घेऊन पायलेटिंग करण्यासाठी गेल्या होत्या. शुभांगी यांनी वेळेच्या आत मंत्री महोदयांना योग्य रस्त्याने वेळेत घेऊन गेल्या. मात्र मंत्री आदिती तटकरे यांना आपल्या पायलेटिंग करणाऱ्या वाहनांच्या ताफ्यात महिला वाहन चालक असल्याचे समजताच त्यांनी संपूर्ण ताफा थांबवण्यास सांगितले.

रांजणगाव येथे कार्यरत असणाऱ्या पोलीस वाहन चालक शुभांगी लबडे यांना वाहनाच्या खाली बोलावून मंत्री आदिती तटकरे यांनी वाहन चालविण्याच्या कलेचे कौतुक केले. या घटनेमुळे पोलीस वाहन चालक लबडे यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. तसेच पुरुष प्रधान असलेल्या देशात एक महिला दुसऱ्या महिलेला सुरक्षितरित्या वेळेच्या आत योग्य मार्गाने घेऊन जातात यासाठी लबडे या अनेकांना प्रेरणा देत आहे.

#रा



# पाक्यूचे अणकुचीदार दात

दोस्त हे मस्त

दोस्तांनो, मासे अनेक प्रकारचे असतात. आपण मस्त्यालयात काही प्रकारचे मासे पाहतो. प्रत्येक माशाचं काही ना काही वैशिष्ट्य असतं. काही मासे दिसण्यामुळे वेगळे वाटतात. असाच एक मासा म्हणजे पाक्यू. हा मासा इतर माशांप्रमाणेच दिसतो. मग यात वेगळं काय असं विचाराल तर उत्तर आहे या माशाचे दात. पाक्यूचे दात माणसांसारखे असतात. माणसाचे आणि पाक्यूचे दात एकत्र ठेवले तर माणसाचे कोणते आणि माशाचे कोणते हे ओळखूही येणार नाही एवढं साम्य आढळून येतं. आपल्या अणकुचीदार दातांमुळे त्याला 'द बॉल कटर' असं टोपण नाव मिळालंय. गोड्या पाण्यात सापडणारा हा मासा मस्त्यालयातही ठेवला जातो. दक्षिण अमेरिकेतल्या गोड्या पाण्यात त्याचं अस्तित्व असतं. तो विविध नद्यांमध्ये सापडतो. पापुआ न्यू गयानामध्येही तो दिसलाय. पाक्यूच्या तोंडाची रचना बरीचशी माणसासारखीच असते. फळं आणि टणक कवाचाची फळं फोडण्यासाठी तो दातांचा वापर करतो. यासोबतच इतर छोटे मासेही त्याचं खाद्य असतं. अमेझॉनच्या खोऱ्यातल्या झाडांवरून पाण्यात पडलेली फळं आणि बिया तो खातो. हे मासे फारसे भीतीदायक किंवा उपद्रवी नसले तरी त्यांच्या जबड्याची रचना त्रासदायक ठरू शकते. हे मासे माणसांना चावा घेऊ शकतात. अणकुचीदार दातांनी त्यांनी घेतलेला चावा किती वेदनादायी असेल याचा विचार न केलेलाच बरा! अमेरिकेत पाक्यू मासे पाळले जातात. कायद्यानं तशी परवानगी आहे. पाक्यूला सांभाळणं कठीण नाही. पण हे मासे बरेच वाढू शकतात त्यामुळे तशी सोय हवी. काहींना याची माहितीच नसते. घरातला फिश टँक छोटा असेल तर पाक्यू त्यातून बाहेर येऊ लागतात. अशा वेळी सरळ त्यांना तलावात किंवा नदीत सोडलं जातं. तर असा हा पाक्यू... लांबून तो सर्वसाधारण माश्यासारखाच दिसत असला तरी त्याच्यापासून लांब राहणंच योग्य ठरतं. तो चावला तर शस्त्रक्रिया करण्याशिवाय पर्याय नाही. बाकी तसा त्याच्यापासून कोणताही धोका नाही.



# छोटासा 'नौरू'

सफर देशांची

'नौरू' हा द्विपसमूह म्हणजे मध्य पॅसिफिक महासागरात वसलेला छोटासा देश. एकेकाळी 'प्लेझंट आईसलँड' अशी ओळख असलेल्या नौरूची 'यारेन' ही राजधानी. 'बनाबा' बेटं नौरूचा सर्वात जवळचा शेजारी. हे बेट नौरूच्या पूर्वेला ३०० मैल अंतरावर आहे. राष्ट्रकुल तसंच ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये हा छोटेखानी देश सहभागी होतो. नौरू हे अंड्याचा आकाराचं बेट आहे. १८८८ मध्ये जर्मनीने या बेटांवर सत्ता स्थापन केली. दुसऱ्या महायुद्धानंतर इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड यांचं नौरूवर एकत्रित राज्य होतं. १९४२ मध्ये जपानने हे बेट ताब्यात घेतलं. पण पुन्हा १९६६ पर्यंत संयुक्त राष्ट्रांच्या करारानुसार इंग्लंड, ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंडने राज्य केलं. मग दोन वर्षांनी म्हणजे १९६८ मध्ये हा देश स्वतंत्र झाला. नौरू १९९९ मध्ये संयुक्त राष्ट्रांचा सदस्य बनला. या बेटांवर फॉस्फेट मोठ्या प्रमाणावर आढळतं. नौरू हा पॅसिफिक महासागरातल्या फॉस्फेटच्या दगडांपासून बनलेल्या बेटांपैकी एक. 'ओशन' बेटं आणि 'माकाटी' ही इतर दोन बेटं आहेत. नौरूमध्ये अमेरिकेचा दूतावास नाही. फिजी या देशातले अमेरिकेचे राजदूत नौरूच्या संपर्कात असतात. या देशात फक्त एकच विमानतळ आहे. गंमत म्हणजे नौरू हा जगातल्या सर्वात जाड लोकांचा देश आहे. या देशात फारसं कोणी येत नाही. २०११ मध्ये नौरूमध्ये फिरण्यासाठी फक्त २०० पर्यटक आले होते. हा देश फारसा कोणाला माहीत नाही. ऑस्ट्रेलियन डॉलर हे इथलं चलन आहे. नोव्हेंबर ते फेब्रुवारीदरम्यान इथे पाऊस पडतो. इथे फक्त २० टक्के शेतजमीन आहे. व्हॅटिकन सिटी आणि मोनॅको एवढे दोनच देश नौरूपेक्षा लहान आहेत. या देशातल्या रस्त्यांची लांबी फक्त ३० किलोमीटर आहे. नौरूचं स्वतःचं लष्कर नाही. ऑस्ट्रेलियावर त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी आहे. त्यामुळे नौरू हा अनोखा देश म्हणायला हवा.

## ठिपके जुळवा



# मॅनेजमेंटचे नवे पर्याय

कोण होणार?



अनेकांना एमबीए करायचं असतं. एमबीए म्हटलं की विशिष्ट क्षेत्रच आपल्या समोर येतात. पण सध्याच्या काळात विविध ३० क्षेत्रांमध्ये तुम्ही एमबीए पदवी मिळवू शकता. त्यापैकीच काही वेगळ्या क्षेत्रांची ओळख करून घेऊ या.

✻ मार्केटिंगसारख्या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी बऱ्याच कौशल्यांची गरज असते. संवादकौशल्यं, वैचारिक क्षमता आणि कल्पकता यांच्या बळावर तुम्ही मार्केटिंगमध्ये पुढे जाऊ शकता. 'कम्युनिकेशन मॅनेजमेंट' सारख्या क्षेत्रात एमबीए केल्यानंतर एडव्हरटायजिंग, ब्रँड कम्युनिकेशन, पब्लिक रिलेशन्स, मीडिया व मनोरंजन मॅनेजमेंट, मार्केटिंग व डिजिटल मार्केटिंगसारख्या कम्युनिकेशनवर आधारित क्षेत्रांमध्ये पुढे जाऊ शकता. या अभ्यासक्रमामुळे तुमच्यात संवादकौशल्यं विकसित होतात.

✻ फॅशन आणि लक्झरी ब्रँड्सचं क्षेत्र खूप विस्तारत आहे. या ब्रँड्सच्या उत्पादनांना जगभरातून मागणी असते. सध्या महागड्या आणि जागतिक स्तरावरच्या ब्रँड्सना कुशल तज्ज्ञांची गरज असते. कल्पकतेला या क्षेत्रात खूप प्राधान्य आहे. त्यामुळे 'फॅशन अँड लक्झरी ब्रँड मॅनेजमेंट' हा अभ्यासक्रम तुम्हाला या क्षेत्रात यश मिळवून देऊ शकतो.

✻ भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा खूप मोठा वाटा आहे. शेतीतलं उत्पन्न वाढवण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर केला जातो. नव्या तंत्रज्ञानाचा विकास केला जातो. अशा परिस्थितीत 'अ‍ॅग्री बिझनेस मॅनेजमेंट' करता येईल.ही बिझनेस मॅनेजमेंटची उपशाखा आहे.

✻ सध्याच्या काळात 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट' चा विचार केला जातो. काही वर्षांपूर्वीपर्यंत सरकारी क्षेत्रांपर्यंत मर्यादित असलेलं हे क्षेत्र आता खूप विस्तारलं आहे. म्हणूनच 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट मॅनेजमेंट' चा पर्याय तुम्हाला स्वीकारता येईल.

✻ आपली उत्पादनं ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कंपन्या सप्लाय चेन मॅनेजमेंटचा वापर करतात. म्हणूनच हा अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तम करीअर करता येईल.

# लॉलीपॉपचे फुलपाखरू

करून पहा

मित्रांनो, तुम्हाला लॉलीपॉप आवडतं का? लॉलीपॉप चघळत बसायला किती मजा येते ना! काही वर्षांपूर्वी तर लॉलीपॉपची प्रचंड क्रेझ होती. ही क्रेझ आता काही प्रमाणात कमी झाली असली तरी अनेकांना अजून या प्रकारचं चॉकलेट आवडतं. वेगवेगळ्या फ्लेवर्सचे लॉलीपॉप्स चवीलाही छान लागतात. हेच लॉलीपॉप वापरून तुम्ही छानसं क्रिएटिव्ह आर्ट तयार करू शकता. ही कलाकृती तुम्ही भेट म्हणूनही देऊ शकता.

साहित्य : क्राफ्ट पेपर, कात्री, सेलोटेप, गम, लॉलीपॉप.

कृती : मित्रांनो, कागद फुलपाखराच्या आकारात कापायचा आहे. म्हणजे पंख फुलपाखराचे हवेत. यासाठी फुलपाखराच्या चित्राची किंवा पंखांची प्रिंट काढून घेता येईल. या प्रिंटचा वापर करून तुम्ही पंखांचा आकार कापून घेऊ शकता. पंख थोडे मोठे असू द्या. पंखांचं चित्र काढूनही आकार कापता येईल. तुम्हाला सोपं वाटेल त्या पद्धतीनं पंखांचा आकार कापून घ्या. पांढरा आणि लाल रंगाचे किंवा तुमच्या आवडीच्या रंगांचे कागद वापरता येतील. लाल रंगाच्या कागदाचे मोठ्या आकाराचे तुकडे कापा. पांढऱ्या कागदाचे चार बदामाचे आकार कापा. तुम्हाला इतर कोणतीही नक्षी काढता येईल. इतर आकार कापायचे असतील तर तेही कापता येतील. आता मोठे तुकडे एकमेकांवर चिकटवा. ते फुलपाखराचे पंख वाटायला हवेत. आता पांढरे बदामाचे आकार त्यावर चिकटवता येतील. तुम्हाला नक्षी काढायची असेल, मणी चिकटवायचे असतील तर ही सजावटही करू शकता. आता हे पंख तुम्हाला लॉलीपॉपच्या काडीवर चिकटवायचे आहेत. कौशल्य वापरून गम किंवा टेपने ते चिकटवा. अशाचप्रकारे तुम्ही वेगवेगळे आकार तयार करून लॉलीपॉपपासून सुंदर सुंदर कलाकृती तयार करू शकता.



## ओळखा पाहू

जिज्ञासा

१) यंदाच्या ऑस्कर सोहळ्यातल्या सर्वोत्कृष्ट इंग्रजी चित्रपट कोणता?
२) ओझोनच्या थरामुळे सूर्याची कोणती किरणं पृथ्वीवर पोहोचत नाहीत?
३) रॉयटर्स ही कोणत्या देशाची वृत्तसंस्था आहे?
४) बेसबॉलच्या मैदानाला काय म्हणतात?
५) भारतातल्या कोणत्या राज्यात सर्वाधिक शहरं आहेत?
६) नाटोची स्थापना कधी झाली?
७) संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेच्या कायमस्वरूपी सदस्य देशांची संख्या किती?
८) ऑस्ट्रेलियातलं बेटांवर वसलेलं राज्य कोणतं?
९) कोणत्याची पर्वतरांगेचा भाग नसलेला आफ्रिकेतला सर्वात उंच पर्वत कोणतहा?
१०) लॅटिन अमेरिकेतलं सर्वात मोठं शहर कोणतं?

उत्तरं : १) अनोरा २) अतिनील किरणं ३) ब्रिटन ४) डायमंड ५) उत्तर प्रदेश ६) ४ एप्रिल १९४९ ७) ५ ८) टास्मानिया ९) किलिमांजारो १०) साओ पाउलो

## दोस्त हे मस्त

### अनोखा नारव्हेल

नारव्हेल ही व्हेल माशाची एक प्रजाती आहे. ग्रीनलँड, कॅनडा आणि रशियामध्ये हा प्राणी आढळतो. या माशाच्या तोंडातून हत्तीच्या दातांसारखा दात बाहेर आलेला असतो. हा मासा समुद्रातले कॉड फिश तसंच फ्लॅटफिश खातो.



## खादाडी

### रोटी पिझ्झा

घरी पोळी उरली असेल तर तुम्ही मस्तपैकी पिझ्झा बनवू शकता. यासाठी दीड चमचा बटर, एक पोळी, चार चमचे पिझ्झा सॉस, अर्ध्या सिमला मिर्चीचे मध्यम तुकडे करा. अर्धा कांदा कापून घ्या. अर्धा कप मॉझरेला चीज, एक चमचा चिली फ्लेक्स, चमचाभर मिक्स हर्ब्ज असं साहित्य घ्या. पोळीवर बटर लावून बेकिंग ट्रेमध्ये ठेवा. एक मिनिट कन्वेक्शनमध्ये ठेवा. आता ट्रे मायक्रोवेव्हमधून बाहेर काढा. त्यावर पिझ्झा सॉस लावा. कांदा आणि भोपळी मिरची पसरा. वरून मोजरेला चीज घाला. आता साधारण तीन मिनिटं पुन्हा बेक करून घ्या. वरून चिली फ्लेक्स आणि हर्बज घाला. तुकडे करून गरमागरम खा.



## एक्झॅम टाईम

### घाबरू नका

दोस्तांनो, तुमची परीक्षा आता अगदी जवळ आली असेल. खूप कमी दिवस राहिले म्हणून घाबरून जाऊ नका. उरलेल्या दिवसात भरपूर अभ्यास करा. आपल्या मित्रमैत्रिणींना किती अभ्यास झाला आहे असा विचार करत बसू नका. स्वतःचा वेळ अजिबात वाया घालवू नका. सुरूवातीला फार अभ्यास केला नसेला तर आता कामाला लागा. असूनही तुमच्याकडे एक महिना आहे. महत्त्वाचे प्रश्न जाणून घ्या. त्यावरच भर द्या.



## योगा टाईम

### लाभदायी दंडासन

शरीराला सक्षम करण्यासाठी दंडासन करता येईल. यात शरीराचं सगळं वजन मनगटांवर असतं. यामुळे हातांचे स्नायू बळकट होतात. तसंच पाठीच्या कण्यालाही बळकटी मिळते. यासोबतच पोटाचे स्नायूही चांगल्या प्रकारे काम करतात. म्हणूनच हे आसन नियमित करायला हवं.



# खा बदाम आणि अक्रोड

व्हॉट्स न्यू?

छोट्यांनो, तुम्ही परीक्षेच्या तयारीला लागला असाल. अभ्यास जोरात सुरू असेल. भरपूर वाचलं तरी लक्षात राहात नाही असं तुम्हाला वाटतं का? चांगले गुण मिळवण्यासाठी वाचलेले धडे लक्षात राहायला हवे. अभ्यास नीट समजून घ्यायला हवा. मेंदू तल्लख करण्याचं काम काही पदार्थ करतात. सुकामेवा खाल्ल्यामुळे मेंदूला भरपूर पोषक घटक मिळतात. वाचलेलं लक्षात राहातं. त्यातही बदाम आणि अक्रोड खाल्ल्याने खूप लाभ मिळतात. बदामात प्रथिनं असतात. यामुळे मेंदूचं कार्य सुधारतं. प्रथिनांमुळे आपल्याला ऊर्जा तर मिळतेच शिवाय मेंदूच्या पेशींच्या दुरूस्तीचं कामही ते करतात. यामुळे आपली वैचारिक क्षमता वाढते. स्मरणशक्ती सुधारते.

बदामात अ जीवनसत्त्वही भरपूर प्रमाणात असतं. डोळ्यांच्या आरोग्यासाठी अ जीवनसत्त्व उपयुक्त ठरतं. दररोज तीन ते चार बदाम खाल्ल्याने आपली दृष्टी सुधारते. तुम्हाला चष्मा असेल तर बदाम खायला सुरूवात करा. प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठीही बदाम खायला हवे. सर्दी,खोकला,ताप यांसारख्या आजारांना लांब ठेवायचं असेल तर बदाम खा. तसंच हाडांच्या बळकटीसाठीही बदाम खायला हवे.

अक्रोड हा पदार्थही खूप पौष्टिक आहे. मेंदूसारखं दिसणारं अक्रोड कामही तसंच करतं. मेंदू तसंच हाडांच्या बळकटीसाठी अक्रोड खायला हवं. यात कॉपर, मँगनिज, मॅग्नशियम, पोटॅशियम, फॉस्फोरस, बायोटिन, ब जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतं. यामुळे मेंदू तल्लख होतो. वाचलेलं नीट लक्षात राहतं. म्हणूनच अक्रोडाला ब्रेन फूड असंही म्हणतात. अक्रोडमधल्या ओमेगा ३ फॅटी ॲसिड्समुळे हृदयाला बळकटी मिळते.





# इथे वाहनांना नो एन्ट्री

फनी वर्ल्ड

दोस्तांनो, प्रदूषण ही आजची कळीची बाब आहे. दिल्लीमध्ये तर प्रदूषण कमी करण्यासाठी ऑड-इव्हन फॉर्म्युला वापरावा लागतोय. वाहनं प्रमाणाबाहेर वाढल्यामुळे सगळीकडेच प्रदूषण प्रचंड वाढलं आहे. चारचाकी वाहनांशिवाय आपलं कसं होणार, असं अनेकांना वाटत असलं तरी जगातल्या कित्येक देशांमध्ये आणि बेटांवर एकही वाहन नाही. कोणते आहेत हे देश? आणि कसा प्रवास करत असतील इथले लोकं? जाणून घेऊ या...

✻ कधी केनियातल्या लामू नावाच्या बेटावर गेलात तर तुम्हाला खेचरावरून फिरावं लागेल. या बेटावर एकही गाडी नाही. इथे वाहतुकीसाठी दोन ते तीन हजार खेचरांची मदत घेतली जाते.

✻ इटलीतल्या व्हेनिस शहरात बोटीनं किंवा चालत फिरावं लागतं. म्हणूनच हे शहर फारच सुंदर राहिलंय. व्हेनिसमध्ये ४०० पूल आहेत. हे पूल छोट्या छोट्या ११८ बेटांना जोडतात. युरोपमधलं हे छोटसं शहर कार फ्री म्हणून ओळखलं जातं.

✻ ग्रीसमधलं हायड्रा हे बेटही असंच आहे. घोडे, खेचरं आणि बोटीचा वापर करून येथे लोक प्रवास करतात. अत्यंत शांत आणि सुंदर असं हे ठिकाण आहे, वाहनांचा वापर नसल्यानं ते प्रदुषणमुक्त राहिलंय. इथे पायी फिरणारे अनेक लोक पहायला मिळतील.

✻ मोराक्कोतलं मदिना हे ठिकाण असंच अनोखं म्हणता येईल. इथल्या गल्ल्या इतक्या छोट्या आहेत की तिथून पायी चालण्याशिवाय पर्याय नाही. या गल्ल्यांमधून दुचाकी वाहनंही जाऊ शकत नाही. या शहरात कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

✻ आपल्या महाराष्ट्रात माथेरान या हिल स्टेशनवरही वाहनांना परवानगी नाही. येथे गेल्यावर पायी, घोड्यावर बसून, माणसांकडून ओढल्या जाणाऱ्या रिक्षानं फिरावं लागतं.




# बनावट की अस्सल?

स्मार्ट टिप्स

'अँड्रॉइड' असो किंवा 'आयओएस' अशा दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्समध्ये बनावट म्हणजे फेक ॲप्सचा सुळसुळाट आहे. अशी ॲप्स डाउनलोड केल्यानंतर फोनमधला डाटा चोरला जाण्याची शक्यता असते. आपण डाउनलोड करत असलेलं कोणतं ॲप बनावट आहे हे कसं ओळखायचं हे जाणून घेऊ या.

✻ कोणतंही ॲप डाउनलोड करून घेण्याआधी त्याचा स्रोत म्हणजे सोर्स तपासून पाहा. अधिकृत वेबसाईटवरूनच ॲप्स डाउनलोड करा. गुगल किंवा ॲपल प्ले स्टोअरमधूनच ॲप्स डाउनलोड करा. ही दोन्ही प्ले स्टोअर्स ॲप्सची पडताळणी म्हणजे व्हेरिफिकेशन करत असतात. त्यामुळे ती व्हेरिफाईड आहेत की नाही याची खात्री करून घ्या. या दोन्ही प्ले स्टोअर्समध्ये बनावट ॲप्सही असतात. त्यामुळे आपण डाउनलोड करत असलेलं ॲप सुरक्षित असल्याची ख़ात्री करून घ्यायला विसरू नका.



✻ ॲपल तसंच गुगल प्ले स्टोअरवर ॲप्सबाबत रिव्ह्यू दिलेले असतात. ते आधी वाचून घ्या. बरेचदा नको असलेली ॲप्सही आपण डाउनलोड करत असतो. यामुळे आपला फोन स्लो होतो. अशा ॲप्सचे काहीच लाभ होत नाहीत. तसंच बनावट ॲप्समध्ये काही चुका नक्कीच आढळतील. त्यामुळे कोणतंही ॲप बारकाईने तपासून घ्या.

✻ प्रत्येक ॲप विकसित करण्यात डेव्हलपरची महत्त्वाची भूमिका असते. खऱ्या ॲपच्या डेव्हलपरची माहिती दिलेली असते. या डेव्हलपरची माहिती सोशल मीडिया किंवा वेबसाईटवर मिळू शकते. ॲपच्या डेव्हलपरची माहिती मिळत नसेल तर ते ॲप बनावट आहे असं समजावं आणि डाउनलोड करू नये.



## नोव्हाक जोकोविचचे स्वप्न भंगले...

सर्बियाचा स्टार टेनिसपटू नोव्हाक जोकोविच ऑस्ट्रेलियन ओपनमधून बाहेर झाला आहे. जोकोविचने दुखापतीमुळे अलेक्झांडर झ्वेरेव्हविरुद्धचा उपांत्य सामना मध्यंतरी सोडला. झ्वेरेव्हने पहिला सेट 7-6 असा जिंकला होता, त्यानंतर जोकोविचने सामना सोडल्यानंतर जर्मन खेळाडूला वॉकओव्हर मिळाला. आम्ही तुम्हाला सांगतो की जोकोविच आणि माजी ऑस्ट्रेलियन दिग्गज मार्गारेट कोर्ट सर्वाधिक एकेरी ग्रँड स्लॅम विजेतेपदे (महिला आणि पुरुष) जिंकण्याच्या बाबतीत समान आहेत. या दोघांनी संयुक्तपणे 24 ग्रँडस्लॅम एकेरी जेतेपदे जिंकली आहेत. मार्गारेटने ओपन एरापूर्वी यापैकी 13 जेतेपदे जिंकली होती. टेनिसमधील खुल्या युगाची सुरुवात 1968 मध्ये झाली. ऑस्ट्रेलियन ओपन 2024 जिंकून कोर्टवर पुढे जाण्याचे जोकोविचचे स्वप्न होते, परंतु त्याचे स्वप्न पुन्हा भंगले आहे.

# नॉक 99 पुणेरी बाप्पा संघाला विजेतेपद

## ११ व्या पीवायसी- पुसाळकर प्रीमियर क्रिकेट लीग २०२५ स्पर्धेत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पीवायसी हिंदू जिमखाना क्लबच्या वतीने अकराव्या पीवायसी- पुसाळकर प्रीमियर लीग क्रिकेट 2025 स्पर्धेत अंतिम फेरीत आत्मन बागमार याने केलेल्या 39 धावांच्या जोरावर नॉक 99 पुणेरी बाप्पा संघाने ओव्हन फ्रेश टस्कर्स संघाचा 5 गडी राखून पराभव करून विजेतेपद संपादन केले.

पीवायसी मैदानावर पार पडलेल्या या स्पर्धेत अंतिम फेरीत ओव्हन फ्रेश टस्कर्स संघाने प्रथम फलंदाजी करताना 6 षटकात 4बाद 64धावा केल्या. यात हर्षल गंद्रेने 17चेंडूत 4चौकार व 1 षटकाराच्या मदतीने 31 धावा, श्रीनिवास चाफळकरने 13 धावा, समीर बाकरेने नाबाद 10 धावा काढून संघाच्या डावाला आकार दिला. हे आव्हान नॉक 99 पुणेरी बाप्पा संघाने 5.1 षटकात 3बाद 65धावा करून पूर्ण केले. यात आत्मन बागमारने 15 चेंडूत 1चौकार व 4 षटकारासह नाबाद 39 धावा काढून संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. टस्कर्स संघाकडून अर्णव कुंटे(1-9), हर्षल गंद्रे(1-9), प्रशांत वैद्य(1-13) यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

स्पर्धेतील विजेत्या संघाला विजय पुसाळकर स्मृती करंडक अशी पारितोषिके देण्यात आली. स्पर्धेचे पारितोषिक वितरण पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त पोलीस आयुक्त पृथ्वीराज मीना, पुसाळकर ग्रुपचे संचालक रोहन पुसाळकर, पीवायसी हिंदू जिमखानाचे मानद सचिव दिपक गाडगीळ, सह सचिव सारंग लागू यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी क्लबचे खजिनदार चंद्रशेखर नानिवडेकर, क्रिकेट विभागाचे सचिव अविनाश रानडे, होडेक वायब्रेशन टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेडचे अभिजीत खानविलकर, बेलवलकर हाऊसिंग लिमिटेडचे समीर बेलवलकर, रांजेकर रियालिटीचे अनिरुद्ध रांजेकर, चाफळकर करंदीकर डेव्हलपर्सचे श्रीनिवास चाफळकर, सूजनीलचे मोनिका देसाई, सुप्रिम इन्फ्राचे आमिर आजगावकर, आशुतोष देशपांडे, अभिषेक ताम्हाणे, नंदन डोंगरे, तन्मय आगाशे, सिद्धार्थ दाते, शिरीष साठे, आदी मान्यवर उपस्थित होते.

### इतर पारितोषिके

**बेस्ट व्हॅल्युएबल ज्युनियर खेळाडू:** अर्णव कुंटे(टस्कर्स);
**बेस्ट व्हॅल्युएबल सिनियर खेळाडू:** रणजीत पांडे (डिस्ट्रॉयर्स);
**सर्वोत्कृष्ट फलंदाज:** रौनक ढोले पाटील(डिस्ट्रॉयर्स);
**सर्वोत्कृष्ट गोलंदाज:** आशिष राठी(शार्क्स);
**सर्वोत्कृष्ट क्षेत्ररक्षक:** हर्षल गंद्रे(टस्कर्स);
**सर्वोत्कृष्ट यष्टीरक्षक:** रोहित मेहेंदळे(पुणेरी बाप्पा);
मोस्ट इकोनॉमिकल गोलंदाज: नकुल ओगले(चिताज);
**सर्वाधिक चौकार मारणारा खेळाडू:** आत्मन बागमार(पुणेरी बाप्पा);
**मोस्ट लव्ह प्लेयर:** रोहन छाजेड(टायफून्स);
पर्पल कॅप: आदित्य जाधव(पुणेरी बाप्पा);
**ऑरेंज कॅप:** आत्मन बागमार(पुणेरी बाप्पा);
**मालिकावीर:** आत्मन बागमार(पुणेरी बाप्पा).

## योगेश ॲकॅडमीने, व्हेरॉक ॲकॅडमी यांच्यामध्ये विजेतेपदासाठी लढत



स्वराज सातपुते



वीर संभाजी

**पुणे :** ट्वेन्टीफोर स्पोटर्स मॅनेजमेंट तर्फे आयोजित 'कोद्रे फार्म्स करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब २५-२५ क्रिकेट स्पर्धेत योगेश क्रिकेट ॲकॅडमीने आणि वेंगसरकर व्हेरॉक क्रिकेट ॲकॅडमी यांच्यामध्ये विजेतेपदासाठी लढत होणार आहे. सिंहगड रोड येथील कोद्रे फार्म्स क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत स्वराज सातपुते याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर वेंगसरकर व्हेरॉक क्रिकेट ॲकॅडमीने एके स्पोटर्स ॲकॅडमीचा ९ गडी राखून सहज पराभव केला. स्वराज याने २३ धावांमध्ये ५ गडी बाद करून पहिल्यांदा खेळणाऱ्या एके स्पोटर्स ॲकॅडमीचा डाव मोडून काढला. एके संघाने १०८ धावा जमविल्या. वेंगसरकर व्हेरॉक क्रिकेट ॲकॅडमीने हे लक्ष्य १६.१ षटकात व १ गडी गमावून पूर्ण केले. श्रेयान पारवे नाबाद ५६ धावा आणि रूद्र भोसले याने २५ धावा करून संघाला सहज विजय मिळवून दिला. वीर संभाजी याने केलेल्या अचूक गोलंदाजीमुळे योगेश ॲकॅडमीने एमबीबी ॲकॅडमीचा ३७ धावांनी पराभव करून अंतिम फेरी गाठली. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या योगेश क्रिकेट ॲकॅडमीने १३४ धावांचे लक्ष्य उभे केले. याचा पाठलाग करताना एमबीबी ॲकॅडमीचा डाव २१.४ षटकात व ९७ धावांवर आटोपला. वीरज संभाजी याने १७ धावांमध्ये ४ गडी टिपले आणि संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला.

## श्रीनिधी कदमची 174 धावांची खेळी क्रीकबेसिकचा दुसरा विजय



श्रीनिधी कदम



श्रेया तरस

**पुणे :** बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी यांच्या वतीने आयोजित बी अ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी करंडक 13 वर्षाखालील एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत साखळी फेरीत श्रीनिधी कदम(174धावा) याने केलेल्या धडाकेबाज फलंदाजीच्या जोरावर क्रीकबेसिक क्रिकेट अकादमी संघाने क्रिक9क्रिकेट अकादमी संघाचा 140धावांनी धुव्वा उडवत आपली विजयी मालिका कायम ठेवली.

चिखली येथील सिल्व्हर क्रिकेट क्लब क्रिकेट मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत साखळी फेरीत दुसऱ्या सामन्यात शावेज पठाण(86धावा), स्वराज पिंगळे(62धावा) याने केलेल्या अर्धशतकी खेळीसह श्रेया तरस(5-22)हीने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर क्रीक फायटर्स संघाने बीअ स्पोर्ट एबीव्ही क्रिकेट अकादमी क संघावर 166धावांनी विजय मिळवला.

## रणजी ट्रॉफी २०२४-२५

# ऋतुराजच्या वादळी अर्धशतकामुळे आघाडी



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** रणजी ट्रॉफी २०२४-२५ स्पर्धेचा दुसरा टप्प्याला गुरुवारी (२३ जानेवारी) सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र संघाचा सामना कृणाल पांड्याच्या नेतृत्वातील बडोदा संघाविरुद्ध नाशिकमध्ये सुरू आहे. या सामन्यात महाराष्ट्राने कर्णधार ऋतुराज गायकवाडने झळकावलेल्या वादळी अर्धशतकामुळे मोठी आघाडी मिळवली आहे.

या सामन्यात दुसऱ्या दिवस अखेर महाराष्ट्राने २९ षटकात २ बाद १२३ धावा केल्या आहेत. तसेच पहिल्या डावातील आघाडीमुळे महाराष्ट्राची आघाडी आता २७५ झाली आहे.

दुसऱ्या दिवशी महाराष्ट्राच्या दुसऱ्या डावाची सुरुवात फारशी चांगली झाली नव्हती. पहिल्याच षटकात सलामीवीर पवन शाहने शून्यावर विकेट गमावली. तसेच १२ व्या षचकात मुर्तझा ट्रंकवालाही १८ धावा करून बाद झाला.

पण नंतर संयमी खेळ करणाऱ्या सिद्धेश वीरला कर्णधार ऋतुराज गायकवाडची साथ मिळाली. चौथ्या क्रमांकावर उतरलेल्या ऋतुराजने बडोद्याच्या गोलंदाजांवर हल्ला चढवला. त्याने आक्रमक खेळताना ३९ चेंडूतच अर्धशतक पूर्ण केले. त्यामुळे दिवस संपला तेव्हा सिद्धेश आणि ऋतुराज यांची ९८ धावांची नाबाद भागीदारी झाली.

सिद्धेश ८३ चेंडूत ३७ धावांवर नाबाद आहे. तसेच ऋतुराज ५४ चेंडूत ६६ धावांवर नाबाद आहे. त्याने ९ चौकार आणि २ षटकार खेचले. महाराष्ट्राने दिवस अखेर दोनच विकेट गमावल्या असल्याने आता त्यांचा बडोद्यासमोर मोठे लक्ष्य ठेवण्याचा तिसऱ्या दिवशी प्रयत्न असेल.

## दुसऱ्या T20 साठी इंग्लंड संघाची घोषणा

# ब्रिटिशांना घाम फुटणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**चेन्नई :** चेन्नई येथे भारत विरुद्ध इंग्लंड 2रा T20I: भारतीय संघ आणि इंग्लंड यांच्यात 5 सामन्यांची T20 मालिका खेळली जात आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने या घरच्या मालिकेला विजयाने सुरुवात केली. पहिला सामना 22 जानेवारी रोजी कोलकाता येथे झाला, जो टीम इंडियाने 7 विकेट्सने जिंकला होता. आता भारतीय संघ आणि इंग्लंड यांच्यातील मालिकेतील दुसरा सामना 25 जानेवारीला होणार आहे. हा सामना चेपॉक स्टेडियम, चेन्नई येथे होणार आहे. येथे चाहत्यांना सांगूया की भारतीय संघ चेन्नईच्या या स्टेडियममध्ये 6 वर्षांनंतर टी-20 आंतरराष्ट्रीय सामना खेळणार आहे.

भारतीय संघाने चेपॉक स्टेडियमवर आतापर्यंत केवळ 2 टी-20 सामने खेळले आहेत. या मैदानावर टीम इंडियाने 11 सप्टेंबर 2012 रोजी न्यूझीलंडविरुद्ध पहिला सामना खेळला होता. या सामन्यात भारतीय संघाला 1 धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. तेव्हा भारताची कमान महेंद्रसिंग धोनीकडे होती.

चेपॉकमध्ये खेळवण्यात आलेला पहिला सामना गमावल्यानंतर भारतीय संघाने या मैदानावर 6 वर्षांनंतर दुसरा सामना खेळला. भारतीय संघाने 11 नोव्हेंबर 2018 रोजी चेपॉक येथे वेस्ट इंडिज विरुद्ध दुसरा टी-20 सामना खेळला, ज्यामध्ये तो जिंकला. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने हा सामना ६ गडी राखून जिंकला.

आता सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ या मैदानात उतरणार आहे. हा तिसरा सामनाही याच मैदानावर तब्बल 6 वर्षांनंतर खेळला जात आहे, हा विचित्र योगायोग आहे. यावेळी वॉशिंग्टन सुंदर हा एकमेव खेळाडू आहे जो शेवटचा सामना खेळला होता आणि आता यावेळेसही त्याचा संघात समावेश करण्यात आला आहे.



## - सेंट व्हिन्सेंट्स ज्युनियर फुटबॉल लीग

# कल्याणी स्कूल, लोयोला एचएसचे दिवसभरात दोन विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कल्याणी स्कूल आणि लोयोला एचएसने आपले दोन्ही सामने जिंकून सेंट व्हिन्सेंट्स ज्युनियर लीगमधील फुटबॉल स्पर्धेत अव्वल स्थान मिळविले. सेंट व्हिन्सेंटच्या जीवांश व्यासने हॅट्ट्रिकसह 4 गोल करताना सेंट व्हिन्सेंट्सच्या विजयात मोलाचा वाटा उचलला. सेंट व्हिन्सेंट्स ज्युनियर लीग फुटबॉल स्पर्धेच्या दुसऱ्या आठवड्यातील पहिली हॅटट्रिक ठरली.

सेंट व्हिन्सेंट्स एचएस मैदानावर सुरू असलेल्या स्पर्धेत कल्याणी स्कूलने प्रथम फादर ॲग्नेलला 3-1 आणि नंतर क्लाइन मेमोरियल स्कूलला 1-0 असे हरवले. फादर ॲग्नेलविरुद्ध कल्याणी स्कूलकडून विहान साहू, विराज चचोंडिया, अक्षज अग्रवालने प्रत्येकी एक गोल केला. प्रतिस्पर्धी संघाकडून तनिश बेगेने गोल केला. क्लाइन मेमोरियल स्कूलविरुद्ध कल्याणी स्कूलसाठी विराज चचोंडियाने निर्णायक आणि एकमेव गोल केला. लोयोला एचएसने शार्दुल मनोहरच्या गोलच्या जोरावर एचडीएफसी स्कूलविरुद्ध 1-0 असा विजय मिळवला. अन्य सामन्यांत लोयोला एचएसने सेंट पॅट्रिक्सचा 3-0 असा पराभव केला. त्यात केनिथ सॅमसन, निवेद नायर, शौन गायकवाडचे गोल महत्वपूर्ण ठरले.

यजमान सेंट व्हिन्सेंट्स एचएसने दस्तूर को-एड संघाचा 4-0 असा धुव्वा उडविला. हॅट्ट्रिकसह चार गोल करणारा जीवांश व्यास हा त्यांच्या विजयाचा शिल्पकार ठरला.

विद्या व्हॅली, हचिंग्ज, एरिन नागरवाला, हिलग्रीन फादर ॲग्नेल आणि एचडीएफसी स्कूल हे विजय मिळविणारे अन्य संघ होते ज्यांचा एक सामना अनिर्णित राहिला. विद्या व्हॅलीने श्री श्री रविशंकरचा 3-0 तसेच हचिंग्जने श्री श्री रविशंकरचा 2-0 असा पराभव केला. नागरवालाने दस्तूर को-एडवर 6-0 असा मोठा विजय मिळवला. त्यात ऋत्विक बिश्त (3 गोल), आरव सोनवणे (2) आणि कृष्ण (1 गोल) चमकले. हिल ग्रीनने अनस जमादार (3) आणि हिमांशू चेरेच्या (1) गोलच्या जोरावर दस्तूर को-एडचा 4-0 असा पराभव केला.

इतर लढतींमध्ये, फादर ॲग्नेलने दस्तूर को-एडवर 2-0 अशी मात केली. दोन्ही गोल दर्शन गायकवाडने (2) केले. एचडीएफसीने क्लाइन मेमोरियल स्कूलचा 4-0 असा पराभव केला.

# पायात गोळा आला, तरी शार्दूलचे 'मुंबई'साठी शतक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** रोहित शर्मा व यशस्वी जैस्वाल यांनी पुन्हा एकदा मोठी खेळी करता आली नाही. रणजी करंडक स्पर्धेच्या जम्मू काश्मीर संघाविरुद्धच्या दुसऱ्या डावातही दोघं अपयशी ठरले. अजिंक्य रहाणे व श्रेयस अय्यर यांनीही निराश केले. पण, पहिल्या डावात मैदानावर उभा राहिलेला शार्दूल ठाकूर दुसऱ्या डावातही चमकला आणि शतक झळकावून मुंबईचा डाव सावरला. त्याच्या पायात गोळा आला होता आणि प्राथमिक उपचार घेऊन तो मैदानावर उभा राहिला.

त्याची आजची खेळी पाहून वन डे वर्ल्ड कप स्पर्धेतील ग्लेन मॅक्सवेल सर्वांना आठवला, त्यानेही अफगाणिस्तानविरुद्ध अशीच द्विशतकी खेळी केली होती.

मुंबईचा पहिला डाव १२० धावांवर गुंडाळल्यानंतर जम्मू-काश्मीरने २०६ धावा करून ८६ धावांची आघाडी घेतली. सलामीवीर शुभम खजुरियाने ७५ चेंडूंत ४ चौकार व ३ षटकारांसह ५३ धावांची खेळी केली. मोहित अवस्थीने मुंबईला सामन्यात पुनरागमन करून दिली होते.

पण, आबीद मुश्ताकच्या ४४ धावांनी जम्मू-काश्मीरला आघाडी मिळवून दिली. मुंबईच्या मोहितने ५२ धावांत ५ विकेट्स घेतल्या. शार्दूल ठाकूर व शाम्स मुलानी यांनी प्रत्येकी २ बळी टिपले.



# स्मृतीमुळे देशाची आन, बान, शान वाढली

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून शुक्रवारपासून (२४ जानेवारी) २०२४ मधील पुरस्कारांची घोषणा करण्यात येत आहे. आयसीसीने शुक्रवारी आधी २०२४ मधील सर्वोत्तम वनडे पुरूष संघाची घोषणा केली, त्यानंतर त्यांनी सर्वोत्तम वनडे महिला संघाचीही घोषणा झाली आहे.

आयसीसीच्या सर्वोत्तम पुरुष वनडे संघात भारतासह ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, इंग्लंड, दक्षिण आफ्रिका, न्यूझीलंड अशा संघांच्या एकाही खेळाडूला संधी मिळालेली नव्हती. मात्र, महिला वनडे संघाबाबत चित्र वेगळे दिसून आले आहे.

आयसीसीच्या सर्वोत्तम २०२४ वनडे महिला संघात भारताच्या दोन खेळाडूंना संधी मिळाली आहे. यामध्ये भारताची उपकर्णधार स्मृती मानधना आणि अष्टपैलू दीप्ती शर्माचा समावेश आहे.

## पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल पीडीसीसी मुले व मुली निवड चाचणी

# कुशाग्र, निहिरा, सुयोग, तन्वी यांना विजेतेपद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** पुणे जिल्हा बुद्धिबळ सर्कल यांच्या आयोजित पीडीसीसी 13,15,19वर्षाखालील मुले व मुली निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेत निहीरा कौल, कुशाग्र जैन, सुयोग वडके, तन्वी कुलकर्णी यांनी आपापल्या गटात अव्वल क्रमांक पटकावत विजेतेपद संपादन केले.

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हॉल, पुणे सातारा रोड येथील हॉल मध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत 15 वर्षाखालील खुल्या गटात आठवी फेरीत पहिल्या पटावरील लढतीत कुशाग्र जैनने अयान सोमाणीचा पराभव करून 8 गुणांसह विजेतेपद पटकावले. कुशाग्र याने रेटी पद्धतीने डावास सुरुवात केली व 30 चालीमध्ये विजय मिळवला. कुशाग्र हा एसएनबीपी शाळेत नववी इयत्तेत शिकत आहे. याच गटात भुवन शितोळेने रेयांश झडचा पराभव करून 7 गुणांसह दुसरे स्थान मिळवले. सृजन बोरकरने आरव मेहताचा पराभव करून 6.5गुणांसह तिसरा क्रमांक पटकावला.

15 वर्षाखालील मुलींच्या गटात सहावी फेरीत निहीरा कौलने गेहणा शींगवीला नमवून 5.5 गुणांसह विजेतेपद पटकावले. निहिरा हीने फ्रेंच डिफेन्स पद्धतीने डावास सुरुवात केली व 40 चालीमध्ये गेहणावर विजय मिळवला. निहिरा ही पवार पब्लिक स्कूलमध्ये सातवी इयत्तेत शिकत आहे. सई पाटीलने 5 गुणांसह दुसरे, तर प्रतिती खंडेलवाल हीने 4गुण व 23.5बुकोल्स सरासरीच्या जोरावर तिसरे स्थान पटकावले.

19 वर्षाखालील खुल्या गटात सहाव्या फेरीत सुयोग वडकेने अक्षय जोगळेकरला बरोबरीत रोखले व 5 (23 बुकोल्स) गुणांसह विजेतेपदाचा मान पटकावला. सुयोग हा बाल शिक्षण विद्यामंदिर येथे 11वी इयत्तेत सायन्स शाखेत शिकत आहेत.

#रा